म. ग्रं. सं. ठाणे
ग्रंथ ...
क्र. 236



# यांगत्सीच्या तीरावर



REFBK-0010195

सौ. सुलोचना लिमये

# यांगत्सीच्या तीरावर

[ श्री. राजा हथीसिंग ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८११० वि: 
क्रमांक २३८ नों: दि:

REFBK 0010195

अ REFBK-0010195 मधे
इ.

मराठी ग्रंथ संग्रहालय
१०१०५

मूल्य रु. २=५०

स्कूल अँड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

Great Peace :

CopyRight, 1953, by Raja Hutheesing

प्रथमावृत्ति : विजयादशमी १८८०

प्रकाशक :

प्रभाकर जयराम पाध्ये

स्कूल अँड कॉलेज बुकस्टॉल

कोल्हापूर

मुद्रक :

चिंतामण पांडुरंग मोडक

समन्वय मुद्रणालय

११६।६१ सदाशिव पेठ, पुणें २

## प्रयाणापूर्वी

आशियाई राष्ट्रांना जागतिक राजकारणांत आतां महत्व येऊं लागलें आहे. जागतिक–अर्थशास्त्रज्ञांची नुकतीच दिल्ली येथें भरलेली परिषद ही या जाणीवेचीं प्रसादचिन्हें आहेत. पूर्वेकडील या नवोदित राष्ट्रांचा आपण परिचय करून घेतला पाहिजे. आणि निःपक्षपातीपणानें तेथील घटनांचा काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे. श्री. राजा हथींसिंग यांचे हें प्रवासवर्णन मीं वाचलें व मला तें आवडले. त्यांचे विचार प्रभावी व निरीक्षण सखोल आहे. आपलीं मतें तें निर्भीडपणें व्यक्त करतात. नवचीनच्या भवितव्याचा प्रश्न आतां जागतिक झाला आहे. अशावेळीं त्या देशाचें श्री. राजा हथींसिंग यांनीं केलेलें मूल्यमापन वाचकांस आवडेल असा मला विश्वास आहे.

या भाषांतरासाठीं हक्क वगैरे मिळवून देण्याच्या बाबतींत मदत केल्याबद्दल युसिसचे श्री. दळवी व तें प्रकाशांत आणल्याबद्दल मे. स्कूल अ‍ॅण्ड कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर, यांची मीं आभारी आहे.

विजयादशमी १८८०

सौ. सुलोचना लिमये

# अनुक्रमणिका


## १

प्रयाण ... ... १
नवीन राजवटीचा परिचय ... ... १७
माओ त्से तुंग ... ... २२
चाऊ एन् लाय ... ... २७
चे पे शी ... ... ३५
नवचीनचें पुढें पाऊल ... ... ४०

## २

जमीन सुधारणा ... ... ४६
आदर्श खेडें ... ... ५३
स्वावलंबी बांधकाम ... ... ५८
कामगार आणि त्यांचे आदर्श ... ... ६७
परकीय मदत ... ... ७३
औद्योगिक प्रगति ... ... ८४
पुनर्रचनेचे प्रयोग ... ... ९४
चीनचे अर्थकारण ... ... १०१

## ३

बुद्धिभ्रमाचे प्रयोग ... ... १०६
शासनांतील कांहीं गमती ... ... ११४
सॅन फॅन वू फॅन ... ... १२३
बनविलेलें प्रदर्शन ... ... १३०
हुकूमशाही ... ... १३८
चीनची घटना ... ... १४७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........
१०१२५

जे बोलतात त्यांना ज्ञान नसतें.
ज्ञानवंत बोलत नाहींत.
लाओ अू याचे हे उद्‌गार आहेत.
आओ अू हा जर ज्ञानवान होता तर
त्यानें पांच हजार पृष्ठांचा ग्रंथ लिहिला तरी कसा ?

पो चू

चीनला जाण्याचें निमंत्रण १९५१ च्या सप्टेंबरमध्यें मला देण्यांत आलें. हिंदी चीनसंघातर्फे हें आमंत्रण होतें. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मीं भाग घेतला होता. त्यानंतर मात्र मीं वृत्तपत्र व्यवसायाकडे वळलों. बेजबाबदार राज्यकारभार, दडपशाही आणि दारिद्र्य हीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तरी नष्ट होतील अशी मला आशा होती. पण या बाबतींत भारतीयांचा अपेक्षाभंग झाल्याचें मला आढळून आलें. या बाबतींत आमचे पुढारी कमी पडले. अन्नान्नदशा व अज्ञान यांत लक्षावधि लोकांना पिचत पडण्याची वेळ आली. आशेचा कुठें किरणच दिसेना. आशियांतील लोकांना आपली परिस्थिति

सुधारण्याचा एक नवा मार्ग चीन दाखवीत आहे असें वाटत होतें. चिनी लोकांची ही कर्तबगारी एकदां स्वतःच्या डोळ्यांनीं पहावी असें राहून राहून माझ्या मनांत येई.

अशा संधीची मी कित्येक वर्षें वाट पहात होतों. १९३७ सालची गोष्ट. जपाननें चीनवर आक्रमण केलें होतें. चीनविषयीं सहानुभूति असल्यानें चिनी लोकांच्या मदतीसाठीं कॉंग्रेसतर्फे एक वैद्यकीय पथक चुंगकिंग येथें पाठविण्यांत आलें होतें. या पथकाची सर्व व्यवस्था माझ्याकडे होती. कारण कॉंग्रेसनें स्थापन केलेल्या चीन सहाय्यक मंडळाचा मी कार्यवाह होतों. चीनशीं माझा हा पाहिला संबंध. तेव्हांपासून चीनसंबंधी जितकी म्हणून मला माहिती मिळवितां आली तितकी मिळवून मीं वाचली. एडगर स्नो, एपस्टेन, गूंथर स्टेन वगैरे लेखकांनीं माओत्से तुंग व त्याचें कार्य याची खूपच प्रशंसा केल्याचें मीं वाचलें होतें. कम्युनिस्ट चीनमध्यें कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचें असें फारसें प्रस्थ नसावें—एवढंच नव्हे तर अवघा चीन एका छत्राखालीं यावा आणि जनतेला पुरोगामी राज्यपद्धतीचा लाभ मिळावा यासाठीं चीनमधील पुढारी नव्या नव्या सुधारणा घडवून आणीत आहेत असें या लेखकाचें मत होतें.

साम्राज्यवाद आणि लांचलुचपत यांच्या वरवंट्याखालीं चीन गेलीं अनेक शतकें भरडला गेला होता. भारत आणि आशियांतील मागासलेलीं राष्ट्रें यांच्यापुढें आज ज्या समस्या आहेत त्याच चीन पुढें होत्या.

दुष्काळ, अज्ञान, दुःख आणि दारिद्र्य यांनीं चिनी लोकांचें जीवन असह्य व असहाय्य झालें होतें. अशा परिस्थितीतही त्यांचें स्मित आणि शांतताप्रेम ढळलें नाहीं. गेलीं दोन हजार वर्षे भारत व चीन हे शेजारी म्हणून रहात होते. एकमेकांच्या सहकार्यानें आणि समजुतीनें पुष्कळशीं कार्यें आपणांस साधतां आलीं. कला, धर्म, तत्वज्ञान आणि वाङ्मय ह्याबाबत आपण एकमेकांपासून कितीतरी शिकलों. अनेक शतकांपूर्वीं या दोन्हीं देशांतील प्रवासी येऊं जाऊं लागले आणि त्यांनी एकमेकांपासून स्फूर्ति आणि सामर्थ्य हीं घेतली.

तक्षशिला, लुंगमेन आणि टाटुंग येथें अजूनही याचे मागोवे मिळतात. चीनमधील चँग के शेक यांचं अधिराज्य आतां संपलं आहे. सगळा चीन देश आतां एक झाला आहे. कम्युनिस्ट पक्ष आणि माओत्से तुंग यांच्या प्रभावी नेतृत्वाखालीं महान् सुधारणा घडून येत आहेत. चिनी लोकांचें जीवनमान प्रतिदिनीं सध्यां सुधारत आहे. असें भारतांतील कम्युनिस्ट मानतात. मोठ-मोठ्या योजना वेळेआधीं पुऱ्या होत आहेत. लक्षावधि लोकांच्या राष्ट्रीय प्रेमानेंच ही किमया घडून येत आहे. एकीकडे भारतांत अन्नटंचाई व वस्त्र-कपात दिसत आहे तर त्याचवेळीं चीनमध्यें शिक्षण, घरें आणि वैद्यकीय मदत या बाबतची परिस्थिति झपाट्यानें सुधारत आहे असाही हिंदी कम्यु-निस्टांचा दावा आहे. ते म्हणतात–लोकांच्या राज्यांत कोणीही स्थानबद्ध असतां कामा नये. जनतेच्या मनांत दहशत निर्माण करून शांतता नांदतां कामा नये. व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होतां कामा नये. अशा राज्यांत लांचलुचपत, साम्राज्यवादी छळणूक यांचा नाश करण्यासाठींच हुकुमशाहीचा वापर करण्यांत यावा. एरवीं लोकराज्याचीच स्थापना झाली पाहिजे. राष्ट्रीय स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, अन्न, वस्त्र आणि समान हक्क यांची जपणूक चीन देशांत होत आहे. या विचारप्रणालीला आव्हान देण्याची माझी इच्छा नव्हती. खरं म्हटलं तर चीनबद्दल इतरांनीं मतें देण्याऐवजीं चिनी लोकांनींच आपला अभिप्राय व्यक्त केला पाहिजे. लोककल्याणाचा मार्ग चीननें यशस्वी रीत्या चोखाळला असेल तर भारतासारख्या त्याच्या शेजाऱ्याला साहजिकच आनंद नाहीं का *वाटणार ? मीं चीनला गेलों तर या प्रश्नांचीं उत्तरं मला* मिळतील असा चीनला जाण्यांत माझा आणखी एक हेतु होता.

म्हणून चीनला जाण्याचं निमंत्रण मीं तात्काळ स्वीकारलं. चीनमध्ये आमचा सुमारें सहा आठवडे मुक्काम होणार होता. चीनमधल्या अनेक संस्थांनीं आम्हाला भेटीचीं निमंत्रणेंही दिलीं होतीं. माझ्या चीनच्या दौऱ्याच्या अहवालांना भारतीय वृत्तपत्रांत प्रसिद्धि मिळेल अशी मीं व्यवस्था लगेच केली. १ ऑक्टोबर १९५१ हा चीनच्या सार्वभौमत्वाचा दुसरा वाढदिवस. त्या निमित्तानें पेकिंगमध्यें आमचा पंधरा दिवस मुक्काम होणार होता. मुकडेन,

टिएनासिन, नॅनाकिंग, शांघाय व कँटन या शहरांना आम्हीं भेटी देणार होतों. चीनमधील शेतकीविषयक आणि औद्योगिक सुधारणांची आम्ही या मुक्कामांत पहाणी करणार होतों. खेडेगावांना भेटी देणें आणि हॅकॉची येथील आरोग्य मंदिर पहाणें हा कार्यक्रमही आमच्येसाठीं आंखण्यांत आला होता.

आमच्या दौऱ्यांत अनेक ठिकाणीं अनेक भाषणें आम्हीं ऐकिलीं. आमचेसाठीं झालेल्या स्वागतसमारंभांत कम्युनिस्ट चीननें केलेल्या सुधारणांचे गायलेले पवाडे आम्ही ऐकले. सरकारी अधिकाऱ्यांनीं आंकडेवार माहिती दिली पण ते सर्व कागदी घोडे होते असें आम्हांला आढळून आलें. एवढेंच नव्हे तर वृत्तपत्रें, मासिकें आणि पुस्तकें यांत येणारा मजकूर ठरावीक साचाचा असे; त्यांत तफावत अथवा मतभिन्नता नसे. प्रत्यक्ष सुधारणांपेक्षां त्यांच्या जाहिराती नी गाजावाजाच सर्वच दिसून येई. जेथें हीं कामें चालत, तेथेंच आम्हांस नेण्यांत येई. कम्युनिझम हे नवचीनचें आराध्य दैवत आहे याचा ठसा आमच्यावर उमटविण्यांत येई.

दौरा संपवून भारतांत परत आल्यावर माझ्यापुढें चांगलाच पेंच पडला. वस्तुस्थिति आणि जाहिरातबाजी हीं वेगळी करणं जड जाऊं लागलं. त्यांतच माझ्या स्वतंत्र निरीक्षणाची नि त्यामुळें झालेल्या विचारांची गर्दी उसळली. मला माझं मन निःपक्षपाती ठेवायचं होतं. माझे विचार अबाधित ठेवावयाचे होते. मला माझं मत स्पष्टपणें बोलून दाखवावयाचं होतं. पण तें शक्य होई-लसें दिसेना. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया ही भारतांतील एक मोठी वृत्तपत्र वित-रक संस्था. या संस्थेला पेकिंग येथें आपला एक कायम प्रतिनिधि ठेवावयाचा होता. त्या दृष्टीनें भारत सरकारचेही प्रयत्न चालू होते. अशा वेळीं चीनच्या विरुद्ध मी बोलणं म्हणजे चीनला जाण्याचा मार्गच बंद करण्यासारखं होतं. म्हणून मी त्यावेळी मतप्रदर्शन केलं नाहीं.

१९५२ च्या मार्चमधील गोष्ट. चीनमधील मे दिनाच्या समारंभाला हजर रहाण्यासाठीं भारत सरकारतर्फे एक प्रतिनिधिमंडळ जावयाचं होतं. या शिष्टमंडळाबरोबर प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचा प्रतिनिधि म्हणून जाण्यासंबंधी

मला विचारणा करण्यांत आली. असली संधी मी थोडाच सोडणार ? मी तें आमंत्रण स्वीकारलं नी चीनला निघालों. यावेळी मी एक पत्रकार म्हणून खाजगीरीत्या चीनमध्यें जात होतों. चीनमध्यें खाजगीरीत्या जाणाऱ्याला प्रवास आणि रहाणें या बाबतींत अनेक अडचणी येतात हें मला माहीत होतें. ओळख पत्र तर हवेंच. शिवाय चिनी नाणें घेण्यासाठी परवान्यांची आवश्यकता होती. जाण्याचे ठरविण्याच्या आधीं याबाबतींत व्यवस्था करणें जरूर होतें. पेकिंग येथील भारतीय वकील श्री पाणिक्कर यांच्या मार्फत ही व्यवस्था करण्यांत यावी अशी भारत सरकारच्या परराष्ट्रीय खात्यास मी विनंति केली. मी चीनला जाणें हें चिनी लोकांस मान्य असल्याने परवान्यांबाबतच्या सर्व गोष्टीं शक्य होतील असें भारत सरकारनें मला कळविलें. एवढें असलें तरी कम्युनिस्ट बातमीदारांनांच चीनमध्यें सर्व सवलती मिळतात हें मला माहीत असल्यानें निघतांना याबाबत मीं जरा साशंकच होतों.

माझ्या या शंकेला आणखीहि एक कारण होतें. माझ्या चीनच्या पहिल्या दौऱ्याचा वृत्तांत मीं भारताच्या पंतप्रधानांना सादर केला होता. चीनमध्यें भरपूर धान्य-निर्यात करण्याइतकें असूनहि चीनमध्यें आर्थिक प्रगति फारशी झालेली नाहीं असें मीं या अहवालांत म्हटलें होतें. हा वृत्तांत चिनी सरकारच्या हातीं पडला असता तर त्या सरकारचें मत मजविषयी कलुषित झालें असतें हें मीं ओळखून होतों. आमच्या शिष्टमंडळांतील सभासदांना भारत सरकारनें या वृत्तांताच्या प्रती पुरविल्या होत्या. त्या आतां परत घेणें अशक्य होतें.

मीं चीनला तर निघालों. पण कँटनला पोहोंचतांक्षणींच अडथळ्यांना सुरवात झाली. कँटन येथें आम्हीं एक भिकारी पाहिला. आपल्या मुलाला त्यानें पाठीवर घेतलें होतें. या भिकाऱ्याचा फोटो काढण्याची कल्पना आमच्यापैकीं एकाच्या मनांत आली. त्यानें एक फोटो घेतला. मींही फोटो घेणार इतक्यांत आमच्या बरोबर असलेल्या दुभाषानें माझ्या कॅमेऱ्याच्या भिंगावर हात ठेवून मला फोटो घेण्याची बंदी केली. दुसऱ्या दिवशीं आमच्या शिष्टमंडळाच्या चिटणिसाकडून मला एक खलिता मिळाला. मना केलेल्या ठिका-

णांचा मीं फोटो घेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल चिनी सरकारनें नापसंती दर्शविली आहे असें त्या खलित्यांत म्हटलें होतें. या तक्रारीचें मला आश्चर्यच वाटलें. माझा निरपराधीपणा सिद्ध करण्यासाठीं मीं माझ्या कॅमेऱ्यांतील फिल्म दाखविण्याचीहि तयारी दाखविली. पणं त्याचा कांही उपयोग झाला नाहीं. मीं परकीय बातमीदार असल्यानें मला फोटो घ्यावयाचे असतील तर आगाऊ परवानगी घ्यावी लागेल असें मला सांगण्यांत आलें. हें प्रकरण येथेंच संपलें असें मला वाटलें.

आम्हीं पेकिंगला पोंहोचलों. तेथील भारतीय वकिलातीकडे मीं माझ्या आवश्यक कागदपत्रांची चौकशी केली. (चीनमध्यें गेल्यानंतर परवाने व इतर कागदपत्र मिळण्यास अडचण पडणार नाहीं असें भारत सरकारकडून मला कळविण्यांत आलें होतेंच). कांहीं कागदांवर सह्या कराव्या लागतील व सुमारें अर्ध्या तासांत कागदपत्र माझ्या हातीं पडतील असें वकिलातींत मला सांगण्यात आलें. पण या अर्ध्या तासाचे सात दिवस झाले. श्री. पणिक्करांच्या मतें मीं एक ' अनिष्ट इसम ' होतों म्हणे !

श्री. पणिक्कर हे एक ठेंगणेसे गृहस्थ आहेत. त्यांनीं बारीकशी दाढी ठेविली आहे. आपल्या स्वतःच्या उद्गारावर खूष होऊन डोळे मिचकविण्याची त्यांस संवय आहे. ते तडफदार नी संभाषणचतुर आहेत. त्यांनीं अनेक वर्षे निरनिराळ्या संस्थानिकांच्या पदरीं नौकऱ्या केल्या असल्यामुळें अधिकारारूढ असलेल्या व्यक्तीस खूष करण्याची त्यांस संवयच लागली आहे. त्यांच्या विषयीं बोलतांना एकदां पंडितजी म्हणाले—" श्री. पणिक्कर यांच्याबरोबर जो जाईल तो पेकिंगमध्यें कम्युनिस्ट व वॉशिंग्टनमध्यें स्वातंत्र्यवीर होऊन परत येईल. "१९४८ सालीं चीनमध्यें ज्यावेळीं चंग के शेक सत्तारूढ होता त्यावेळीं श्री. पणिक्कर हे नॅनकिंग येथें भारत सरकारचे वकील होते. चँग के शेकशीं तह करण्याचा त्यावेळीं त्यांनीं भारत सरकारला सल्ला दिला होता. १९५१ च्या ऑक्टोबरमध्यें पेकिंग येथें मीं त्यांना भेटलों, त्यावेळीं चीनमधील नव्या राष्ट्रीय सरकारचीं स्तुति स्तोत्रें गाण्यास त्यांनीं

सुरवात केली. त्यांनीं दिलेले आंकडे हे कम्युनिस्ट चीनच्या प्रचारपत्रकांतील होते हें मला नंतर आढळून आलें !

चीनला ही माझी दुसरी भेट. यावेळीं परिस्थिति बदलली होती. दरम्यानच्या काळांत भारतांत सार्वत्रिक निवडणुका झाल्या होत्या नी त्यांत अधिकारारूढ कॉंग्रेस–पक्षाला मीं विरोध केला होता. तसेंच माझ्या अहवालांत मीं श्री. पणिक्कर यांचीं कांही विधानें खोडून काढलीं होतीं. त्यामुळें माझ्या कार्यांत अडथळे आणण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. अर्ध्या तासाचे कामाला सात दिवस लागण्या मागचा हा इतिहास आहे.

भारतीय वकिलातींत असलेल्या एका लहानश्या घरांत एका मित्राच्या कृपेनें मला सात दिवस रहावें लागलें. जेवण नाहीं, पैसा नाहीं, शहरांत फिरावयास जावें तर परवाना नाहीं. अखेर मीं प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाला झालेली हकिकत कळविली. त्यांनी भारत सरकारच्या परराष्ट्रीय खात्याच्या साहाय्यानें मला हवे असलेलें परवाने मिळवून दिले.

मला परवाने मिळण्यास उशीर कां लागला हें गूढ माझ्या या ‘ कैदेंत ’ मला उकललें नाहीं. माझा पहिला अहवाल चिनी सरकारच्या हातीं पडला होता आणि त्यामुळें परवाने मिळण्यास विलंब लागत आहे असें श्री. पणिक्कर मला सांगत. पण नंतर मला असें कळलें कीं ही सर्व कारवाई त्यांचीच होतीं. भारतीय शिष्टमंडळाला माझीं चीनसंबंधींचीं मतें त्यांनींच सांगितली होती. आणि भारत सरकारकडून माझ्यासंबंधीं आलेल्या सूचना आपल्याला मिळाल्याच नाहींत असें त्यांनीं सांगितलें होतें. वर वर्णन केलेलें फोटो प्रकरण मात्र त्यांनीं भारत सरकारला कळविलें होतें. याबाबत भारत सरकारनें अधिक खुलासा मागितला तेव्हां, “ चिनी सरकारकडे आपण रदबदली करीत आहोंत ” असें त्यांनीं सांगितलें. अर्थातच ही रदबदली व्यक्ति म्हणून होती. वृत्तपत्र-प्रतिनिधि यादृष्टीनें माझ्यासाठीं कांहींच केलें गेलें नाहीं.

अखेर परवाने तर हातीं आले. पण एक नवीन प्रकरण उद्भवलें. चिनी सरकारविरुद्ध असलेल्या बातम्या बाहेर पाठविणार नाहीं अशी माझ्या-

बाबत चिनी सरकारनें हमी मागितली आहे आणि त्यासाठीं बातम्या पाठविण्याआधीं भारतीय वकिलातीकडून मीं त्यांस मंजुरी घ्यावी असें मला कळविण्यांत आलें. माझ्या बातम्यांचे क्षेत्र भारतीय शिष्टमंडळापुरतेंच मीं मर्यादेंत ठेवावें आणि शिष्टमंडळाबरोबर असतांना कसलेही प्रश्न विचारूं नयेत अशीही मला समज देण्यांत आली.

या अटी चिनी सरकारनें घातल्याच नव्हत्या असें मला नंतर कळलें. त्यामुळें पेकिंग सोडल्यानंतर मीं त्यांना किंमत दिली नाहीं.

खरं म्हटलं तर अशा परिस्थितींत मीं परत फिरणंच योग्य होतं. पण माझ्या चीनभेटीनंतरची तेथील परिस्थिति पहाण्यास मीं उत्सुक होतों. शिष्टमंडळाच्या औपचारिक कार्यक्रमाचा मला कंटाळा आला होता. सरकारी प्रवक्त्यांची भाषणें कोणत्या स्वरूपाची असतात हेंही मीं जाणून होतों. म्हणून डोळे उघडे ठेवून दिसतील त्या घटना टिपाव्या नी मनांतल्या मनांत त्यांची संगति लावावी असें मीं ठरविलें.

चीनमधील कोणत्याही शिष्टमंडळाचा प्रवास चिनी सरकारच्या इच्छेप्रमाणें ठरावयाचा. भाषणें, चर्चा, सभा वगैरे कार्यक्रम दुभाष्यांच्याच मार्फतीनें चालावयाचे. हे दुभाषे हुषार आणि डोळ्यांत तेल घालून असत. चिनी माणसास इंग्रजी येत असलें तरी तो इंग्रजींत बोलण्यास तयार नसे. त्यामुळें सर्व माहिती चिनी दुभाषे देतील तशीच स्वीकारावी लागे. इंग्लंड व अमेरिका येथें शिकलेल्या व इंग्रजी बोलतां येणाऱ्या अनेक प्राध्यापकांना मी माझ्या पहिल्या प्रवासांत भेटलों होतों. पण ते माझ्या प्रश्नांची उत्तरें तर इंग्रजींत देत नसतच, शिवाय मीं विचारलेला प्रश्न समचला असूनहीं न समजल्याचा आविर्भाव आणीत आणि दुभाष्याकडून प्रश्नांचें भाषांतर करवून घेत. दुभाष्यांचें इंग्रजी बेताचेंच असे. त्यामुळें त्याचें भाषांतर ओबड धोबड होई व प्रश्न करूनही आम्हाला चमत्कारिक उत्तर मिळे.

मॅडम सन् यत् सेन यांचें सर्व शिक्षण अमेरिकेंत झालेलें. पण आपण इंग्रजी विसरलों असें त्या म्हणत व इंग्रजी बोलण्याचें टाळीत.

श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांच्याकडे आमच्या शिष्टमंडळाचें नेतृत्व होतें. पण मॅडम सन् यत् सेन यांच्याशीं बोलतांना त्यांनाही दुभाषाची मदत घ्यावी लागे. ऑक्टोबर १९५१ मध्यें मॅडम सन् यत् सेन यांची व आमची पहिली मुलाखत झाली होती. त्यावेळीं त्यांचे वय झालें होतें नी त्या स्थूलही दिसत होत्या. तरुणपणीं त्या अत्यंत सुंदर दिसत असें. मीं ऐकलें होतें. अद्यापही त्या देखण्या आहेत नि त्यांचें व्यक्तिमत्त्व प्रभावी वाटतें. चिनी कम्युनिस्ट लोकांचा निळा गणवेष त्यांस आवडत नसे. काळा पण आकर्षक असा त्यांचा नेहमीं पेहेराव असे. त्यांचे केस काळे दिसत व त्यांचा त्यांनीं अंबाडा घातलेला असे. त्यांचं चालणं जलद असे नी चेहेऱ्यावर विषादाची छाया दिसे. कम्युनिझमचा त्यांना कंटाळा तर आला नसेल ? आजचे कम्युनिस्ट मधून मधून सन् यत् सेन यांची प्रशंसा करतात हें जरी खरं असलं तरी त्यांना महत्व देण्यास ते तयार नाहींत. आमचे मॅडम सन् येत सेन यांचेशी झालेलें संभाषण अगदीं औपचारिक झालें. भारताला भेट देण्याची आम्हीं त्यांस विनंति केली. इतर कांहीं प्रश्नांवर त्यांनीं खोकला पडसें झाल्यामुळें आवाज बसला आहे या सबबीवर बोलण्याचें टाळलें. सुरवातीस आमचें बोलणें दुभाषामार्फत चालू झालें पण हळू हळू त्या सुंदर इंग्रजी बोलू लागल्या.

मॅडॅम कुंग पेन या चीनच्या माहिती व संशोधन खात्याच्या प्रमुख आहेत. त्याही चांगलें इंग्रजी बोलूं शकतात. एका प्रदर्शनाच्या ठिकाणीं त्यांचीं व माझी भेट झाली. प्रदर्शनाबाबतचें माझें मत अजमावण्याच्या हेतूनें त्यांनीं मला बरेच प्रश्न विचारले. पण आमच्या शिष्टमंडळाचे दोन सदस्य त्यांना त्यांच्या कचेरींत भेटावयास गेले असतां त्यांनी इंग्रजींत बोलण्यास नकार दिला !

इंग्रजीच्या विरोधाबद्दल माझ्या एका मित्राशी मीं चर्चा केली. राष्ट्राभिमान व राष्ट्रीय धोरण या दृष्टीनें आम्हीं इंग्रजींत बोलण्यास नाखूष असतों असें तो म्हणाला. मला मात्र असें वाटलं. या हट्टाऐवजीं आपल्याकडे आलेल्या पाहुण्याशीं त्याला समजेल अशा भाषेंत बोलण्यांतच अधिक सौजन्य व सौहार्द आहे.

भारतातर्फे गेलेलें हें शिष्टमंडळ सदिच्छेचं होतं. भाषेच्या कसरती करायला तें एखादं राजकीय शिष्टमंडळ थोडंच होतं ? पण कम्यूनिस्ट राष्ट्रांच हें एक वैशिष्टयच असावें असं मला वाटतं. आपलं बोलणं परकीयांपर्यंत जाऊन पोंहोंचण्याआधीं आपल्या सहकाऱ्यांत एकदोनदां तें तपासणं बरं अशी त्यांची रीत असावी. संभाषणावर असं बंधन पडलं कीं माहिती, भाषणं यांत तोच तोचपणा येतो नी पाहुण्याच्या पदरांत ज्ञान असं फारच थोडं पडतं. पाहुण्यांना द्यावयाची माहिती, आंकडे, वर्णनं हीं बहुधा तावून सुलाखून घेतलेलीं असतात. एवढंच नव्हे तर तीं पूर्वींच लिहून तयार केलेली असतात. एखादी गोष्ट वारंवार निरनिराळ्या लोकांनीं सांगितली कीं सर्वसाधारण माणसाचा तीवर विश्वास बसतो. चीनमध्यें सध्यां हाच प्रकार चालू आहे. चीनहून परत आलेलीं स्वतंत्र विचारांचीं माणस जर वारंवार घडलेल्या त्याच त्याच हकीगती आपलीं मतं म्हणून सांगत असतील तर त्यांत आश्चर्य वाटण्याचं कारण नाहीं.

यावर कोणी म्हणेल कीं समजा तुम्हीं अशा 'तथाकथित' हकीगतींवर विश्वास ठेवणार नाहीं. पण तुम्हीं तुमच्या डोळ्यांनीं तेथील परिस्थिति पाहिलीच असेल ना ? चीनमधून परत आल्यानंतर तेथील हकीगती सांगण्यासाठीं आम्हांला बोलावीत आणि आमचीं निःपक्षपातीं मतें ऐकण्याची अपेक्षा करीत. पण आम्हीं पहाणार तरी काय ? ज्या ठिकाणीं आम्हांला नेतील तींच स्थळें ना ? चीनमध्यें जाणाऱ्या पाहुण्यांसाठीं कार्यक्रम अगोदरच आंखण्यांत येतो. तो स्वीकारणें अथवा नाकारणें एवढेंच त्या पाहुण्याच्या हातीं असतें. कार्यक्रम पत्रिकेंत नसलेल्या एखाद्या ठिकाणीं तो जाउं म्हणेल तर अगाउ परवानगीशिवाय तें शक्य होत नाहीं. ठरलेल्या ठिकाणीं जाण्यास त्यास फार तर नकार देतां येईल पण ज्या ठिकाणीं त्याला स्वतःला जावेंसें वाटेल तेथें जाणें त्यास शक्य होणार नाहीं. बरं या बाबतींत भाषेचीच अडचण येते असें नाहीं. एक उदाहरणच देतों. ठरलेल्या कार्यक्रमाऐवजीं पेकिंग विश्वविद्यालयांतील कांहीं परकीय प्राध्यापकांस भेटावें असें शिष्टमंडळांतील एका सदस्याच्या मनांत आलें. या प्राध्यापकांसाठीं या सदस्याजवळ ओळखपत्रेंही होतीं. या शिष्टमंडळाबरोबर जो दुभाषा देण्यांत आला होता तो शिष्टमंडळाच्या इतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्र. वि:
क्रमांक ......... नों: दि: .........

सदस्यांबरोबर निघून गेला होता अखेर हे गृहस्थ कसे बसे विश्वविद्यालयापर्यंत तर जाऊन पोहोंचले. व हातांतील ओळखपत्र दाखवीत प्राध्यापक महाशयांचा तपास करूं लागले. पण त्यांना त्या प्राध्यापकांकडे नेण्यास कोणीहि तयार होईना. अखेर इंग्रजी बोलतां येणारा एक इसम त्यांच्या जवळ आला व पूर्व-सूचनेशिवाय प्राध्यापकाची भेट घेणें अथवा विश्वविद्यालय पहाणें यांस तुम्हास परवानगी मिळणार नाहीं असें त्यानें सदस्य महाशयांस सुनावलें. सदस्यांना आपल्या मित्रांना भेटतां आलें नाहीं. हात हालवीत त्यांना आपल्या हॉटेलकडे परत यावें लागलें. हें प्रकरण एवढ्यात्रच थांबलें नाहीं. विश्वविद्यालय हें एक संरक्षित स्थळ आहे. आणि दुभाषाला बरोबर घेतल्याशिवाय त्यांनीं तेथें जायला नको होतें अशा या सदस्याला या बाबतींत कानपिचक्या मिळाल्या.

एवढं मात्र खरं कीं पाहुण्यांच्या आवडीनिवडी यांसंबंधी अगोदर विचारणा करण्यांत येई. व तत्संबंधीं सर्व ‘ व्यवस्था ’ पुरी झाली म्हणजे त्या पाहुण्याला तेथें नेण्यांत येई. पाहुण्याच्या आवडीचें ठिकाण ‘ दाखवण्यास लायक नाहीं ’ असें यजमानास वाटलें तर ‘ असें ठिकाण अस्तित्वांतच नाहीं ’ असें उत्तर मिळे.

चीनच्या माझ्या पहिल्या भेटींत नॅनकिंग विद्यापीठानें भरवलेलें एक प्रदर्शन मी पाहिलें होतें. नॅनकिंग विश्वविद्यालय स्थापन करण्याची एका अमेरिकन मिशनऱ्याला दिलेली सनद ह्या प्रदर्शनांत ठेवण्यांत आली होती. चिनी संस्कृतीवर या प्रकारानें अमेरिकन साम्राज्य वाद्यांना आक्रमण कर-ण्याची इच्छा होती असा थोडासा पुरावा या सनदेमुळें मिळण्याचा संभव होता. याच प्रदर्शनांत राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांवरील कांहीं प्रमुख पुस्तकेंही मांडलीं होतीं. ब्रिटिश लोकांनीं चिनी विद्यार्थ्यांचें मानसिक धैर्य खच्ची करण्याचे प्रयत्न केलेले होते असें या पुस्तकांतील कांहीं परिच्छेदांवर तांबड्या पेन्सिलीच्या खुणा करून दाखविण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला होता. नानकिंग विश्वविद्यालयासाठीं अमेरिकेनें लक्षावधी डॉलर्स खर्च केले होते हें मला माहीत होतें. म्हणून शिष्टमंडळाच्या कार्यक्रम पत्रिकेंत नानकिंग विश्वविद्याल-याला भेट देण्याचा कार्यक्रम अंतर्भूत करावा असें मी सुचविलें. आमच्या शिष्ट-

मंडळांत कांहीं शिक्षण शास्त्रज्ञ असल्यामुळें या भेटीच्या निमित्तानें त्यांच्या नजरेस हे प्रकार आणावेत असा माझा हेतु होता. आमच्या शिष्टमंडळाच्या कार्यवाहानें या भेटीची व्यवस्था करण्यास विनंति केली. परंतु " अशा तऱ्हेचे विश्वविद्यालय नानकिंग येथें नाहीं " असें या विनंतीस उत्तर मिळालें. कदाचित् आमच्या यजमानानी विस्मरणानें हें उत्तर दिलें असेल असें मला वाटलें म्हणून आम्हीं या भेटीसाठी अधिक आग्रह धरला. तेव्हां ही भेट ठरविण्यांत आली. परंतु या भेटींत एक दोन प्राध्यापकांची गांठ पडणें व एक वर्ग पहाणें एवढाच कार्यक्रम आंखण्यांत आला. अशा तऱ्हेची आणखी किती तरी उदाहरणें देतां येतील. माझ्या या विधानास कित्येक लोक आक्षेपही घेतील. आम्हांस पहाव्याशा वाटणाऱ्या गोष्टी दाखविण्याची बंदी करणें असें म्हणणें म्हणजे आमच्या यजमानांबद्दल अनादर व्यक्त केल्याचेंही पाप लागेल. परंतु सत्य हें कटु असलें तरी सांगितलेंच पाहिजे. शिवाय हे प्रयत्न आमच्या देशाच्या स्वातंत्र्याला व लोकशाहीला बाधक ठरणारे आहेत व कम्युनिस्ट पद्धतीनेंच देशाची प्रगति होऊं शकते असें भासविण्याचा हा प्रकार आहे म्हणून या घटनांचा मी मुद्दाम उल्लेख करीत आहे.

बंधनें अनेक घातलीं तरी मनुष्य आपल्या डोळ्यानें कांहीं दृश्यें पहातोच व त्यामुळें मनावर कांहीं संस्कार हे होतातच. चीनमधील आर्थिक व औद्योगिक प्रगतीचा ज्याने इतिहास अवलोकिला आहे; त्याना या दृश्यांच्या साहाय्याने तेथील आजची प्रगती अजमावता येतेच. भरपूर पुरावा मिळाल्याशिवाय कोणत्याही गोष्टीच्या मान्यामान्यतेचा निर्णय करण्यास मन खंबीर असेल तर प्रचाराच्या धडाक्यांत सुद्धां सत्यशोधन अवघड नाहीं. सुदैवाने चीन अजून कम्युनिस्ट पद्धतीच्या पाशांत पूर्णपणें सांपडला नसल्यानें हें सत्यशोधन सुकर झालें आहे. तेथें सर्व देशाची अजून एकी साधावयाची आहे. लक्षावधी लोकांपुढें भाकरीचा प्रश्न अजून ज्वलंत आहे. चीन संघटित झाला आहे हें खरें आहे. पेकिंगहून मुकडेन पासून कँटनपर्यंत आणि सिॲन पासून शांघायपर्यंत राज्याची सूत्रें हालत आहेत. परंतु या राज्यसत्तेचा लोकांवर पूर्णपणें पगडा ठेवणारी शासन संस्था

तेथें अस्तित्वांत यावयाची आहे. मुक्तता हा शब्द अजून रूढ व्हावयाचा आहे. त्यांचे शाश्वत प्रश्न अजून तेवढेच विराट आहेत. याबाबत मी अनेकांना प्रश्न विचारले. त्यांचीं मिळालेलीं उत्तरें ध्यानांत ठेवलीं. हे प्रश्न वारंवार विचारलेले आमच्या बरोबरच्या चिनी अधिकाऱ्यास आवडले नाहींत. परंतु मला मिळालेलीं उत्तरें मात्र उद्‌बोधक होतीं. एक म्हणाला "राशियन लोकांनीं मांचुरियामधील सर्व यंत्रसामुग्री नेली व त्यांपैकीं फारच थोडी परत केली ",तर दुसऱ्यानें उद्‌गार काढले " उत्तर कोरियांतल्या लोकांनीं उगीच घिसाडघाई केली ".

चीनमधील माझ्या भेटी अगदीं थोड्या काळांत झाल्या. हेंही एक प्रकारें बरें झालें. कारण ह्यामुळें मला माझी माहिती पारखून घेता आली. १९३९ ते १९४२ पर्यंत भारतीय राष्ट्रीय योजना समितीचा मी एक कार्यवाह होतों. ह्यामुळें मागासलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक प्रगतीची धाव कोठपर्यंत जाते याची मला कल्पना होती. राष्ट्रीय व वैयक्तिक स्वातंत्र्य मिळणें आणि माणुसकीला योग्य अन्नवस्त्र व निवारा मिळणें या दलित क्षुधार्त जनतेच्या मूलभूत अपेक्षा असतात हें मला माहीत होतें. या गरजा भागविण्यासाठीं आशिया आणि आफ्रिका यांतील विदीर्ण ( frustrated ) लोकांनीं कम्युनिझमचा आश्रय केला होता हेंहीं मीं पाहिलें आहे.

चिनी लोकांबद्दल मला नितांत आदर आहे. त्यांनीं दिलेला स्वातंत्र्याचा लढा आणि मिळविलेली शांतता ही जागतिक लढ्याचा भाग आहे हें मी जाणतों. परस्पर परिचय आणि मैत्री यांच्या साहाय्यानेंच चीन व भारत आपलीं उद्दिष्टें अधिक चांगल्या प्रकारें साध्य करूं शकतील हें मला माहीत आहे. पण हुकूमशाहीचा कोणताही प्रकार लोकांना कायम दास्यांत ठेवतो आणि शांतता व प्रगति यांस धोका निर्माण करतो असें माझें ठाम मत आहे. चिनी लोक कम्युनिस्ट राजवटींत सुखी असते तर या प्रश्नाचा विचार करण्याचीच जरूर नव्हती. भारत व चीन सुखानें व सहकार्यानें राहिले असते. पण चीन बाबतचीं फसवी चित्रें रंगवून आणि दलित व अज्ञान लोकांना एकमेकांशीं झगडत ठेवून आंतरराष्ट्रीय कम्युनिझमनें आशियांतील शांततेस धोका आणला आहे. म्हणून मी हें चित्र रेखाटीत आहे.

कम्युनिस्ट लोकांनीं भारतीय निवडणुकीच्या वेळीं पुष्कळ भाग घेतला हें मला माहीत आहे. त्यांच्या प्रचाराचा ह्या वेळीं भारतीय जनतेवर परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. चीनला दिलेल्या पहिल्या भेटीच्या वेळीं माझ्या बरोबर असलेल्या कम्युनिस्ट लोकांनी वारेमाप कौतुक करण्यास सुरुवात केली. चीन व भारत यांची मैत्री व सहानुभूति आज अनेक शतकें चालत आलेली आहे. त्याचा या लोकांनीं फायदा घेतला व लोकांना भारून टाकलें. भारतीय शिष्टमंडळाचे इतर सभासद सौजन्याच्या भावनेनें गप्प बसले. अर्थातच चीनमधील प्रगतीचा हा प्रचार आशियांतील लक्षावधि लोकांवर हळूहळू होऊं लागला आहे. स्वातंत्र्य, शांतता आणि प्रगति हीं मूलभूत तत्त्वें साध्य करण्यासाठी जनता झगडत आहे. परंतु कम्युनिस्ट हुकूमशाहीच्या आहारीं गेल्यामुळें हीं तत्त्वें साध्य तर होणार नाहींतच उलट दुरावतील याची आशियांतील लोकांस कल्पना नाही.

चीन सारख्या मोठ्या देशाचें मीं केवळ वरवर निरीक्षण केलें आहे. आणि चिनी लोकांनी 'दाखविण्यास लायक' अशा शेरा मारलेल्या गोष्टीच मीं पाहिल्या आहेत हें खरें. माझीं विधानें कदाचित् अवास्तव आणि असमर्थनीयही असतील पण मानव ज्ञातीची उन्नति व्हावी अशी ज्यांची इच्छा आहे अशांनीं घातुक कल्पनांनीं भारून जाऊं नये म्हणून मी माझी स्पष्ट मतें देत आहे.

साधनें न्याय्य असावींत हें गांधीजींचे मत मला मान्य आहे. परंतु त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या आहारीं मीं पूर्णपणें गेलों नाहीं. "तुमच्या गरजा भागण्याची योग्य वेळ येईतों थांब" असें भुकेल्या लोकांना सांगणें हा मूर्खपणा आहे. परंतु साध्याचें साधन दुष्ट असलें तरी कांहीं काळ का होईना तें यशस्वी ठरतें याचा मला चीनमध्यें पडताळा आला. पण या दुष्ट साधनातच ध्येयाच्या संपूर्ण नाशाचीं बीजें रोवलेलीं असतात. हेंहि तितकेंच खरें.

मा ओत्सेतुंग यांच्या नेतृत्वाखालीं चिनी लोकांस स्वातंत्र्य व लोकशाही लाभली कीं नाहीं हें पाहण्यासाठीं मी चीनमध्यें गेलों. परंतु हें सरकार तेथें वर्गयुद्ध निर्माण करीत आहे असें मला दिसून आलें.

चीनमध्यें कम्युनिझमच्या सहाय्यानें कितपत प्रगति झाली आहे हेंही मला पाहावयानें होतें. कम्युनिझम हा खऱ्या ज्ञानार्जनाचा एकमेव मार्ग आहे व हाबद्दल शंका उपस्थित करणें मूर्खपणाचें आहे असें म्हणतात. आश्चर्याच्या पोटीं श्रद्धा उद्भवते. आर्थिक, सांस्कृतिक व शास्त्रीय प्रगतीचीं अनेक आश्चर्यें आपण निर्माण केलीं आहेत असें कम्युनिस्ट लोक मानतात. पण ज्या वेळीं मानवांची मनें स्वतंत्रपणें विचार करूं शकतात, निर्भीड होतात, प्रश्न विचारूं शकतात, शंका उपस्थित करूं शकतात त्याच वेळी प्रगति होते असें मी मानतों.

शास्त्रीय ज्ञानाच्या अभावीं उद्योगधंद्यांची चीनमध्यें कोंडी झाली आहे असें मला आढळून आलें. चीनमध्यें तंत्रविशारद थोडेच होते. परंतु त्यांचें बलिदान करण्यांत आलें. त्यांची बुद्धिमत्ता खर्ची करण्यांत आली.

जमिनींच्या सुधारणांमुळें चीनमधील लोक सुखी झालें हें खरें आहे. शांतता प्रस्थापित झाल्यामुळें, शेतीचीं कामें सुरळीत चालू झालीं हेंही खरें, परंतु चीनमधील शेतकऱ्यांच्या भावना आतां कम्युनिस्ट हुकूमशाहीसाठीं राबविल्या जात आहेत.

हुई ऊ चँग ऊला म्हणाला. "मनुष्य कधीतरी भावनाशून्य होऊं शकतो कां ?" चु नें ऊ म्हाणाला "हो"

हुई ऊ म्हणाला "ज्याला भावना नाहींत तो मनुष्यच नव्हे"

चुआंग ऊ म्हणाला "लाओने मानवाला वास्तवता दिली, परमेश्वराने आकार दिला. अशा परिस्थितीत त्यास मानव न म्हणणे कसें शक्य आहे."

हुई ऊ म्हणाला "हें जरी खरें असलें तरी अशा मानवाला भावनाविहीन रहाणें कसें शक्य आहे !

चुआंग ऊ म्हणाला "माझ्या बोलण्याचा अर्थ तुला कळला नाहीं. भावना विहीन असें ज्या वेळीं मी म्हणतो, त्या वेळीं दुसऱ्याच्या प्रेमाचा अथवा द्वेषाचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नाहीं. घटना जशा घडतील तशा तो स्वीकारतो. आयुष्याचा उपभोग तो घेऊ शकत नाहीं."

हुई ऊ म्हणाला "ज्या माणसाला आयुष्याचा उपभोग घेता येत नाहीं, त्याला शरीर असून तरी काय फायदा".

नवचीनमध्यें मला आशेचे किरण दिसले हें खरें. परंतु ते क्षणभुंगर होते. राष्ट्राच्या भावनांना चिरडून टाकणाऱ्या अंधारी वादळांत आतां पुन्हां ते सांपडले आहेत. त्यांची माणुसकी, सौजन्य, सहनशीलता व ज्ञानाची आवड हीं नष्ट होऊं पहात आहेत. चीनमधील ४०० कोटी लोक म्हणजे केवळ भावनाविहीन शरीरें ! ! हीं शरीरें हुकुमशाहीच्या सेवेमाठी राबणार आहेत. अन्नाच्या एका घासासाठीं त्यांनीं माणुसकीचा मोबदला दिला आहे.

★ ★ ★

## २ : नवीन राजवटीचा परिचय

सरकारी पाहुणा म्हणून चीनमध्यें प्रवास करणं हें फारसं सुखावह नाहीं. विमान वहातूक नाहीं. आगगाड्या मात्र स्वच्छ व नियमित असतात आणि बड्या पाहुण्यांसाठीं खास डबे राखून ठेवण्यांत येतात.

मी चीनमध्यें प्रथम गेलों त्यावेळीं प्रवाशांचें सामान तपासलें जाई. प्रवासांतहि हत्यारी शिपायांकडून प्रवाशांच्या सामानाची तपासणी होई. गाडींत तरूण लोक प्रचारात्मक भाषणें करीत व हस्तपत्रकें वाटीत.

आम्ही स्टेशनवर पोंहोंचलों. हातात फुलें घेतलेल्या अनेक तरुण व तरुणींनीं आमचें भव्य स्वागत केलें. त्यांच्या मागें अनेक संस्थांचें प्रतिनिधी होते. निवासस्थानीं पोंहोंचतांच आमच्या व्यक्तिशः ओळखी करुन देण्यांत आल्या. थोडासा अल्पोहार झाला. रात्रौ आम्हांस खाना देण्यांत आला. परस्पर मैत्रीची भाषणेंही झालीं. चीनमधील आमच्या मुक्कामांत सर्वसाधारणपणें आमचा असाच कार्यक्रम असे.

आम्हीं पेकिंगला पोंहोंचलों त्या दिवशींची गोष्ट. सायंकाळीं मी मेजवानीसाठीं कपडे करीत होतों. इतक्यांत हवाई हल्ल्याचे भोंगे वाजले व सर्वत्र अंधार झाला. हा प्रकार कां झाला असावा याची मला कांहींच कल्पना येईना. या बाबतींत चौकशी केली असतां मला एवढेंच कळलें कीं फोर्मोसामध्यें कांहींतरी गडबड झाली आहे आणि चिआंग कै शेकचे हस्तक अजून हालचाली करीत आहेत. कँटनमध्येंही असेच प्रकार घडले. लोकांनाही त्यांत विपरीत असें कांहींच वाटलें नाहीं.

कँटनमधील बाजारपेठ पाहण्याजोगी आहे. दुकानें तर हारीनें लागलीं आहेत. व्यापाऱ्यांनीं आपल्याजवळील दडवून ठेवलेला माल विक्रीस काढला आहे. पण या दुकानांत गिऱ्हाईकांची गर्दी दिसली नाहीं. त्या मानाने सरकारी दुकानांतून बरीच गर्दी होती. येथील रस्ते गलिच्छ वाटले. सायकलरिक्षा

चालविणारे पुष्कळच लोक रस्त्याच्या बाजूला उभे होते. अशा गर्दीत आमच्या मोटारी खूपच वेगानें नेण्यांत आल्या.

पर्ल नदी आणि तिच्या आजूबाजूचे कालवे यांत हजारों कुटुंबें छोट्या होड्यांतून आपले संसार करीत होतीं. हीं माणसें अधिक सुदृढ वाटलीं व स्त्रिया तर विशेष देखण्या वाटल्या.

शहराच्या मध्यभागीं मोडकळीस आलेली एक मोठी इमारत आहे. चिनी लोकांनीं सोसलेल्या हालअपेष्टा आणि जपान्यांशीं त्यांनीं दिलेला लढा यांचें तें एक स्मारकच आहे म्हणतात ! शहराच्या दुसऱ्या टोंकास आणखी एक स्मारक आहे. ब्रिटिश व फ्रेंच सैनिकांनीं निदर्शकांवर येथें गोळीबार केला होता.

राष्ट्रीय सैनिकांचा सध्यां येथें पहारा आहे. मी येथें हिंडत असतां डोक्यावर ओझें घेऊन जाणारा एक मजूर मला दिसला. पहाऱ्यावर असलेल्या एका शिपायानें त्यास बंदुकीच्या दस्त्यानें ढोसलें व परवान्याची मागणी केली. बिचाऱ्या हमालानें डोक्यावरील ओझें खालीं ठेवलें नि खिशांतून तांबडा पास काढून दाखविला. नव्या चीनमधील राजवट ही अशी आहे.

कँटनहून आम्ही विमानानें पेकिंगला गेलों. विमानतळ नादुरुस्तच होता. जाताना वाटेंत मांगली नदीचें विशाल पात्र पाहण्याची आम्हांस संधि मिळाली. चिनी शेतकऱ्यांना किती हलाखीच्या परिस्थितींत काम करावें लागतें याचीं उदाहरणें जागोजाग आम्हांस दिसत होतीं. स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या दरम्यान आपण कोठेंतरी आहों एवढीच जाणीव त्यांस असे. पूर आणि दुष्काळ हीं त्यांच्या जणूं पांचवीलाच पुजलेलीं !

पेकिंग हें शहर चीनमधील शहरांचें प्रतीक मानतां येईल. कितीतरी राजवंश या शहरानें पाहिले आहेत. याच शहराच्यामध्यें उभें राहून दोन वर्षांपूर्वीं माओत्सेतुंगनें चीनमधील नव्या लोकशाही राज्यस्थापनेची घोषणा केली होती. याच शहरांत दोन वर्षांनीं मुक्तिफौजेची कवायत मीं पाहिली होती. आतां हें शहर जणूं कांहीं जागृत झालें होतें. पण या जागृतींत आनंद नव्हता. येथील पूर्वींचें खेळकर वातावरण जाऊन गणवेष घातलेले गंभीर चेहऱ्याचे तरुण नि

तरुणी मात्र आतां येथें दिसत. येथील विद्वत्ता नाहींशी झाली नि घोषणा मात्र शिल्लक राहिल्या. गिऱ्हाइकांची वाट पाहात रस्त्यावर धूम्रपान करीत बसणारे रिक्षावाले तेवढे पूर्वींचेच राहिले.

एवढें खरं कीं पेकिंगमधील पूर्वींचा गलिच्छपणा जाऊन त्या जागीं शिस्त, स्वच्छता दिसूं लागली होती. विद्यार्थी पूर्वींप्रमाणें बेतालपणानें वागत नव्हते, जुनाट खानावळी नामशेष झाल्या होत्या. आमच्या सन्मानार्थ दिलेलें जेवणही रद्दी होतें. सगळीकडे कडकडीत जीवन, स्वार्थत्याग नि दारिद्र्य दृष्टीस पडत होतें.

पेकिंगमधील दोन मोठमोठ्या राजवाड्यांत ठिकठिकाणांहून आलेले हे शेतकरी राहात. पूर्वींसारखा रेशमी वस्त्रांचा झुळझुळीतपणा आतां शिल्लक राहिला नव्हता.

एक दिवस मी रात्रीं घरीं येत होतों. माझ्याबरोबर एक फ्रेंच जोडपें होतें. रात्र सुंदर होती नि आमचा गाडीवाला बोलण्याच्या रंगांत आला होता. आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजींत पेकिंगच्या प्राचीन वैभवाचें रसभरित वर्णन तो करीत होता. मधूनमधून एखाद्या मोठ्या इमारतीकडे वळून तो म्हणे— " जिथे पूर्वीं परकीय लोक वैभवानं नि दिमाखानं राहात. तिथे आतां सरकारी कचेऱ्या आल्या आहेत. "

पण पेकिंगचें राजकीय महत्त्व वाढत आहे. ज्यांना आपलें जीवन यशस्वी करायचें आहे ते पेकिंगला येतात. मला मात्र पेकिंगमधील खान्यांच्या वेळीं तींच तीच भाषणें ऐकून कंटाळा आला. सदिच्छा नि मैत्री, भारत व चीन यांचे सांस्कृतिक संबंध, जागतिक शांतता नि आशियांतील राष्ट्रांची एकी याच विषयावर मोठमोठ्या लोकांशीं आम्ही येथें चर्चा करीत असूं. थोडंसं गंभीर बोलायचें म्हटलें, नि तें बोलणें एखाद्या चिनी माणसाशीं खाजगीरित्या करण्याचें ठरवलें, तर तशी संधीच मिळूं शकत नसे. चाऊ एन् लायशीं आमच्या शिष्टमंडळांतील एका सदस्यानें बोलतांना जमीनसुधारणेसंबंधीं विषय काढला. " तुम्ही चीनमधील खेडीं प्रथम पाहा नि मग चर्चा करा. " असें त्याला उत्तर मिळालें. अर्थात चिनी खेड्यांना भेट देण्याची संधि त्या

सदस्याला मिळाली नाहीं हें सांगणें नकोच. कारण पेकिंगमध्येंही आम्हांस केवळ पुरातन अवशेष नि त्यांवरील नवीन व्याख्यानें एवढेंच अनुभविण्यास मिळालें.

पेकिंगमध्यें असतांना मीं एक चिनी संगीतिका पाहिली. त्यांतील संगीत रशियन क्रांतिगीतांच्या चालीवर होतें. मे लॅन फॅग नांवाच्या एका वयोवृद्ध नि निवृत्त झालेल्या स्त्रीभूमिका करणाऱ्या नटानें या संगीतिकेंत काम केलें होतें. चिनी रेशीम नि भव्य पडदे आतां फक्त रंगभूमीवर व दिसतात. सगळीकडे काम, राष्ट्रोद्धारासाठीं घडपड ! या कार्याचें मूल्यमापन मानवी सुखाच्या हिशेबांत बसेल का ?

चीनमधील जीवनाचा सर्वंकष अनुभव घेण्यासाठीं मीं विश्वविद्यालयांस भेटी दिल्या, चर्चा केल्या, खेड्यांतील लोकांत मिसळलों, परकीय वकिलातींतील लोकांशीं बोललों पण माझें समाधान झालें नाहीं. चे पे शी नांवाच्या एका चित्रकाराचीही मीं भेट घेतली, आणि माझें एक चित्र रंगविण्याची त्याला मीं विनंति केली. साध्यासुध्या चिनी माणसाचें खरंखुरं जीवन फक्त याच घरांत मला पाहाण्यास सांपडलें. इतर ठिकाणीं मीं गेलों होतों खरा पण त्या भेटींत औपचारिकपणाचाच भाग अधिक होता. वृत्तपत्रांतूनही आम्हांस चीनमधील नागरिक जीवनाची वस्तुस्थितिनिदर्शक माहिती मिळत नसे. आम्ही जणूं कांहीं या जनतामहासागरापासून दूर नि एकटें राहिलें होतों. तसें पाहिलें तर येथील लोक बुद्धिमान आहेत पण त्यांच्या बुद्धीला नवीन राजवटींत पुरेसें खाद्य मिळत नाहीं.

आमचा पेकिंगमधील रोजचा कार्यक्रम बांधलेला असे. प्रेक्षणीय स्थळांना आम्हीं भेट देत असूं. अशा ठिकाणीं आम्हीं जातांच एखादा सरकारी अधिकारी येई. हस्तांदोलन करी, अल्पोपहारानंतर भाषणें होत. स्वातंत्र्यपूर्व चीन व स्वातंत्र्योत्तर चीन यांतला फरक आम्हांस आंकड्यानिशीं सांगण्यांत येई. कधीं कधीं प्रश्न विचारण्याची आम्हांस परवानगी मिळे. नंतर पुन्हां एकदां चहापान होई. क्वचित् प्रश्नोत्तरें होत. विश्वविद्यालयांना भेट दिली तरी विद्यार्थ्यांशीं बोलतां येत नसे. ग्रंथालयें, प्रदर्शनें पाहाणें एवढाच आमचा कार्यक्रम असे.

कधींकधीं सार्वजनिक संस्थांस आम्हीं भेट देत असूं. येथेंही आम्हांस भाषणेंच ऐकावीं लागत. चर्चा अशा होतच नसत. रात्रीं संगीतिका, चित्रपट अथवा खानें असा कार्यक्रम असे. विचार करण्यास मोकळा वेळच उरत नसे. मी मात्र मधूनमधून असल्या कार्यक्रमांस टाळा देऊन लोकांस भेटण्याचा प्रयत्न करीत असें. चीनमधील प्रत्यक्ष परिस्थिति काय आहे याचा कानोसा घेण्यासाठीं माझी धडपड असे. वकिलातीतील अधिकाऱ्यांच्या भाषणांतून मला चीनमधील घडामोडींच्या हकीकतीचे धागेदोरे मिळत. त्याचा मला उपयोगही होई.

माझ्या म्हणण्याच्या समर्थनार्थ एक उदाहरण देतों. पेकिंगला पोहों-चल्यानंतर मला दोन लक्ष येन देण्यांत आले. हिंदी चलनांत ही रक्कम सुमारें साडेपांचशें रुपये होते. याचें मला आश्चर्य वाटलें व तत्संबंधीं मीं चौकशी केली. 'भांडवलशाही राष्ट्रांतील लोकांजवळ पुरेसा पैसा नसतो, म्हणून या रकमेंतून त्यांनीं आप्तेष्टांसाठीं भेटी वगैरे खरेदी कराव्यात अशी चीन सरकारची इच्छा आहे'' असें मला याबाबतींत सांगण्यांत आलें. ही रक्कम मीं न स्वीकारल्यास तो अपमान समजला जाणार होता. वास्तविक यांत माझाच अपमान झाला होता. अखेर भारतीय वकिलातीच्या सल्ल्यानें मीं ती रक्कम परत केली.

★ ★ ★

## ३ : माओ-त्से-तुंग

पेकिंगमध्यें असतांनाच माओ-त्से तुंग यांचीं स्तुतिसुमनें आमच्या कानांवर पडत होतीं. चीनचा त्राता, राष्ट्रपिता, कम्युनिस्ट पंथाचा यशस्वी नेता वगैरे विशेषणें त्यांना लावली जात. त्यांना अनुयायीहि भरपूर होते. त्यांना चिनी जनतेची पुरेपूर माहिती होती. त्यांना अनेक लोक भेटण्यास येत व त्यांचा पत्रव्यवहार दांडगा होता. पण आतां तो काळ बदलला होता. आतां कोणाची भेट घेणें त्यांना शक्य नव्हतें कीं पत्रांचीं उत्तरें स्वतः लिहिणें त्यांस शक्य नव्हतें. मे दिन व स्वातंत्र्यमहोत्सव याखेरीज इतर सार्वजनिक समारंभास आतां ते हजर नसतात. पण अजूनहि त्यांच्या आगमनाची वार्ता अगोदर कांहीं मिनिटेंच कळते. त्यांच्या भोंवतीं एक प्रकारचें गूढ रहस्य निर्माण झालें आहे. लोक त्यांना देवाप्रमाणें भजूं लागले आहेत.

कोठेंही गेलें तरी माओचें चित्र आपणांस आढळून येतें. "जनतेनें राज्य केलें पाहिजे, जनतेशिवाय राज्य नाहीं." असें माओ म्हणत. पण आतां तसें नाहीं. 'माओचे विचार' या नांवाच्या आपल्या पुस्तकांत त्यांनीं आपलीं मतें मांडलीं आहेत. पण लेनिन, मार्क्स् व एंजिल्स यांच्या तत्त्वज्ञानाची त्यांत आवृत्तीच आहे.

अशा मोठ्या माणसाची माझ्यासारख्याला कशी भेट मिळणार?

३० सप्टेंबर १९५१ रोजीं आमच्या शिष्टमंडळाला दिलेल्या एका सरकारी खान्याच्या वेळीं मीं त्यांना जवळून पाहिलें. त्यांच्या चेहऱ्यावर कौतुकाचें स्मित मला दिसलें. पाहुण्याकडे आपली तीक्ष्ण दृष्टि रोखून पाहण्याची त्यांस संवय आहे. मेजवानीच्या वेळीं ते सर्वांचा समाचार घेत होते. त्यांचें निमिषमात्र जरी दर्शन घडलें तरी जेवावयास आलेल्या कामगारांना व शेतकऱ्यांना आपल्या जीवनाचें सार्थक झाल्यासारखें वाटे. माओ प्रत्येकाचा समाचार घेऊं लागतांच सर्व मंडळी त्यांच्या गुणांचें गान करूं लागली.

दुसऱ्या दिवशीं एका कवायतीच्या वेळीं मीं त्यांस पुन्हां पाहिलें. ते उभे असलेल्या व्यासपीठाच्या खालींच एक भलें मोठें तैलाचित्र ठेवलें होतें. त्यांनीं निळ्या रंगाचा गणवेष घातला होता. सकाळीं दहा ते दुपारीं तीनपर्यंत कवायत चालू होती. " माओ त्से तुंग यांना दशसहस्त्र वर्षांचें आयुष्य लाभो" अशा गगनभेदी घोषणा एकसारख्या सुरूच होत्या. मधूनमधून ते स्मित करीत. हें स्मित निरागस असे. माओंना पाहतांच लोकांत उत्साहाचें वातावरण निर्माण होत असे. त्यांचा शब्द म्हणजे वेदवाक्य ! त्यांना विरोध करणें म्हणजे देशद्रोह होय !

माओ आज साठ वर्षांचे आहेत. आजवर केलेल्या कष्टांचा परिणाम त्यांच्यावर झाला आहे. त्यांचें खाजगी आयुष्य हें एक गूढ आहे.

भारतीय शिष्टमंडळानें त्यांना बहुमोल भारतीय कलाकृति भेट दिल्या. पण माओंनीं त्याकडे दृष्टिही वळविली नाहीं. आपली भेट माओंना आवडली नसावी असें शिष्टमंडळाच्या सदस्यांस वाटलें. यानंतर कांहीं दिवसांनीं आमच्या शिष्टमंडळांतील एका सदस्यानें भारतीय नृत्य करून दाखविलें. या कार्यक्रमास माओ हजर होते. पण त्या वेळींही त्यांच्या चेहऱ्यावर कसलेच विकार दिसले नाहींत. माओ व स्टॅलिन यांचें एक भव्य तैलाचित्र मीं एका हॉटेलांत पाहिलें होतें. त्यांत माओ हे स्टॅलिनपेक्षां उंच दिसत होते. दुसऱ्या एका ठिकाणीं एका रशियन चित्रकारानें याच दोघांचें काढलेलें तैलाचित्र पाहण्याचा मला योग आला. त्यांत स्टॅलिन हा माओपेक्षां उंच दाखविला होता ! आपापल्या पुढाऱ्याचें श्रेष्ठपण जनतेवर लादण्याचा कोण हा प्रयत्न !

स्टॅलिन व माओ यांचे स्नेहसंबंध फारसे सलोख्याचे असतील असें मला वाटत नाहीं. चीनच्या लढ्याच्या वेळीं स्टॅलिननें चीनबद्दल कधींच सहानुभूति बाळगली नव्हती. याचें कारण उघड आहे. चीनमध्यें कम्युनिस्ट पक्ष एवढा बळावेल अशी स्टॅलिनला कल्पना नव्हती. तसें पाहिलें तर १९२७ पासूनच माओ स्टॅलिनला विरोध करीत होता. १९४९ पर्यंत माओ चीनच्या बाहेर असा पडलाच नव्हता. कामगारांची व शेतकऱ्यांची संघटना करण्यांतच त्याचें आजवरचें आयुष्य गेलें होतें. १९४९ मध्यें त्यानें मॉस्कोला भेट

दिली. चिनी शेतकऱ्यांना जमिनींची मालकी हवी होती. आपलें सहाय्य मिळविल्याशिवाय चीनमध्यें कम्युनिस्टांना आपला पाय रोंवणें अशक्य आहे हें माओ ओळखून होता.

१९३९ मध्यें लिहिलेल्या " चिनी क्रांति व चीनमधील कम्युनिस्ट पक्ष " या ग्रंथांत माओ म्हणतो, " चीनमधील परिस्थिति वेगळी आहे. साम्राज्यवादी राष्ट्रें आणि त्यांचे हस्तक यांनीं चीनमधील महत्त्वाचीं शहरें आपल्या काबूंत ठेवलीं आहेत. चीनमधील क्रांतिकारकांना आपलें सामर्थ्य वाढवावयाचें असेल व निर्णायक लढाया टाळायच्या असतील तर त्यांनीं मागासलेल्या भागांची सुधारणा केली पाहिजे. लष्करी, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टया त्यांचा विकास केला पाहिजे. कारण शत्रु बलाढ्य आहे आणि आपलें सामर्थ्य तोकडें आहे असें केलें असतां मोठमोठीं शहरें आपल्या काबूत ठेवणाऱ्या शत्रूंना टाकून देणें शक्य होईल. एवढेंच नव्हे तर या रीतीनें अंतिम यश मिळविणेंही क्रांतिकारकांना शक्य होईल चीनमधील क्रांति प्रथम खेड्यांत यशस्वी होईल. याचीं कारणें अशीं — चीनची आर्थिक परिस्थिति अस्थिर आहे ( शहरें व खेडीं यांच्यांत आर्थिक समन्वय नाहीं. ) चीनचा मुलूख विशाल आहे. ( क्रांतिकारकांना वेळप्रसंगीं कोठेही आसरा घेतां येईल. ) क्रांतिविरोधी लोकांत दुफळी आहे. चीनचें सर्व सामर्थ्य शेतकऱ्यांत सामावलेलें आहे. तसेंच या शेतकऱ्यांत कम्युनिस्ट पक्षाचें प्राबल्य आहे. म्हणून अशा अस्थिर वातावरणांत क्रांतिकारकांना मार्ग चोखाळावा लागेल. त्यांच्या मार्गांत अडचणी येतील आणि त्यांचें ध्येय साध्य होण्यास वेळ लागेल. "

माओचें वरील विधान क्रांतीच्या कल्पनांना धक्का देणारें आहे. रशियालाही असेंच वाटलें. त्यांची मदत मिळाली नाहीं. चँग कै शेकनें कम्युनिस्टांचा बीमोड करण्याचे पांच प्रयत्न केले होते. या लढ्यांतून माओनें चिनी कम्युनिस्टांना वांचविलें होतें म्हणून चिनी कम्युनिझममध्यें मार्क्स, एंजिल्स आणि लेनिन यांचा भाग असला तरी माओचा मोठा वांटा आहे. पश्चिमेकडील कम्युनिझमवर रशियाचा पगडा आहे तर पूर्वेकडे माओची छाप

आहे. रशिया व माओ हे दोस्त खरे, तरीही ते एकमेकांवर साशंक आहेत. चीन आतां पश्चिमेकडील राष्ट्रांपासून अलग झालेला आहे. त्यामुळें लष्करी तांत्रिक व आर्थिक मदतीसाठीं त्याला रशियावरच अवलंबून राहणें भाग आहे. भारताशीं मैत्री ठेवल्यास रशियाच्या वर्चस्वाला शह देतां येईल असें माओला वाटतें. या कारणासाठीं बहुधा चीन भारताशीं असलेलें आपले संबध अधिकाधिक दृढ करूं पाहत आहे.

श्रीमति विजयालक्ष्मी पंडित यांच्या नेतृत्वाखालीं चीनमध्यें जें सांस्कृतिक शिष्टमंडळ गेलें होतें त्या वेळीं माओनें त्यांस भेट दिली. माओ म्हणाला, " शांततेकरितां आपण सहकार्यानें काम करूं. विधायक कार्यासाठीं आपण एकत्र येऊं. " सबंध आशिया चीनच्या झेंड्याखालीं यावा असें तर माओला म्हणावयाचें नसेल ना ?

भारताबद्दलचीं माओचीं मतें आतां बदलूं लागलीं आहेत. रशियाच्या मदतीशिवाय चीन स्वतंत्र होणें शक्य नाहीं असें तो पूर्वी म्हणे. परंतु तीन वर्षांच्या अनुभवानंतर रशियाचें चीनवर वर्चस्व राहील कीं काय अशी त्यास भीति वाटूं लागली. याचें प्रत्यंतर ऑक्टोबर १९५१ मध्यें आलें. क्रांतिदिनाच्या कवायतीच्या वेळीं आशियांतील लोकांचें ऐक्य चिरायू होवो अशी घोषणा सुरू झाली. भारत सरकार व भारताचे पंतप्रधान यांच्याबाबत चीनचें धोरण अनुल्लेखनीय होतें. परंतु भारतांतून येणाऱ्या पाहुण्यांची मात्र भारताचे प्रतिनिधि म्हणून बडदास्त ठेवली जाई. या धोरणाचा अर्थ काय ? आज माओच्या हातीं अनिर्बंध सत्ता आहे. त्याचीं मतें म्हणजे वेदवाक्यें आहेत. पूर्वी त्यानें सत्तेचा अभिलाष केला होता खरा. परंतु आशियांतील लोकांच्या सहकार्याशिवाय आपली सत्ता टिकूं शकणार नाहीं हें तो ओळखून आहे. रशियाशीं लांगूलचालन करून फायदा नाहीं हेंही त्यानें ओळखलें आहे.

माओचें जनतेवर किती वर्चस्व आहे याचें प्रत्यंतर मला आलें. मी माओशीं हस्तांदोलन केल्याचें ऐकल्यामुळें किती तरी स्त्रिया माझ्याशीं हस्तांदोलन करण्यास आल्या. आपल्या अडचणींबद्दलची माओला लिहिलेली पत्रें व त्यांची आलेली उत्तरें यांचें लोक मोठें कौतुक करीत. माओ चिरायु होवो

या वाक्यानेंच मुलांचा श्रीगणेशा होई. " भारत हा आपला एक महत्त्वाचा शेजारी आहे आणि भारताचा आपण अधिक परिचय करून घेतला पाहिजे. " असें माओनें एका भाषणांत सांगितल्यामुळें एक वृद्ध बाई मला भेटावयास आली. माओ इतकी सत्ता आजवर कोणाही एका चिनी माणसाच्या हातीं आलेली नव्हती. पण ती शाश्वत टिकेल काय ?

★ ★ ★

प्रेक्षणीय स्थळांपेक्षां व्यक्ती आणि त्यांचे जीवनक्रम पहाणें मला आवडतें. पण चीनमध्ये मानवाच्या प्रयत्नांना फारसा वाव दिसत नाहीं. त्या राष्ट्राचे प्रगतीचे प्रयत्न चालू आहेत ठरलेले कार्यक्रम चालू आहेत. ठरलेल्या वेळेच्या आधींच योजना पार पडत आहेत, आणि नवे नवे विक्रम प्रस्थापित होत आहेत. मंत्र्यांचीं भाषणें आणि पाहुण्यांचीं स्वागतें यांनीं वृत्तपत्रांचे रकाने भरून जातात. पण बाह्य जगाशीं मात्र या देशाचा फारसा संबंध येत नाहीं.

चीनमधील साधारण जनतेशीं संबंध ठेवणें, त्यांच्याशीं बोलणें यासाठीं तर मी चीनमध्यें आलों होतों. पेकिंगमधील कितीतरी लोकांनीं नवचीनच्या घडणींत भाग घेतला होता पण त्यांच्याशीं मला बोलतां येणें शक्य नव्हतें. मी या प्रकाराला कंटाळून गेलों. माओ त्से तुंग वगैरे पुढाऱ्यांची मला मुलाखत घ्यावयाची आहे असें आमच्या दुभाषी स्त्रीला मी वारंवार सांगितलें "तुमची विनंति आम्ही वर कळविली आहे." एवढेंच तिच्याकडून मला उत्तर मिळे. अखेर आमच्या दिमतीस ठेवलेल्या अधिकाऱ्याकडे मी गेलों. "मी येथें हिंदी वृत्तपत्राचा प्रतिनिधि म्हणून आलों आहें. आम्ही काय पाहिलें तें हिंदी जनतेला सांगून तिचें समाधान होणार नाहीं. चिनी पुढाऱ्यांची भाषणें आणि त्यांचे विचार यांना भारतांत प्रसिद्धि देण्याची इच्छा आहे" असें मी त्यास म्हणालों माझ्या या आर्जवी बोलण्याचा त्याच्यावर खूप परिणाम झाला असावा. माझे प्रश्न लिहून देण्यास त्यानें मला सांगितलें व ते परराष्ट्र कचेरीकडे पाठविण्याचें त्यानें कबूल केलें. याच्या पलीकडे त्याच्या हातांत कांहींच नव्हतें.

याबाबत पुढें कांहीं दिवस हालचाल अशी झाली नाहीं. पेकिंगमधील आमचा मुक्काम तर संपत आला. माझी अस्वस्थता दुभाषीला कळली असावी.

कारण ती म्हणाली "नवचीनचा वृत्तपत्री प्रचारावर विश्वास नाहीं. पण चीनचे पंतप्रधान चाऊ एन लाय यांची एखाद्या समारंभाच्या निमित्तानें गांठ पडूं शकेल." मी म्हणालों "अशा गांठीनें फारसा फायदा होणार नाहीं. त्यानीं वृत्तपत्रीय लोकांची एखादी बैठक बोलवावी म्हणजे मला त्यांस कांहीं प्रश्न विचारतां येतील !" माझे हे प्रयत्न निष्फळ होणार असें मला वाटूं लागलें.

पेकिंग सोडण्याच्या आधीं दोनतीन दिवस तेथील भारतीय वकिलानें आम्हांस जेवण्यास बोलावलें होतें. चौ एन लाय यांची तेथें गांठ-भेट होण्याचा संभव आहे असें मला सांगण्यांत आलें होतें. जेवणास जातांना माझ्या प्रश्नावलीची प्रत मीं बरोबर नेली होती.

जेवणाच्या जागीं नेहमींचाच थाट होता. बरीच मंडळी जमली होती. थोड्या वेळानें चिनी पंतप्रधान आले. त्यांनीं स्वतः आमचें स्वागत केलें. आम्ही जेवणघराकडे वळलों. पंतप्रधानांचे टेबलावर माझी प्रश्नावलि पाहून मी आश्चर्यचकितच झालों. तरीसुद्धां जमलेल्या सुमारें दोनशें लोकांचे मेळाव्यांत मी प्रश्न कसे विचारूं शकेन हा विचार माझ्या मनांत आलाच.

चिनी पंतप्रधानांनीं छोटेसें भाषण केलें. चीनमध्यें आम्हांस बऱ्याचशा गोष्टी पाहतां आल्या असतील अशी त्यांनीं आशा व्यक्त केली. नवचीन निर्माण होऊन केवळ दोन वर्षे झालीं असल्यामुळें थोडासा अपुरेपणा राहिला असण्याचा संभव आहे असेंही ते म्हणाले. कोणी कांहीं प्रश्न विचारल्यास त्यांस उत्तर देण्याची त्यांनीं थोडी तयारी दर्शविली. पंतप्रधानांच्या भाषणाचा इंग्रजी व रशियन भाषेंत अनुवाद करण्यांत आला. ते कांहीं काळ थांबले. बहुधा मीं आपले प्रश्न विचारावेत अशी त्यांची अपेक्षा असावी.

पंडित नेहरूंप्रमाणेंच चाऊ एन लायही देखणे आहेत. त्यांनीं घातलेला गणवेश नेटका होता. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा चिनी जनतेवर खासच अनुकूल परिणाम होत असला पाहिजे. त्यांचे उच्चार स्पष्ट, त्यांची मुद्रा तेजस्वी, डोळ्यांतील मिष्कील हसूं यांनीं कोणीहि भारून गेला असता. कम्युनिस्ट पक्षाच्या या जनकाला इंग्रजी व फ्रेंच या भाषा चांगल्या अवगत आहेत. हलाखीचे दिवस काढूनहि त्यांनीं आपलें तारुण्य टिकविलें आहे. त्यांच्या

काळ्याभोर डोळ्यांत प्रेमळपणा आणि स्वकार्याबद्दलची निष्ठा यांची चमक दिसते. त्यांना संभाषणाची आवड आहे आणि कोणत्याही प्रश्नावर बोलतांना आपल्या बुद्धिमत्तेनें ते श्रोत्यांना भारून टाकतात. १९५२ मध्यें दिल्ली येथें भरलेल्या एका कला प्रदर्शनाचें त्यांनीं उद्‌घाटन केलें होतें. प्रदर्शनांतील चित्रें त्यांनीं लक्षपूर्वक पाहिली होतीं आणि त्यांच्या त्या पाहण्यावरून त्यांचें कला-प्रेम दिसून येत होतें.

चाऊ एन् लाय हे एक लोकप्रिय पुढारी आहेत. आशियांतील पुढारी आपल्या व्यक्तिमत्वानें लोकांस आपलेसें करून घेतात आणि निराशेच्या अंधा-रांत आशेचा किरण दाखवतात. भारतांत पंडित नेहरू आणि पाकिस्तानांत जिना ही या बाबतींतील ठळक उदाहरणें सांगतां येतील.

माझ्या प्रश्नावलींत एकूण १६ प्रश्न होते आणि त्यांचीं उत्तरें द्याव-याचीं म्हटल्यास महत्त्वाचा असा मुद्दा सुटूं शकत नव्हता. पण इतक्या मोठ्या घोळक्यांत कोरियांतील युद्ध व चीनचें धोरण यांसारखे प्रश्न मी विचारणार तरी कसा ? पण धीर धरून मी उभा राहिलों आणि दुभाष्यामार्फत प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. मी म्हणालों ' आज जगांत सर्वत्र गैरसमज निर्माण झाले आहेत. जगांत शांतता आहे असें म्हणतात; पण सर्वत्र अशांतता दिसून येते. शांततेबाबत चीनची भूमिका काय आहे ? परस्परविरोधी मतवाद्यांना एकत्र राहणें शक्य आहे काय ?

माझ्या या प्रश्नानें कांहीं लोक रागावून मजकडे पाहूं लागले. माझ्या भोंवतालीं कितीतरी कम्यूनिस्ट लोक होते. त्यांना माझा प्रश्न आवडला नसावा. पंतप्रधानांनीं माझ्याकडे पाहून स्मित केलें. माझा प्रश्न त्यांना कळला असावा पण दुभाष्याच्या भाषांतरासाठीं ते क्षणभर थांबले नंतर ते म्हणाले, ' तुम्ही अतिशय छान प्रश्न विचारलात. जगांत आज प्रत्येकास शांतता हवी आहे. चिनी लोक हे शांतताप्रिय आहेत. स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, आंतरराष्ट्रीय शांतता, राष्ट्राराष्ट्रांमधील सहकार्य आणि युद्ध व चढाई यांच्या हुकूमशाहीस विरोध हें चीनचें परराष्ट्रीय धोरण आहे. चीनमध्यें लोकशाही निर्माण झाली त्या वेळीं चीनचे अध्यक्षांनीं असें सांगितलें आहे कीं सार्वभौमत्व आणि स्वदेश

यांबाबत समतेचें आणि परस्पर लाभाचें धोरण ठेवणाऱ्या कोणत्याही राष्ट्राशीं संबंध ठेवण्यास चीन तयार आहे. जगांतील राष्ट्रें मग तीं प्रजासत्ताक, लोकसत्तावादी, अथवा भांडवलशाही असोत, एकत्र राहणें शक्य आहे असें आमचें मत आहे. परंतु हुकूमशाही राष्ट्रांना हें नको आहे. आपलें चढाऊ परराष्ट्रीय धोरण आणि वसाहतींची वाढ सोडण्यास तीं तयार नाहींत. तेव्हां आम्ही त्यांस विरोध केलाच पाहिजे. जागतिक शांतता ही उपकारक आहे, ती टिकवलीच पाहिजे, त्यासाठीं हुकूमशाही राष्ट्रांना विरोध केलाच पाहिजे असें आमचें मत आहे. जगांतील लोक शांततेसाठीं लढण्यास तयार असतील तर हुकूमशाहीवर ते खात्रीनें मात करतील'. चाऊ एन् लायच्या भाषणाचा आम्हांस इंग्रजींत अनुवाद करण्यांत आला. हें उत्तर मला अपेक्षित होतें. परस्परविरोधी राष्ट्रांत शांतता कशी नांदू शकेल याचें उत्तर मात्र मला या भाषणांत आढळलें नाहीं. स्वातंत्र्य आणि अहिंसा यांचा अवलंब केल्याखेरीज शांतता टिकूं शकणार नाहीं अशी माझी खात्री पटली आहे. आपल्या पाशवी शक्तीच्या जोरावर आपलें मत दुसऱ्यावर लादण्याऐवजी मानवानें स्वार्थत्याग करावयास शिकलें पाहिजे. ब्रिटिशांना भारत सोडावा लागला खरा पण भारतांतील स्वातंत्र्यप्राप्ति अहिंसेचे मार्गानें झाल्यामुळें त्या दोन देशांत अखेर मैत्रीची भावना राहिलीच ना? शांततेसाठीं झालेल्या गेल्या दोन महायुद्धांमुळें जगांत शांतता कोठें प्रस्थापित झाली?

चाऊच्या उत्तरांतील अपुरेपणा मला जाणवला आणि तो काढून टाकण्यासाठीं मी मनांतल्या मनांत पुढील प्रश्नांची जुळवाजुळव करूं लागलों. इतक्यांत आमचा दुभाष्या दुसऱ्या एका पृच्छकाकडे वळला. त्याच्या प्रश्नाचा आधार घेऊन मी म्हणालों, केवळ आशियांतील राष्ट्रांची एकी झाल्यामुळें जगांतील चढाई थांबणार आहे का? नव्हे; अशा प्रकारें एका विभागाची एकी झाल्यास त्यामुळें जागतिक शांततेचा धोका निर्माण होणार नाहीं काय?' या प्रश्नास उत्तर देतांना पंतप्रधान म्हणाले, 'आशियांतील चीन, भारत, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, पाकिस्तान, एवढेच नव्हे तर जपान हीं शांततेसाठीं एकत्र आल्यास अमेरिकेच्या व इतर राष्ट्रांच्या आक्रमक वृत्तीस

खात्रीनें आला असेल. अशा प्रयत्नांनीं जागतिक शांततेला धक्का तर पोंहोचणार नाहींच, उलट एकीची भावना दृढ होईल. शिवाय अशा प्रकारें जागतिक शांतता. स्थापन करण्याचा आमचा प्रयत्न असल्यामुळें तीस धक्का पोहोंचणें शक्यच नाहीं. अमेरिका आणि इतर भांडवलशाही राष्ट्रें यांनीं आशियांत लष्करी तळ उभारले आहेत, जपानला शस्त्रसामग्री पुरविली आहे आणि आपल्या या कृतीनें जागतिक शांततेत धोका आणला आहे. कम्युनिस्टांचे मताप्रमाणें एकी म्हणजे पाश्चात्य राष्ट्रांविरुद्धची एकी होय. आणि शांतता म्हणजे कम्यूनिस्ट मतप्रणालीच्या मार्गानें मिळणारी शांतता होय. आशियांतील नव राष्ट्रांना स्वतंत्र राष्ट्रें म्हणून अजून मान्यता मिळत नाहीं हें कशाचें द्योतक आहे ? '

आमच्या शिष्टमंडळांतील एक सदस्य अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनीं प्रश्न विचारण्याच्या निमित्तानें एक व्याख्यानच झोडलें. चीनमधील लोकशाही प्रजासत्तावादी केव्हां होईल आणि चीन आर्थिक कार्यक्रम काय असें त्यांनीं विचारलें. पंतप्रधान म्हणाले, ' उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण करणें आणि शेतीची मालकी समाजाकडे देणें हा आमचा आर्थिक कार्यक्रम आहे, तो पार पडण्यास वेळ लागेल आणि त्यास जनतेचें सहकार्य लाभेल'. मी म्हणालो 'यासाठीं परकीय देशांकडून आर्थिक मदत व तांत्रिक सहाय्य घेण्याची चीनची तयारी आहे काय ?' पंतप्रधान म्हणाले 'धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यास पुष्कळच अडचणी आहेत. पण आम्ही आमच्या सामर्थ्याचे जोराबर त्यांतून मार्ग काढूं अर्थात्च आमच्या बद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या राष्ट्रांकडून मदत घेण्यास आम्हांस आनंदच वाटेल. यंत्रसामुग्री आणि यांत्रिक सहाय्य या बाबतींत रशिया, पूर्व-जर्मनी आणि पूर्व युरोप यांनीं आम्हांस पुष्कळ मदत केली आहे. दक्षिण आशियानेंही कच्च्यामालाबाबत आमच्याशीं देवघेव केलेली आहे '. ते पुढें म्हणाले, ' आमच्याजवळ जमीन पुष्कळ आहे. पण तीपैकीं पुष्कळशी पडीक आहे. पाटबंधाऱ्याचे कामीं आम्हांस मनुष्यबळ पुष्कळच लागणार आहे. त्यामुळें लोकसंख्येचा प्रश्न आम्हांस भीतिदायक वाटत नाहीं. मागासलेल्या देशांत स्वस्त मनुष्यबळ हें एक मोठेंच भांडवल असतें. ' चाऊ एन् लाय यांचे हें उत्तर मार्क्सवाद्यांच्या पद्धतीप्रमाणेंच होतें. कोरियांतील युद्धासंबंधींहि मला

त्यांस प्रश्न विचारावयाचा होता. प्रश्न महत्वाचा पण वेळ तर थोडा, म्हणून मीं एक अप्रत्यक्ष प्रश्न विचारला. मी म्हणालों 'लोकशाही राष्ट्रांत व्यक्तीला आपलें भलेंबुरें ठरवण्याचा पूर्णपणें हक्क असला पाहिजे. हुकूमशाही राष्ट्रांत व्यक्तीला तसा हक्क नसतो; याबाबत चीनमध्यें परिस्थिति काय आहे ?'

माझा प्रश्न तात्त्विक स्वरूपाचा असल्यानें चाऊ एन् लाय यांचे त्यावर काय उत्तर येईल हें मला माहीत होतें. पण कम्यूनिस्ट राष्ट्रांमध्यें लोकशाही या नांवाखालीं जे प्रकार चालतात त्यांना तोंड फोडण्याची माझी इच्छा होती. माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना चाऊ एन् लाय म्हणाले, 'चीनमधील राजकारणी सत्तेची लोकशाही व हुकूमशाही या दोन बाजू आहेत. कम्यूनिस्ट पक्षांत कामगार, किसान व मध्यमवर्गीय लोक आहेत. या वर्गांना आचार. विचार व उच्चार, मतप्रदर्शन व धर्म या बाबतींत संपूर्ण स्वातंत्र्य आहे. आपलें सरकार ते निवडतात. जमीनदार व भांडवलवाले यांवर मात्र चिनी जनता हुकूमशाही गाजवते यामुळें लोकशाही व हुकूमशाही यांचा या देशांत समन्वय साधण्यांत आला आहे.' त्यांच्या भाषणाचा हा सारांश मीं माझ्या दैनंदिनीवरून घेतला आहे. कम्युनिस्ट पक्षाचें कार्य जनतेविरुद्ध आहे असें माझें मत नव्हतें. कोरियाबद्दलचा प्रश्न मात्र माझ्या मनांत घोळत होता. 'कोरियामध्यें चीनला काय मिळवायचें आहे ? कोरियांत शांतता नांदण्यापूर्वी ३८ व्या रेषेवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सैन्यानें माघार घेणे आवश्यक आहे काय ? आणि ही गोष्ट मान्य केल्यास ३८ वी रेषा ही तात्पुरती सरहद्द मानण्यास चीन तयार आहे काय ? कोरियांतील सध्यांची हानि टाळण्यासाठीं चीन आपल्या धोरणांत फेरफार करावयास तयार आहे काय ?' असा माझा प्रश्न होता. ही गोष्ट १९५१ मधील ऑक्टोबरची आहे. अजून तहाची बोलणी चालूंच आहेत. पण चाऊ एन् लायनें नेहमींप्रमाणें संयुक्त राष्ट्राच्या अरेरावीचा निषेध केला व चीनला शांतता हवी आहे असें सांगितलें. ते पुढें म्हणाले, 'कोरियांतील युद्धाबाबत आतां सर्वमान्य असा तह होईल अशी आपण आशा करूं या. हें साध्य व्हावयाचे असेल तर प्रथम युद्धतहकुबी अंमलांत आली पाहिजे. त्यानंतरच या प्रश्नाचा विचार करतां येईल. हा मार्ग अमेरिकन साम्राज्यवाद्यांना मंजूर नाहीं. आम्ही भगीरथ प्रयत्न करून हें साध्य करून घेऊं.'

अनुक्रम ..2-8-99 . वि:
क्रमांक (३३) 2-3-6 ........ नों: दि: 9-2-93

या वेळीं रात्रींचे दोन वाजले होते. माझ्या प्रश्नांची सरबत्ती मीं थांबविली. माझ्यानंतर इंडोनेशियांतील एका प्रतिनिधीनें सुमारें दहा मिनिटें भाषण केलें. तो म्हणाला, ' चीनच्या बाहेर जे चिनी लोक राहत आहेत त्यांच्या नागरिकत्वाबाबत चीनचें धोरण काय आहे ? ज्या देशांत हे चिनी लोक स्थायिक होतील त्या देशाचें नागरिकत्व त्यांना घेऊं देण्यांत येईल कीं चीनचेंच नागरिकत्व स्वीकारण्याबद्दल त्यांच्यावर दडपण आणण्यांत येईल ? ' हा प्रश्न ऐकतांच सर्व सभा एकदम स्तब्ध झाली. तसें पाहिलें तर सध्यां आशियांत साम्राज्यवाद व कम्यूनिझम यांच्यांत रस्सीखेंच चालू आहे, म्हणून हा प्रश्न ऐकतांच पंतप्रधान संतापले. अर्थातच त्यांनीं स्वतःला तावडतोब आवरलें. त्यांच्या भाषणाचा मीं घेतलेला सारांश आणि नंतर आम्हांस दिलेलें अधिकृत वक्तृत्व यांतच फरक पडला होता. चीनला दुसऱ्या राष्ट्रांवर आक्रमण करण्याची इच्छा नाहीं असें मीं लिहून घेतलें होतें. सरकारी अधिकृत वक्तव्यांत मात्र ' हा प्रकार म्हणजे पाश्चात्य साम्राज्यवाद्यांनीं चीनविरुद्ध केलेल्या जहरी प्रचाराला आम्हीं आपसांतील एकीनें तोंड देणार आहों ' असें म्हटलें होतें.

मीं तयार केलेला तर्जुमा दुरुस्तीसाठीं पाठविल्यानंतर त्यांत खूपच खाडाखोडी करण्यांत आल्या होत्या. भाषांतरकर्त्याच्या चुकीमुळें हा फरक पडला असें सांगण्यांत आलें. चीनच्या बाहेर राहणारे चिनी लोक तेथील ऐक्याचा भंग करण्याचा प्रयत्न करीत होते. पण चाउ एन लायनें हें विधान खोडून काढलें व या प्रश्नाची सविस्तर चर्चा करण्यास मान्यता दिली. पण या मान्यतेंत कांहीं तथ्य नव्हतें. इंडोनेशिया अजून स्वतंत्र झाला नाहीं, त्यानें प्रथम आपलें स्वातंत्र्य परत मिळवावें असा टोमणा लाय यांनीं मारला होता. या पांच तासांच्या चर्चेत कांहींच निष्पन्न झालें नाहीं.

पंडित नेहरू व चाऊ एन् लाय हे दोघेही रागीट आहेत. पण त्यांच्या रागाचा जोर क्षणिक असतो. पंडितजी आपली चूक कबूल करतात तर लाय आपल्या वागणुकीनें विरोधकास शरमिंदे करतात.

यानंतर माझी व लाय यांची अनेकदां गांठ पडली. पण बोलणें असें कांहींच झालें नाहीं. इंडोनेशियाबद्दल त्यांनीं केलेल्या एका वक्तव्याबद्दल मीं त्यांची एकदां भेट मागितली होती व कांहीं प्रश्नही पाठविले होते. परंतु भेटही मिळाली नाहीं अथवा माझ्या प्रश्नांचीं उत्तरेंही आलीं नाहींत.

* * *

## ५ : चे पे शी

चाऊ एन् लायच्या भेटीव्यतिरिक्त पेकिंगमधील आणखी एक संस्मरणीय प्रसंग म्हणजे सुप्रसिद्ध चित्रकार चे पे शी यांची भेट. चाऊ एन् लाय यांच्या भेटीसाठीं मला अगाऊ संकेत ठरवावा लागला. चे पे शीकडे मी अनपेक्षित आणि अनाहूत गेलों. परवाना येईतों मला पेकिंगमध्यें कांहींच काम नव्हतें. त्यामुळें निरनिराळ्या वस्तू विकणाऱ्या व्यापाऱ्यांशीं मी बोलत बसें. या वस्तूंत शीचीं बरींचशीं चित्रें होतीं. तीं पाहून या जगप्रख्यात चित्रकाराला भेटण्याची माझ्या मनांत इच्छा उत्पन्न झाली. माझ्या फ्रेंच मित्राबरोबर मी शीकडे गेलों.

तो प्रातःकाल होता. पेकिंगची राजेशाही वस्ती मागें पडली होती. पुरातन विभागांतून आम्ही चाललों होतों. चे पे शींचें घर बाहेरून साधेंसुधेंच दिसत होतें. आम्हीं घरांत शिरलों नी खऱ्याखुऱ्या चीनमध्यें मी आल्यासारखें मला वाटलें. नेहमीं आढळणाऱ्या घोषणा नि पत्रकें यांनीं हें घर अलिप्त होतें. आम्ही एका खोलींत गेलों. शीची बसायची ती खोली होती. तोच त्याचा स्टुडियो होता. तेंच त्याचें घर होतें. सरकारी रीत्या कोणाही पाहुण्याला येथें कां येऊं देत नसतील याचा येथील दारिद्य्र पाहून मला उलगडा झाला. कम्यूनिझमच्या तत्त्वानुसार कोणत्याही वस्तूचा नेटका भागच दृष्टीला पडतो. कम्युनिझम काय किंवा भांडवलशाही काय, तेथील सौंदर्य मानवी रक्तशोषणांतून निर्माण झालेलें असतें. या चंद्रमौळी घरांत अत्युत्तम चित्रें धूळ खात पडलीं होतीं. एका कोंपऱ्यांत चार मोडक्या खुर्च्या नी एक टेबल होतें, दुसऱ्या कोंपऱ्यांत आणखी एक टेबल होतें. तो आमच्या चित्रकाराचा फळा.

चे पे शी एका खुर्चीवर बसले होते. आम्हीं त्यांच्याभोंवतीं कोंडाळें केलें. त्याचें वय होतें ९२. पण वार्धक्यानें त्यांची कला बुरसटलेली नव्हती. त्यांचे डोळे जणूं भविष्यकाळाचा मागोवा घेत होते. त्यांच्या पांढऱ्या दाढी-

वरूनच त्यांच्या अस्तित्वाची कल्पना पटत होती. आपले किडकिडीत हात त्यांनीं खुर्चीच्या दोन्हीं बाजूस ठेवले होते. त्यांना आपल्या तंद्रींतून जागें करणें कठिण होतें.

शी यांना फक्त चिनीच भाषा येत होती. त्यामुळें आम्हांला बरोबर दुभाष्या न्यावा लागला. भाषेच्या अडचणीमुळें आमचें संभाषण फारसें रंगलें नाहीं.

या विख्यात चित्रकाराला मीं पूर्वीं पाहिलें होतेंच. त्या वेळीं ते पुष्कळच आशावादी वाटले मला. पण या वेळीं मला ते अत्यंत निराश वाटले. अखेरची विश्रांति घेण्याची वेळ जवळ आली आहे अशी त्यांची भावना झाल्याचें मला आढळून आलें. तसें पाहूला गेलें तर चे पे शी हे नवचीनचे एक थोर कलावंत आहेत हें मान्य केलें पाहिजे. पण चीनमधील जुन्या चित्रकलेच्या परंपरेंत ते वाढले आहेत आणि आतां त्या परंपरेला किंमतच उरलेली नाहीं. कलेसाठीं कला हें तत्त्व कम्यूनिस्टांना मान्य नाहीं. चे पे शी हे राजकीय चित्रें रंगवीत नाहींत. फुलें, फळें, पक्षी यांच्या चित्रणांचीच त्यांना आवड आहे. चिनी क्रांतीच्या वेळीं ते अज्ञातवासांत गेले. त्यानंतरचें त्यांचें पुनरागमन मानाचें ठरलें, सुखाचें ठरलें नाहीं. त्यांचा हात नाजूक आहे. पण असलीं नाजूक चित्रें कोण घेणार ? म्हणून हा कलावंत चित्रें रेखाटतो नि भिंतींवर टांगून ठेवतो.

चे पे शी हे कसं काम करतात हें मला पहायचें होतें म्हणून माझें चित्र रेखाटण्याची मीं त्यांस विनंति केली. माझी विनंति ते स्वीकारतील कीं नाहीं याबावत मला शंका होती. इतक्यांत चहा आला. आमच्यापुढें आलेल्या कपांत फक्त गरम पाणी होतं. कारण चहा देणेंही त्यांना परवडणारें नव्हतें. माझी विनंति ऐकतांच त्यांच्या चेहेऱ्यावर लगेच तजेला आला. अस्तन्या वर सारून ते म्हणाले " मी चित्र रेखाटतों पण त्याची किंमत चव्वेचाळीस हजार येन होईल. " ही रक्कम म्हणजे सुमारें दहाबारा रुपयेच होत असल्यानें मीं एकदम होकार दिला.

" मी काय रंगवूं ? फुलें कीं फळें ? "

" आपण कांहींही अगदीं आपल्या मनाला वाटेल तें रेखाटा. माझ्या देशबांधवांना आपली माहिती करून देण्याची माझी इच्छा आहे. भारतीय सांस्कृतिक शिष्टमंडळाचा मी सदस्य आहें. चीन व भारत यांतील सांस्कृतिक संबंधाचं द्योतक असें एक चित्र आपण काढावं अशी माझी इच्छा आहे. "

पण त्यांना माझें भाषण कळलेंच नाहीं. आणि पुन्हां त्यांनीं तो प्रश्न विचारला. मीं म्हणालों—" आपलीं फळांचीं व फुलांचीं बरींच चित्रें मी पाहिलीं आहेत. तेव्हां आपण एखादा देखावा चितारावा अशी माझी इच्छा आहे. " माझे हे शब्द ऐकतांच त्यांनीं क्षणभर माझ्याकडे रोखून पाहिलं आणि म्हणाले, ' ' देखाव्याला दुप्पट रक्कम द्यावी लागेल. " चे पे शींची आर्थिक परिस्थिति किती खालावलेली आहे हें मला दिसत असल्यानं मी चटकन रुकार दिला. त्यांनीं काढलेलं चित्र बाजारांत त्यापेक्षां स्वस्त मिळू शकलं असतं पण केवळ चित्रानं माझं समाधान होणारं नव्हतं. ज्यांत गरजेची बाजारी वृत्ति नाहीं असं कलाकौशल्य मला पाहावयाचं होतं. कलावंतांचं खरं कलाप्रेम मला पाहायचं होतं. चे पे शी यांनीं अस्तन्या वर सारल्या. एका स्त्रीनं एक पातळ कागद आणला. ती रंग घोटूं लागली. तो कागद समोर धरून तो कलावंत एका टेबलापाशीं कांहीं मिनिटं उभा राहिला. त्यांच्या एका हातांत कुंचला होता. त्यांनी चटकन कागदाच्या एका कोपऱ्यांत रंग भरायला सुरुवात केली. ते म्हणाले—" मीं एक साधंसंच चित्र रंगविणार आहे. साधे-पणांतच सौंदर्य सामावलेलें असतें. " त्यांचं काम चाळीस मिनिटं चाललं होतं. मधूनमधून रंगाचं मिश्रण करण्यासाठींच फक्त ते थांबत.

अखेर त्यांचं चित्र साकार झालं वसंत ऋतूतील एक शेत, आणि सावलींत रंवथ करीत असलेल्या दोन गायी एवढंच त्या चित्रांत होतं. त्यांनीं फक्त काळा रंग वापरला होता. खरं म्हटलं तर त्या चित्रांतील साधेपणानं माझं मन थोडंसं खट्टू झालं. चे पे शीनीं आपल्या बाह्या उतरवल्या नी आपल्या खुर्चीत ते बसले. चे पे शींचें चित्र त्यांच्या सहचारिणीनं उचललं नी वाळण्यासाठीं भिंतीवर टांगलं. या चित्रापेक्षां कितीतरी चांगलं चित्र मला बाजारांत स्वस्त मिळालं असतं असा एक विचार माझ्या मनाला चाटून गेला. पण तो विचार सोडून मीं

त्यांच्याशीं बोलायला सुरुवात केली. मी म्हणालों, "या चित्रांतल्या दोन गायींपैकीं एक बसली आहे तर दुसरीची पाठ आपल्या बाजूला आहे. या दोन गायी भारत व चीन यांच्या संस्कृतींचीं प्रतीकें आहेत काय? त्यांतून कोणता अर्थ व्यक्त होतो?"

तो वृद्ध मान हलवीत म्हणाला, "या चित्राला खरं म्हटलं तर अर्थ नाहीं. मीं राजकारणी पुरुष नाहीं. मीं फक्त दोन जनावरं रेखाटलीं आहेत एवढंच."

"पण तुम्हीं दोन गायीच कां रंगविल्यात? इतर कांहीं रंगवायला तुम्हांला कसं कांही मिळालं नाहीं?"

"मला दोन गायी रेखाटाव्याश्या वाटल्या एवढंच याचं कारण. या गायींमुळं मला माझ्या बालपणातील गोष्टी आठवतात. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मीं गायी हांकीत होतों. हें तुम्हाला माहीत आहे काय? एरवीं माझ्या चित्रांत गायी नसतात. पण आज तसं मनांत आलं खरं."

"तुमचं बालपण सुखांत गेलं का?"

"एका अत्यंत गरीब शेतकऱ्याच्या घरांत माझा जन्म झाला. असल्या घरांत सुख कुठचं मिळणार?"

"तुम्हीं चित्रकला कुठं शिकला? चित्रकार व्हावसं तुम्हाला कां वाटलं?"

"वयाच्या बाराव्या वर्षी घडलेल्या एका घटनेनं माझ्या आयुष्याची दिशाच बदलली. नेहमींप्रमाणें गायी घेऊन मीं घरीं आलों. पण त्या दिवशीं एक गाय चुकली होती. माझ्या तें ध्यानांत आलं नाहीं. माझ्या आजोबांनीं त्या दिवशीं मला खूप मारलं म्हणून मीं घरून पळून गेलों. शेजारच्या गांवांतील एका सुतारानं मला आश्रय दिला."

चित्रांतील गायींचं रहस्य आतां माझ्या ध्यानांत आलं. ती गाय पळून चालली होती. तिनं त्याला दुःख दिलं होतं. आणि त्या दुःखांतून या कलेची निर्मिति झाली होती. त्यांच्या बाळपणीं भोगलेल्या दुःखानें माझं मन

द्रवून गेलं. त्या एका चित्रांत चे पे शींच्या ८० वर्षांच्या मागच्या आठवणी जागृत झाल्या होत्या. त्या चित्राचं मला मोठंच आकर्षण वाटूं लागलं.

"पेकिंगला आल्यानंतर तरी आपण सुखी झालांत कां ? " मीं विचारलं.

" वयाच्या पन्नासाव्या वर्षी मीं पेकिंगला आलों. त्यापूर्वी मीं तीस वर्षे भटकतच होतों. तीन गुरुंनीं मला ही कला शिकविली. मला महत्त्वाकांक्षा होती म्हणून मीं इथं आलों. शिवाय इथं माझ्या चित्रांना किंमतही बरी येऊं लागली. "

याचवेळीं त्यांचा नातू येथें आला. तो म्हणाला. " माझ्या आजोबांनीं स्वार्थाकडे फारसं लक्ष दिलं नाहीं. जनतेच्या सेवेंतच त्यांनीं आपलं आयुष्य वेंचलं आहे. "

हा नातू कम्युनिस्ट होता. तोही चित्रकार होता. पण लोकांच्या अभिरुचीप्रमाणें तो चित्रं रंगवीत असे. माओ-त्से तुंगचीं कांहीं तैलचित्रं त्यानें काढलीं होतीं. तो पुढं म्हणाला. " पूर्वीच्या काळांतही माझे आजोबा लोकांत मिसळत असत. चीनच्या बादशहांनी त्यांचा लौकिक ऐकून, आपल्या दरबारीं त्यांना जागा देऊं केली. पण माझ्या आजोबांनीं तो मान नाकारला. "

चे पे शींच्या कलेचं गूढ मला अजून उकलेलं नाहीं. मोठमोठाल्या प्रदर्शनांत चे पे शींचीं चित्रं मला दिसलीं नाहींत. दारिद्र्यावस्थेंत या कलावंताला आपलं उर्वरित आयुष्य कंठावं लागत आहे. एक रशियन वृत्तपत्रीय प्रतिनिधीला त्यांचीं चित्रं आवडलीं आणि त्यांचं थोडसं नांव झालं. एवढंच या बाबतींत सांगण्यासारखं आहे.

★ ★ ★

चीनचे उपराष्ट्रपति कुओ मोजो यांच्याशीं मीं बोलत होतों. माझ्या एका प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले, " जपान किंवा त्याची दोस्तराष्ट्रं यांनीं आमच्यावर हल्ला करूं नये म्हणून आम्हीं रशियाशीं मैत्रीचा करार केला. नाटो करार युद्ध करण्यासाठीं आहे. आमचा शांततेसाठीं आहे. " आपली सत्ता टिकविण्यासाठीं चीनला रशियावर अवलंबून रहावं लागत आहे. अनेक आर्थिक आणि राजकीय समस्या चीनसमोर उभ्या आहेत. देशाची व्याप्ति मोठी असल्यानें राज्यशासन भक्कम असलं पाहिजे. लोकांवर वर्चस्व गाजवतां आलं पाहिजे. क्रांतीपूर्वी चीनमधील उद्योगधंदे आणि आर्थिक सामर्थ्य यांची वाताहत झाली होती. सगळीकडे दारिद्र्य आणि असमाधान पसरलं होतं. अशा परिस्थितींतून मार्ग काढण्याचं अवघड कार्य चिनी कम्युनिस्टांना करावयाचं होतं.

याचवेळीं चीनच्या बाबतींतलं अमेरिकेचं धोरण धरसोडीचं झाल्यामुळें राष्ट्रसंघ वगैरेंच्या बाबतींत चिनी जनता साशंक झाली होती. अमेरिकेची मदत स्वीकारल्यास पुन्हां अराजक माजेल, लांचलुचपत वाढेल अशी चिनी लोकांना भीति वाटूं लागली होती. म्हणून माओत्से तुंगला रशियाची मदत घेणंच भाग पडलं. चँग के शेकच्या प्रयत्नानं चीनमध्यें शांतता नांदेल अशी १९४५ पर्यंत रशियाला आशा वाटत होती. माओला तोंपर्यंत रशियाकडून कसलीहि मदत मिळत नव्हती. त्याचे सर्व प्रयत्न एकाकी होते रशियन लोकांनीं तर त्याला संधिसाधू ठरविलं होतं. पण माओनें अशाही परिस्थितींत आपलं कर्तृत्व दाखविण्यास सुरुवात केली. एका अभिनव क्रांतीचा त्याचा प्रयत्न होता आणि त्यासाठीं त्याला रशियाकडून मदत हवी होती.

इ. स. १९४९ मध्यें त्यानं असं म्हटलं होतं कीं, " हा लढा जागतिक आहे. आणि त्यासाठीं जे आपल्याला बरोबरीच्या नात्यानें वागवतात

त्यांच्याशीं आपण सहकार्य केलें पाहिजे. आपण रशियाबरोबर स्नेह संपादन केला पाहिजे. आंतरराष्ट्रीय आणि संघटित आघाडी आपण उघडली पाहिजे. ”

माओचें हें मतपरिवर्तन होण्याचीं कारणें कोणतीं? अमेरिकेनें चँग के शेकलाच मदत देण्याचें ठरविल्यानें सर्व चीनशीं त्यांना स्नेहाचे संबंध ठेवणें अशक्य होतें. कम्युनिस्टांचा पाडाव करण्यासाठींच चँगनें या मदतीचा विनियोग केला होता. १९४९ सालापर्यंत दक्षिण चीनमध्यें कम्युनिस्टांचें वर्चस्व अबाधित असल्यानें चीनमध्यें शांतता नि ऐक्य नांदणें अशक्य होतें. “ अमेरिकन साम्राज्यशाहीचा निःपात करणें आणि रशियाच्या सहाय्यानें सर्व चीनभर लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करणें हें कम्यूनिस्टांचें ध्येय आहे ” असें १९४८ च्या नोव्हेंबरमध्येंच माओनें जाहीर केलें होतें.

या कार्यांत माओला यश मिळालें. त्यानें रशियाकडे मदतीसाठीं धांव घेतली. चँग के शेकचें वर्चस्व अबाधित राहिल्यास आणि चीनमध्यें अंतर्गत शांतता न राहिल्यास आपल्याला चीनचे प्रश्न सोडवितां येणार नाहींत हें माओ ओळखून होता. म्हणून १९४९ च्या डिसेंबर महिन्यांत माओ स्वतः मॉस्को येथें गेला आणि त्यानें रशियाशीं तह केला. रशियाकडून त्यास कर्जही मिळालें. या तहानें युद्ध टळलें असें चिनी जनतेला वाटलें आणि तिनें सुटकेचा निश्वास सोडला. जागतिक युद्ध सुरू झालें तरच आतां चीनवर युद्धाची आपत्ति कोसळेल, एरवीं चीनमध्यें शांतता नांदेल असा चिनी जनतेस विश्वास वाटूं लागला.

ही पार्श्वभूमि तयार झाल्यावर माओनें रशियाकडे मदतीची मागणी केली. चँगचा पाडाव करून त्याची सत्ता नेस्तनाबूद करणें आणि चीनमध्यें अंतर्गत शांतता स्थापन करणें, या गोष्टी केल्याखेरीज आपलें चालावयाचें नाहीं हें माओ ओळखून होता. माओच्या रशियाच्या भेटींत पुष्कळच खडाजंगी वादविवाद झाले, पण अखेर चीन रशिया यांमध्यें मैत्री, सहकार्य व मदत यांबाबत तह करून तो परतला. या बातमीमुळें चीनमधील अंतर्गत परिस्थिति पुष्कळ स्थिरावली.

पण हा तह दोन तुल्यबल पक्षांत झालेला नाहीं. चीनजवळ मनुष्यबळ व कच्चा माल आहे. पण आज तरी लष्करी आणि तांत्रिक मदतीसाठीं

तो रशियावर अवलंबून आहे. माओ हें ओळखून आहे. पण त्या बरोबरच आपली सरहद्द शाबूत ठेवण्यासाठी रशियाला आपली मदत घेणें भाग आहे हेंही तो ओळखून आहे.

चीनमध्यें उद्योगधंदे वाढणें जरूर आहे. त्यासाठीं अद्यावत् यंत्रसामग्रीची जरूरी आहे. या बाबतींत रशिया चीनला फारशी मदत देऊं शकला नाहीं तरी चीनमध्यें रशियाचें वजन आहे. सर्वत्र माओ त्से तुंगच्या छायाचित्रांबरोबरच स्टॅलिनचे फोटोही आढळतात. ठिकठिकाणीं नांवांच्या पाट्या रशियन व चिनी अशा दोन्हीं भाषांत आढळतात. दक्षिणेकडे मात्र रशियाचा जोर कमी वाटतो.

शाळा व कॉलेजें यांत इंग्रजीऐवजीं रशियन भाषेनें शिरकाव करून घेतला आहे. ग्रंथविक्रेत्यांच्या दुकानांत इंग्रजी भाषेपेक्षां रशियन भाषेंतील पुस्तकांचाच अधिक भरणा दिसतो. ग्रंथांमधूनही रशियन तत्त्वज्ञानाचें पारडें जड झालेलें आढळून येतें. पाश्चात्य राष्ट्रांनीं चीनमधील आपलें अंग काढून घेतल्यानें माओला रशियाखेरीज आतां इतर कोणाचा आधार उरलेला नाहीं. चीनमधील विद्यार्थ्यांत रशियाबद्दलचें प्रेम वाढत आहे.

रशियांतील विमानतळासंबंधीं बोलतांना माओ म्हणाला— " अशा प्रकारची तयारी केल्याखेरीज आपली धडगत नाहीं. ती होईपर्यंत आपण सबूरीनं वागलं पाहिजे. " त्याचीं पावलें सावकाशीनें पडत आहेत. आतां मात्र हळूहळू तो भारताशीं मैत्री करण्याचा प्रयत्न करीत आहे.

१ ऑक्टोबर १९५१ रोजीं माओनें भारत–चीन ऐक्याची घोषणा केली. भारताच्या शिष्टमंडळाला त्यावेळीं रशियाच्या खालोखाल मान मिळाला. माओचें हें धोरण चिनी जनतेनें अमलांत आणलें. भारतीयांचें सर्वत्र उत्साहानं स्वागत होऊं लागलं. आशियाई राष्ट्रांशीं स्नेहसंबंध ठेवण्याच्या सर्वत्र घोषणा होऊं लागल्या.

या बाबतींत चीनचा उपाध्यक्ष कुओ मोजो याच्याशीं मीं चर्चा केली. पूर्व आणि पश्चिम यांचा सांधा जोडण्याची आशियांतील राष्ट्रांची तयारी झाल्याशिवाय जागतिक ऐक्य व शांतता प्रस्थापित होणार नाहीं असें माझें मत होतें. आणि या ध्येयाच्या प्राप्तीसाठींच तर संयुक्त राष्ट्रसंघाचा जन्म आहे.

कुओ मोजो म्हणाले– "आशियांतील राष्ट्रें शांतता प्रस्थापित करतील असा माझा विश्वास आहे. शांतता व युद्ध अशा जगांत दोनच शक्ति आहेत. आम्ही आशियांतील राष्ट्रें जगांत शांतता प्रस्थापित करूं. शिवाय पाश्चिमात्य राष्ट्रांपैकीं सर्वच राष्ट्रें आक्रमक नाहींत. तेथील नागरिकही शांतताप्रिय आहेत. शांततेच्या मार्गाचा अवलंब हाच आक्रमणावर इलाज आहे. शांततेच्या बाबतींत तडजोड नाहीं.

१९४९ मध्यें माओनेंही अशाच प्रकारचे विचार प्रकट केले होते. कोरियांतील युद्धानें त्याला नवी दृष्टि दिली. कोरिया आणि इंडोचायना येथें आपलें वर्चस्व असावें असें चीनला फार पूर्वीपासून वाटत होतें. चीनवर कोरियाच्या मार्गें आक्रमण होण्याचा संभव होता आणि इंडोचायनाकडून चीनला तांदुळाचा पुरवठा होत असे हीं याचीं कारणें असतील. अर्थातच चीन युद्धाला कंटाळला होता. कांहीं फायदा होणार असेल, आणि युद्ध लौकर संपणार असेल तरच चिनी जनता युद्धाला तयार झाली असती. चीनमध्यें हिंडतांना मला याचा अनुभव आला.

कोरियांत युद्ध सुरूं झाल्यामुळें एक मात्र फायदा झाला. आधुनिक युद्धतंत्राच्या दृष्टीनें चीनला आपलें लष्करी सामर्थ्य संघटित करतां आलें. उद्योगधंदेहि या निमित्तानें वाढले. चिनी जनतेला कंबर कसणें भाग पडलें.

चीनला आतां कोरियामधील युद्ध थांबविण्याची इच्छा आहे. पण जनतेंत आपली नाचक्की होऊ नये अशीही चिनी पुढाऱ्यांची इच्छा आहे. चिनी लोकांनीं आजवर युद्धाच्या नावाखालीं खूपच गैरसोयी सोसल्या आहेत. कोरियांतील युद्ध लांबत चाललें आहे. आशियांतील राष्ट्राच्या एकीकरणाच्या घोषणा केल्या तरच कोरिया युद्धांतून आपणांस बाहेर पडतां येईल अशी पुढाऱ्यांना आशा वाटत आहे.

हें साध्य करण्यासाठीं भांडवलशाही राष्ट्रांशींही सहकार्य करण्याची कम्युनिस्ट चीनची इच्छा आहे. रशियाशीं असलेले संबंध मात्र त्यामुळें तुटतां कामा नयेत व माओ त्से तुंग याचें चीनमधील वर्चस्व कमी होतां कामा नये असें त्यांना वाटतें.

यासाठीं इतर देशांत राहणाऱ्या सुमारें एक कोटी चिनी लोकांकडे सरकारनें आपली दृष्टि वळविली. या लोकांना चीनचेंच नागरिकत्व स्वीकारावें लागतें. इंडोनेशिया, इंडोचायना, थायलंड, मलाया, ब्रह्मदेश व भारत येथें अनेक चिनी लोक पिढ्यान् पिढ्या राहत आहेत. त्यांना चीनचेंच नागरिकत्व पत्करावें लागतें. इंडोनेशियांत राहणारे कांहीं चिनी विद्यार्थी १९५२ मध्यें चीनमध्यें आले. त्यांच्याजवळ इंडोनेशियन नागरिकत्वाचे परवाने होते. चीनमध्यें शिरतांच त्यांच्याजवळील ते परवाने काढून घेऊन चिनी नागरिकत्वाचे परवाने त्यांस देण्यांत आले. याबाबतींत तक्रारी झाल्या, पण व्यर्थ. भारतांत राहाणाऱ्या चिनी लोकांस असाच त्रास सहन करावा लागतो. याला कंटाळून एका चिनी शिक्षकानें अखेर आत्महत्या केली.

परदेशांत राहणाऱ्या चिनी लोकांच्या द्वारें त्या त्या राष्ट्रांतील भांडवलशाही नष्ट करण्याचा हेतु आहे. त्या दृष्टीनें या राष्ट्रांत प्रयत्न सुरू झालेच आहेत. दक्षिण आशियांतील राजकारणाचीं सूत्रें भारताच्या हातीं आहेत. भारतानें आपल्या नागरिकांस परकीय देशांचें नागरिकत्व स्वीकारण्यास मान्यता दिली आहे. चीनला हें मान्य नाहीं. म्हणून चीनमध्यें भारताविरुद्ध प्रचार सुरू होत आहे. भारत व नेहरू यांच्याबद्दल सध्यां चिनी वृत्तपत्रांत टीका सुरू झाली आहे. अमेरिका व इंग्लंड हीं राष्ट्रें भारतांत आपले पाय पसरूं लागलीं आहेत असें एका पत्रानें म्हटलें आहे. कोरियाच्या प्रश्नावर सुरक्षासमितींत भारतानें विरुद्ध मत देतांच चिनी वृत्तपत्रांनी भांडवलशाही राष्ट्रांचा हस्तक झाल्याचा भारतावर आरोप केला. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना या बाबतींत छेडण्याचा प्रयत्न झाला. हळूहळू हा भारतविरोध चिनी जनतेपर्यंत पसरला. चीनला दिलेल्या दुसऱ्या भेटीच्या वेळीं मला याचा अनुभव आला. दुसऱ्या शिष्टमंडळाचें तें सरकारी असूनही—उत्साहानें असें स्वागत चीनमध्यें झालेंच नाहीं.

तिबेटप्रश्नाच्या बाबतीत भारत व चीन यांत प्रथम मतभेद निर्माण झाले. तिबेट स्वतंत्र असला तरी आजवर तो चीनच्या वर्चस्वाखालीं होता. विसाव्या शतकाच्या सुरवातीला ब्रिटिश व रशिया यांना तिबेटमध्यें हालचाली

करण्यास सुरवात केली. वास्तविक रीत्या धर्म आणि संस्कृति या दृष्टीनें चीन-पेक्षां तिबेटला भारतच अधिक जवळचा आहे. इतकें असूनही चीननें तिबेट-वर आक्रमण केलें. नेपाळ आणि भूतान या भारताच्या शेजाऱ्यांना कम्यु-निस्टांच्या या आक्रमणाची झळ लागत आहे.

चीन व भारत यांच्या सरहद्दी सुमारें दोन हजार मैल पसरल्या आहेत. तेथें चीनचें मोठें सैन्य खडें आहे. माओला रशियाकडून मिळणारी मदत पुरेशी नसल्यानें भारताकडून सहाय्य हवें आहे. म्हणून वरवर चीन भारताशीं मैत्रीचे संबंध असल्याचा देखावा ठेवीत आहे. चीनला मदत करण्यांत रशि-याचा स्वार्थ आहे. चीनमधील मनुष्य बळ, साधनें यांची भावी युद्धांत रशि-याला गरज आहे. चीनशीं भांडण करण्यांत फायदा नाहीं हें ओळखून आज रशिया गप्प बसला आहे. पेकिंगमधील रशियन वकिलात चीनच्या अंतर्गत प्रश्नांवर डोळ्यांत तेल घालून पहात असली तरी प्रत्यक्ष ढवळाढवळ मात्र ती करीत नाहीं. दुसऱ्या कोणाच्या तरी मार्फतीनें हे उद्योग करण्यांत येतात. अशा रीतीनें चीनमध्यें सध्यां बऱ्याच घडामोडी चालू आहेत. राजकारणाचा हा महासागर वरून शांत दिसत असला तरी त्याच्या तळाशीं राजकारणाचे भोंवरे वेगानें फिरत आहेत.

* * *

— २ —

## १ : जमीन सुधारणा

आजपर्यंत चीनमध्यें सरंजामशाही होती. कम्यूनिस्ट सरकारनें ती रद्द केल्यामुळें जनतेंत नवचैतन्य संचारलें आहे. चँग के शेकला लोकांच्या हाल-अपेष्टांची माहिती होती. पण तो जमीनदारांच्या आहारीं गेला होता त्यामुळें त्याला जनतेचें हार्दिक सहकार्य कधींच मिळालें नाहीं. माओ त्से तुंगला मात्र जनतेचा पाठिंबा आहे. शेतकऱ्यांचें महत्त्व नि सामर्थ्य यांचा त्याला प्रत्यय आलेला आहे. एका पुस्तकांत तो म्हणतो — " जमीनदार आणि भांडवलवाले यांच्या विरुद्ध आपणांस लढा द्यावयाचा आहे. जनतेमध्येंच सत्ता केंद्रित झाली पाहिजे. धंद्याचें राष्ट्रीयीकरण केलें पाहिजे. जमीनदारांच्या ताब्यांत असलेल्या मोठमोठ्या जमिनी शेतकऱ्यांना मिळाल्या पाहिजेत. छोट्या उद्योग-धंद्यांना सहाय्य दिलें पाहिजे. "

चीनमधील भांडवलदारांना परकीय सत्तांकडून संरक्षण मिळत आहे हें माओ ओळखून होता. जनमताचा कौल आपल्या बाजूला वळवून घेणें यासाठीं चँग के शेक व माओ त्से तुंग यांची धडपड चालू होती. जमिनी

शेतकऱ्यांच्या हातीं देण्याच्या प्रयत्नांत माओला यश आल्यामुळें त्याचा जय झाला. चिनी शेतकऱ्यांच्या हलाखीची आपणांस पुरी कल्पना येणार नाहीं. चीनची एकूण लोकसंख्या ४१ कोटी; पण तेथील दहा टक्के लोकांच्या हातीं ६० ते ७० टक्के जमीन आहे. राहिलेल्या लोकांपैकी सुमारें साठ टक्के मजूर म्हणून काम करतात. जमीनदारांच्या जमिनी खंडानें घेणाऱ्यांस पिकाचा ५० ते ७० टक्के भाग जमीनदारांस द्यावा लागतो. कांहीं कांहीं वेळां तर उभें पीक जमीनदारास घालावें लागतें. दारिद्र्यामुळें दुष्काळ व सांथीचे रोग हे तर चिनी शेतकऱ्याच्या पांचवीला पुजलेले आहेत. त्यामुळें लुटालूट करणें, बंड उभारणें अशा गोष्टीकडे ते सहज वळतात. अशा परिस्थितींत जमिनीचे वांटप करून ती शेतकऱ्यांना देणें एवढाच चीनमधील शांततेचा माओपुढें प्रश्न होता. तो त्यानें सोडविला. ही सुधारणा लौकरच पुरी होईल. यासंबंधांत नेमलेल्या एका कमिशनच्या अहवालांत म्हटलें आहे कीं, " ज्यांच्या ताब्यांत वारेमाप जमीन आहे त्यांच्या ताब्यांतून ती काढून घेऊन जमीन नसलेल्या लोकांस तिचें वांटप करणें हा जमीनसुधार धोरणाचा पाया आहे. यामुळें भांडवलशाहीचा नाश होईल आणि समाधानी व सुखी शेतकऱ्यांची संख्या वाढेल.

शेतीचें उत्पन्न वाढविणें; खेड्यांतील जनतेस काम मिळवून देणें व पर्यायानें उद्योगधंदे वाढविणें असा याबाबत पसार केलेल्या एका कायद्याचा हेतु आहे. जो शेतकरी स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर काम करतो त्याला या कायद्याची भीति नाहीं. त्यानें स्वतःजवळ अधिक असलेली जमीन खंडानें देण्यासहि हरकत नाहीं. त्यानें स्वतः मात्र शेतावर काम केलें पाहिजे.

चीनमध्यें जमीनदार, देवळें, धर्मसंस्था, यांच्या ताब्यांत अमाप जमीनी होत्या. उद्योगपति आणि व्यापारी यांनींही जमिनी खरेदी करून ठेवल्या होत्या. चीन सरकारनें त्या जमिनी जप्त केल्या आणि गोरगरिबांस वांटून टाकल्या. भांडवलदारांचें तेथील भवितव्य आतां फारसें उज्ज्वल नाहीं. राष्ट्राचें उत्पन्न वाढविण्याचे घटक एवढेंच त्यांस महत्त्व आहे. चीनच्या या नव्या धोरणानुसार बेचाळीस कोटी एकर जमिनीचें वांटप करण्यांत आलें. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरांतील माणसें व तो रहात असलेल्या ठिकाणची परिस्थिति यांचा विचार

करून हिशोबानें त्यास अशी जमीन देण्यांत आली. या पद्धतीमुळें कांहीं शेतकऱ्यांच्या वांट्यास फारच थोडी जमीन येते आणि शेतकऱ्यांच्या भावी सुखाच्या, उत्पादनाच्या आणि स्वास्थ्याच्या मानानें ती अपुरी पडते.

चिनी शेतकरी दरिद्री आहे. त्यामुळें जमिनीचें असें वांटप करूनही उत्पादन वाढण्याची शक्यता कमीच आहे. जमीनदारांचीं कर्जें व खंड यांतून या पद्धतीमुळें शेतकऱ्याची सुटका झाली एवढेंच.

आतां शेतकऱ्याला उत्पन्नाच्या शेंकडा अठरा टक्के सारा सरकारांत भरावा लागतो. तो धान्याच्या रूपानें भरतां येतो. यामुळें सध्यांच्या चिनी शेतकऱ्याच्या तोंडावर टवटवी दिसते आणि त्याला खायला व ल्यायला अधिक चांगलें मिळतें. त्यामुळें ही नवी पद्धति शेतकऱ्यांना हितकारक वाटते एवढें मात्र खास म्हणतां येईल.

शेतीचें उत्पन्न वाढलें, औद्योगीकरण यशस्वी झालें, जीवनमान वाढूं शकलें, आणि देशांत लोकसत्ता रूढ झाली तरच चीनमधील दारिद्र्य संपेल असें कम्यूनिस्ट मानतात. उत्पादन वाढवावयाचें तर खतांचा उपयोग केला पाहिजे व यांत्रिक अवजारें आणलीं पाहिजेत. चिनी शेतकऱ्याला आज यांपैकीं कांहींच शक्य नाहीं. बरें हें सामुदायिक रीत्या करावयाचें तर त्यासाठीं आजचीं विलग व छोटीं छोटीं शेतें सामुदायिक रीत्या एकत्र केलीं पाहिजेत. चिनी शेतकऱ्याला आपल्या जमिनीबाबत अत्यंत ममत्व वाटतें. मग सामुदायिक शेती कशी शक्य होणार ?

जमीन वांटपाच्या या धोरणाचें चीनमध्यें दूरगामी परिणाम झाले आहेत. जमिनीचे पूर्वीचे मालक जमीनदार आणि आजचे मालक शेतकरी यांच्यांत द्वेषाचें वातावरण निर्माण झालें आहे. जमीन वांटपाचें धोरण यशस्वी व्हावें म्हणून अनेक सभा घेण्यांत आल्या या सभांतून शेतकऱ्यांनीं जमीनदारांविरुद्धचीं आपलीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगलीं. या वेळीं जाळपोळ व लुटालुटीही झाल्या. ज्या जमिनदारांवर लुटालूट, जाळपोळ, अत्याचार वगैरे आरोप सिद्ध झाले नाहींत त्यांना इतरांप्रमाणेंच जमिनी वाटून देण्यांत आल्या. चिनी शेतकऱ्यांच्या संघटना तयार करण्यांत आल्या. त्यांचा राज्यकारभाराला

पुष्कळ उपयोग झाला. आजवर अशा तऱ्हेची संघटित राज्यपद्धति चीनमध्यें कधींच अस्तित्वांत आलेली नव्हती. या पद्धतीमुळें चिनी शेतकऱ्याचा कम्युनिस्ट सरकारवरील विश्वास वाढला आणि ते त्या सरकारचे सच्चे अनुयायी बनले.

देशाची औद्योगिक उन्नति साधावयाची असेल तर शेतीचें उत्पादन वाढविलें पाहिजे. त्यासाठीं माहिती गोळा केली पाहिजे. या माहितीच्या अनुरोधानें राष्ट्राच्या प्रगतीचा आढावा घेतला पाहिजे. परंतु चीनमध्यें आजवर आकडेवारीची पद्धति नव्हती. त्यामुळें तुलनात्मक दृष्टीनें या आकड्यांना महत्त्व नाहीं. कम्युनिस्ट सरकारच्या द्वारांच चीनची प्रगति होऊं शकेल एवढेंच तत्व या आकड्यांच्या आधारानें आज जनतेवर ठसविलें जात आहे.

चीनमधील जमीन वाटपासंबंधी आम्हांला एक व्याख्यान ऐकविण्यांत आलें. व्याख्यात्याचें नांव होतें पेंग चेन. तो पेकिंग शहराचा महापौर होता. जमीन वाटपाचें काम पूर्वीं त्याच्यावर सोंपविण्यांत आलें होतें.

मार्क्स व लेलिन यांचा तो कट्टा पुरस्कर्ता आहे. त्याचें वक्तृत्व अमोघ आहे. आपल्या व्याख्यानांत तो म्हणाला—" जमीन वाटप पद्धतिमुळें चीनमध्यें धान्याची सुबत्ता झाली. आम्हीं आतां परदेशी धान्य निर्यात करूं शकूं. गेली ७२ वर्षे चीनमध्यें धान्याचा दुष्काळ असे. गेल्या दोन वर्षांत धान्याचे उत्पादन अनुक्रमें चौदा व आठ टक्यांनीं वाढलें. "

असल्या विधानांवर सर्वसाधारणपणें माझा विश्वास बसत नाहीं. कारण मी संशयात्मा आहे; माझ्या देशांतील दारिद्य मीं पाहिलें आहे, आणि अशा मार्गांनीं हें दारिद्र्य नष्ट होत असेल तर हा प्रयोग अनुकरणीय कां असू नये असा माझ्या मनांत विचार आला पण चीनमधील पीपल्स बँकेचा गव्हर्नर नान हान चेन यानें एके ठिकाणीं केलेल्या भाषणाची मला यावेळीं आठवण झाली. गेल्या कांहीं वर्षांत चीनचें धान्योत्पादन ३० टक्यांनीं वाढलें होतें. आणि सध्यां ते २० टक्के आहे असें त्यानें सांगितलें होतें पण मला जे आकडे मिळाले होते त्यावरून हें विधान अतिशयोक्तीचें आहे अशी माझी

खात्री झाली होती. चीनमधील धान्याचें उत्पादन त्या देशाच्या गरजांनासुद्धां पुरणारें नाहीं, असें त्या आंकडयांवरून दिसून येत होतें. मग निर्यात कशी शक्य होणार? शिवाय १९३६ ते १९५२ या काळांत चीनची लोकसंख्या वाढलेली असल्यामुळें धान्याचा तुटवडा अधिकच तीव्रतेनें भासत असला पाहिजे. अशा परिस्थितींत स्वतःपुरतें धान्य ठेवून धान्याची निर्यात करणें चीनला कसें शक्य झालें असेल याचेंच आश्चर्य वाटतें. १९५१ मध्यें चीनने भारताला ५ लक्ष टन धान्य पाठविलें. १९५२ मध्यें १॥ लक्ष टन पाठविले. त्याच वेळीं चीनमध्यें धान्याचा दुष्काळ पडला अशा बातम्या आल्या होत्या म्हणून या धान्य निर्यातीच्या बुडाशी राजकारण तर नसेल ना?

असें असलें तरी चीनमधील ज्या ज्या स्थळांना मी भेटी दिल्या तेथें धान्याचें भरपूर साठे मला आढळून आले. धान्य नियंत्रण कोठेही नव्हतें. धान्याच्या किंमतींतही फारसा फरक आढळून आला नाहीं. चिनी शेतकरी सारा धान्याच्या रूपानें भरतात असें वर सांगितले आहेच. त्यापैकीं कांहीं धान्य सरकारी गुदामांत शिल्लक असते व तें धान्य परदेशीं निर्यात करण्यांत येतें. चीन मधील दुष्काळी परिस्थिति जमीनवाटप पद्धतिमुळें नाहींशी होत असल्यानें सरकार पुढील धान्य टंचाईचा प्रश्न बराचसा सुटलेला आहे. साधें जीवन, साधी रहाणी, अन्नाची काटकसर या मुळेंही धान्याचा प्रश्न सुटू लागला आहे,

चीन मधील पुष्कळ खेडयांना मीं भेटी दिल्या. आतां तेथें शांतता व सुव्यवस्था आहे. लुटारू व कटवाले यांचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळें धान्याचें उत्पादन वाढलें आहे. साऱ्याचें प्रमाण पूर्वीपेक्षां कमी झाल्यानें शेतकऱ्यांजवळ सुबत्ता निर्माण झाली आहे. तो कसत असलेली जमीन त्याच्या मालकीची झाल्यामुळें त्याचा जीवनक्रम आशादायक झाला आहे.

चिनी शेतकऱ्याचा आतां देवावर फारसा विश्वास नाहीं. दैवी कोपाची त्यास भीति वाटत नाहीं. बुद्धाची प्रार्थना करून अनेक शतकें त्यास जें मिळालें नाहीं तें स्वप्रयत्नानें त्यांस साध्य झालें आहे. देवळें व मंदिरें ओस पडलीं आहेत. जीवनांत नवी आशा निर्माण करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाचें

ते भक्त बनले आहेत. जमीन वाटपाची पद्धति त्यांच्या पचनी पडली आहे. आपलें सुख हें मानवनिर्मित आहे याची त्यास जाणीव झाली आहे. देवळें आणि धर्ममंदिरें यांत शाळा व लोककल्याण केंद्रे स्थापन करण्यांत आली आहेत. टाटुंग येथील एका देवळास भेट देण्यास आम्हीं गेलों होतों. इतर बौद्ध मंदिरा प्रमाणेंच हेंही एक पुरातन देवालय आहे. देवदर्शनासाठीं हल्ली कोणी येत नाहीं असें तेथील उपाध्याय मला म्हणाले. देवळाला लागून असलेली शेत जमीन व सरकार कडून मिळणारें वर्षासन यांवरच त्यांना आपला उदर निर्वाह करावा लागतो. हें मंदिर पुरातन असल्यामुळें त्यांस वर्षासन आहे. इतर देवळें सध्यां अन्य कामासाठीं वापरलीं जातात. देवळांत दर्शनाला येण्यास हल्ली लोक भितात असें पुजारी म्हणाला. आमचें बोलणें आमच्या पैकींच एका चिनी जाणणाऱ्या माणसाच्या मार्फत आतांपर्यंत चाललें होते. एवढ्यांत आमचा दुभाषा आला. त्याबरोबर पुजारीबोवानी पगडी फिरवली आणि लोकांचा देवावर विश्वास नाहीं, मंदिरांत कोणी पूजेस येत नाहीं. इत्यादि गोष्टी तो बोलूं लागला.

चीन मधील जमीनदारी नष्ट झाल्यानें जुन्या परंपरांनाही धक्का बसला. चीन मधील स्त्रिया आतां घराबाहेर पडूं लागल्या आहेत. त्या शिकून आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन करूं लागल्या आहेत. परकीय पाहुण्या-समोर येण्यास त्या आतां भीत नाहीत. माझ्या मतें जमीन सुधारणेच्या इतर फायद्यापेक्षां हा फायदा महत्वाचा आहे.

जमीन सुधार ही एक राजकीय व क्रांतिकारक घटना आहे. तिच्या पासून तादृश आर्थिक फायदा नाहीं. सामुदायिक शेतीच्या बाबतींतही प्रयोग मर्यादित आहेत. जमिनींचें लहान तुकडे असणें हा सामुदायिक शेतीच्या कार्यांतील मोठीच अडचण आहे. चिनी शेतकरी आपल्या जमिनीबद्दल अत्यंत ममत्व बाळगत असल्यामुळें आपल्या शेतावरील मालकी सोडून सामुदायिक शेतींत तीं समाविष्ट करण्यास तो फारसा तयार नाहीं. हळू हळू हें तत्व चिनी शेतकऱ्यास पटेल आणि ते सामुदायिक शेतीचे तत्व स्वीकारतील अशी चिनी पुढाऱ्यास आशा वाटत आहे. धंदे वाढवावयाचे असतील तर शेतीचे उत्पादन

वाढवावयास हवें. ते वाढवावयाचे असेल तर सामुदायिक शेती हवी, यांत्रिक अवजारांचा उपयोग हवा. पण अजून हे घडलेलें नाहीं. ह्यामुळें मोठमोठ्या धंद्यासाठीं लागणारे भांडवल चीनजवळ आज नाहीं.

जमीन सुधार पद्धतीनें शेतकऱ्यांच्या प्राथमिक गरजा भागविल्या गेल्या आहेत. ही पद्धति अमलांत आणणाऱ्या कम्युनिस्ट राज्यपद्धतीवर व ह्या पद्धतीचा प्रवर्तक माओ त्से तुंग याजवर चिनी शेतकऱ्याचा अनन्य विश्वास बसलेला आहे.

" राजाला आवश्यक अशा तीन गोष्टी कोणत्या ? " असा प्रश्न कन्फ्युसिअसला एकदां विचारण्यांत आला. कन्फ्युसिअस म्हणाला, " अन्नाची सुबत्ता, भरपूर लष्करी सामर्थ्य आणि लोकांचा विश्वास. " कन्फ्युसिअसला पुन्हा विचारण्यांत आलें. " यांपैकीं एक वगळावयाची असेल तर कोणती वगळावी ? " तो म्हणाला " लष्करी सामर्थ्य वगळा. " यापैकी दोन वगळावयाच्या असतील तर कोणती सर्वांत महत्वाची मानावी असें त्यास परत विचारण्यांत आलें. ह्यावर कन्फ्युसिअसनें उत्तर दिलें. " लष्करी सत्ता नसली तरी चालेल, अन्नाची सुबत्ता नसली तरी चालेल, परंतु लोकांचा राजसत्तेवर विश्वास हवाच. "

चीनमधील आजच्या राजसत्तेनें हा विश्वास मिळविला आहे; निदान आज तरी.

* * *

जमीन वाटपपद्धति अमलांत आलेल्या दोन गांवांना आम्ही भेटी दिल्या. माझ्या चीनमधील दोन्हीं दौऱ्यांत हींच गांवें निवडण्यांत आलीं होतीं. त्यामुळें परदेशांतील पाहुण्यांस हींच गांवें दाखविण्यांत येत असावींत असा माझा कयास आहे. पहिलें गांव पेकिंगजवळ आहे. येथून पेकिंगला भाजी-पाला पुरविला जातो. गांवाला जाणारा रस्ता शेतांतून होता. आमचें स्वागत करण्यासाठीं शेतकऱ्यांचा जमाव आला होता. चिनी पद्धतीनें टाळ्या वाजवून त्यांनीं आमचें स्वागत केलें. आम्हाला पाहून त्यांना मनापासून आनंद झाल्याचें दिसलें. खरं म्हणजे आम्हींही टाळ्या वाजवून त्यांच्या स्वागताचा स्वीकार करावयास हवा होता. पण आम्हांला लाज वाटली-तेथील पुरुषांचे कपडे निळ्या रंगाचें होते पण स्त्रियांचीं वस्त्रें मात्र निर-निराळ्या रंगांचीं होतीं. मुलेंही खूपच होतीं. आम्हांला शेतकऱ्यांत फार वेळ मिसळूं दिलें नाहीं. जणूं कांहीं आगाऊ ठरल्याप्रमाणें लोकही थोड्या वेळांत पांगले. पोरें मात्र आमच्या भोंवतीं रेंगाळत होतीं. आम्हीं दोघे तिघे मुलांत मिसळलों. कांहीं वेळ त्यांचे गाण्याचे व नृत्याचे कार्यक्रम झाले. पण नंतर काय झालें कोणास ठाऊक तीं पोरेंही पळून गेलीं.

चिनी मुलें आकर्षक आहेत. त्यांना आमच्यांत मिसळण्याची खूप इच्छा होती. पण बहुधा त्यांना परवानगी नसावी. चिनी जनता व आम्ही यांच्यामध्यें नेहमींच दुरावा ठेवला जाई.

या गांवांत एकूण ४३० कुटुंबें असून लोकसंख्या २०५० होती. गांवांतील शेतजमीन एकूण ३६५ एकर होती. जमीनवाटप कायद्याच्या आधीं येथें जमीनदारांचीं २० घरें असून त्यांच्या ताब्यांत सुमारें ३०० एकर जमीन असे. यांपैकीं कांहीं जमीनदारांवर खटले होऊन त्यांच्या जमिनी काढून घेण्यांत आल्या. राहिलेल्यांना इतर शेतकऱ्यांप्रमाणेंच जमिनीचा वाटा मिळाला. चिनी सरकारनें या शेतकऱ्यांना बरीच मोठी रकम कर्जाऊ दिली होती.

या गांवांत १९५० मध्यें जमिनीचें वांटप करण्यांत आले. त्याचे सुपरिणाम आमच्या दृष्टीस पडले. घरांत घड्याळें चिनी मातीचीं भांडीं वगैरे वस्तू होत्या. एका घरांत तर छोटासा रेडियो सेटही होता.

जमीन वाटपानंतर शेतांतील उत्पादन वाढल्याचें एका सरकारी अधिकाऱ्यानें आम्हांस सांगितलें. गांवकऱ्यांनीं गुरें ढोरें व बैलगाड्या खरेदी केल्या होत्या. नव्या विहीरी खोदण्यांत आल्या होत्या. नवीन उघडलेल्या शाळेंत १६० मुलें व ४२० प्रौढ शिक्षण घेत होते. कोरिया युद्ध फंड, अमेरिका विरोध फंड वगैरें फंडास गांवकऱ्यांकडून चांगली मदत मिळूं लागली होती. लोक सुखांत दिसले. पण येथील खेडूताचें जीवनमान मात्र भारतांतील खेडूतांपेक्षां कमी वाटलें.

एकेका घरांत कित्येक ठिकाणीं दोन कुटुंबें रहात. प्रत्येक घरांत दोन खोल्या असत. बाहेरची खोली बसण्यासाठीं व आंतील खोली स्वयंपाकघर. घरांतील गाद्या वगैरे सामान बाहेरच्या खोलींतील एका कोपऱ्यांत व्यवस्थित ठेवलेलें असे. जमीनीवर लांकडी फळयांचा प्लॉटफॉर्म असे. थंडीच्या दिवसांत त्याच्या खालीं विस्तव ठेवून खोलींत उब आणण्यांत येई.

चीनमधील आणखी एका खेड्यास आम्हीं भेट दिली. हें खेडें उत्तरेस आहे. या बाजूस जमीन वाटप आधीं झालें होतें. त्यामुळें येथील खेडीं अधिक सुधारलेलीं दिसली. या खेड्यांतील गांवकरी आमच्यांत खूपच मिसळले. त्यांचे कपडे चांगले होते. शरिरानें येथील माणसें सुदृढ दिसली. त्यांनीं आम्हांस अल्पाहार दिला. या गांवाचें नांव काओ कांग असें होतें. आम्हांला त्यांनीं फळें दिलीं व ती घरीं घेऊन जावीं असेंहि सांगितलें. दाक्षिणेकडे असें आदरातिथ्य आढळलें नाहीं. आम्हीं जातांच गांवकऱ्यांनीं भराभर टेबलें व खुर्च्या जमविल्या आणि एका झोंपडींत आमची व्यवस्था केली.

काओ कांगची लोकवस्ती ७४२ व एकूण जमीन ४१२ एकर होती. पूर्वीच्या १० जमिनदारांपैकीं दोघे जणच येथें शेतकरी म्हणून रहात होते. येथील लोक सुखी दिसले पण पिकाचें प्रमाण फारसें वाढल्याचें आढळून आलें नाहीं.

अनुक्रम ................ .. दि. ................
क्रमांक ................ नों: दि: ................

या ठिकाणच्या कांहीं शेतकऱ्यानीं आपल्या जमिनी एकत्रित करून सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरू केला होता. शेतमजुरी करणाऱ्या लोकांनीं आपला संघ स्थापन केला होता. या संघांत चाळीस पुरुष व तेरा स्त्रिया होत्या. या लोकांच्या जमिनींवर काम करण्यासाठीं घरांतील माणसें पुरीं पडत नसत म्हणून आपसांत मदत करून ते आपलीं कामें पार पाडत. आणि त्याबद्दल मोबदला म्हणून धान्य देत. हे सर्व शेतकरी आपलें धान्य एकत्र करून सारख्या प्रमाणांत वाटून घेत असा जो सरकारी प्रचार करण्यांत येत होता तो खोटा असल्याचें आम्हांस आढळून आलें. सर्व देशभर अशा संघघटनांचें जाळें विणण्यांत आलें आहे.

सामुदायिक शेतीचा प्रसार आतां या देशांत पुष्कळ झाला आहे. लहान लहान शेतांभोवतालचीं कुंपणें जाऊन त्याच्या जागीं मोठीं मोठीं सामुदायिक शेतें नजरेस पडूं लागलीं आहेत. एके ठिकाणीं तर ४५० एकरांचें एक शेत आम्हांस पहावयास मिळालें. शेतांत कोणतें पीक काढावयाचें याचा एकदां सर्वांनीं निर्णय घ्यावयाचा व शेतकऱ्यांनीं आपले श्रम, आपली जमीन व आपलीं अवजारें यांच्या साहाय्यानें तो निर्णय पार पाडावयाचा अशी व्यवस्था असे. पीक तयार झालें कीं सरकारी सारा व पुढील वर्षासाठीं बी बियाणें यांची अगोदर व्यवस्था करावयाची व नंतर राहिलेलें धान्य सर्वांनीं वांटून घ्यावयाचें. ही वांटणी करतांना कष्टांसाठीं साठ टक्के, व जनावरें व अवजारें यांच्यासाठीं दहा टक्के असा हिशेब करण्यांत येई.

या पद्धतीचे अनेक फायदे असत. सगळें गांव एकत्र झाल्यानें हप्तेबंदीच्या पद्धतीनें अवजारें मिळूं शकत. यासाठीं सरकारी सहाय्य मिळूं शके. पहिल्या वर्षीं २५ टक्के, दुसऱ्या वर्षीं ३५ टक्के तिसऱ्या वर्षीं ४० टक्के या प्रमाणांत वस्तूंची रक्कम फेडावी लागे.

ही योजना चांगली आहे खरी. पण यांत्रिक मदतीचें प्रमाण जसजसें वाढेल तसतसें बेकारीचें प्रमाणही वाढूं लागेल अशी मला भीति वाटली. कारण यांत्रिक मदतीनें शेती करावयाची असल्यास फारच मोठ्या प्रमाणावर ती करावी लागेल. चीनची लोकसंख्या हळूं हळूं वाढेल. पुढच्या पिढींत

जमिनीचे लहान लहान तुकडे पडतील व शेतींचें उत्पन्न कमी कमी होत जाईल. यावर उतारा म्हणून चीन सरकारनें सामुदायिक शेतीच्या उपक्रमास हात घातला आहे. हें धोरण योग्य असेंच आहे. चिनी शेतकऱ्याला आपली जमीन अत्यंत प्यार आहे. सामुदायिक शेतीच्या पद्धतीनें त्याला आपल्या जमिनीबद्दल वाटणारें ममत्व हळूं हळूं कमी होईल. अर्थात यास बराच काळ लागेल. आजच शेतकऱ्यांवर सामुदायिक शेतीचें तत्त्व बळजबरीनें लादल्यास ते बंड करतील हें चिनी सरकार ओळखून आहे.

काओ कांग येथील शेतकरी जमिनीच्या वाटपामुळें अगदीं खूष झालेले दिसले. या नव्या पद्धतीने आपणांजवळ आलेले कपडे, घरें, कोंबड्या डुकरें यांचा ते कौतुकानें उल्लेख करीत. घरांचे कागद हातीं आल्यानंतर रात्रीं-बेरात्रीं उठून आपल्या मालकीच्या जमिनींकडे पुन्हां पुन्हां पहाणें हा त्यांचा कांहीं काळ छंद होऊन बसला होता.

शेतकऱ्याचें एक घर पहाण्यास आम्हीं गेलों. या घरांत एक शेतकरी, त्याची बायको व नऊ वर्षांची मुलगी अशीं तीन माणसें होती. दोन खोल्यांत त्यांनीं आपला संसार मांडला होता. पूर्वी त्याच्याजवळ जमीन नव्हती. आतां त्याच्याजवळ दीड हजार एकर जमीन असून एक आदर्श शेतकरी म्हणून त्याची ख्याति होती. त्याची बायको शेजारीं बसली होती; आमच्याशीं बोलतांना तो शेतकरी मधून मधून तिचें मन अजमावीत असे. तीही मोकळेपणानें आपलें मत सांगत असे त्यांची मुलगी इकडे तिकडे उगीच हिंडत होती.

सुमारें अर्धातास आमचें बोलणें झालें. शेतकरीबाबा आपल्या कामाची माहिती देत होता. तो म्हणाला—"आमचें काम परस्पर सहकार्यानें चालत असल्यानें आम्हांस फायदा होतो. मीं इतर किरकोळ कामें करतों आणि त्यामुळें आमच्या उत्पन्नांत भरच पडते.

मीं म्हणालों—" आतां तुमची शेती सामुदायिक झाली. आतां या शेतावर तुमची मालकी कशी रहाणार ? "

या प्रश्नावर नवराबायकोचें खलबत झालें; आमच्या दुभाष्यानेंही या चर्चेंत भाग घेतला. नंतर शेतकरी म्हणाला. " आतां तर आमच शेत अधिक मोठं झालं आहे. शिवाय माझी जमीन माझीच आहे. "

" पण तुम्हांला आतां स्वातंत्र्य नाहीं, सामुदायिक रीत्या जें ठरेल तेंच तुम्हांला करावं लागेल. इतकं असूनही ही जमीन तुमची आहे असं तुम्हांस वाटतं काय ! "

माझ्या या प्रश्नानें तो शेतकरी अधिकच गोंधळला. तो म्हणाला— " माझ्या जमीनीप्रमाणें माझी गाडीही सामुदायिक शेतीसाठीं दिलेली आहे. गाडी जशी माझी आहे तशी जमिनही माझीच आहे. शिवाय माझ्या गाडीचें मला भाडेंहि मिळणार आहे. गेल्या वर्षापेक्षांहि मला जास्त भाडें मिळणार आहे. " मीं पुन्हां विचारलें—" दुसऱ्यासाठीं काम करणें तुम्हांस आवडलें कां ! जोंपर्यंत शेतीच्या बाबतींत तुम्हीं एकमेकांस फक्त मदत करीत होतां, तोंपर्यंत तुमच्या कामाचा तुम्हांला मोबदला मिळत असे जमीन तुम्हांपाशींच राहत असे. आज तुमच्यापाशीं स्वतःची अशी जमीन कोठें आहे ? तुमच्या जमिनीची हद्द कोणती तें सांगा पाहूं. "

" सहकारी शेतीपद्धति चांगली होती. त्यामुळें मला माझ्या कामांत मदत मिळत असे. सामुदायिक शेतीपद्धतीमुळें मी आणखी पैसे मिळवीन. जमीन अजून माझीच आहे. "

आपली परिस्थिति सुधारणें आणि कामांत उत्साह वाटणें या दोन गोष्टी त्या शेतकऱ्यांत मला आढळल्या. तरीपण आपल्या जमिनीवरील मालकी कायम ठेवण्याचा त्याचा निश्चय पक्का होता. चिनी शेतकऱ्याचें हें मत सरकारला माहीत आहे. सामुदायिक शेतीच्या प्रयोगावर बंधनें आहेत हें तेथील सरकार ओळखून आहे. देशहितास्तव आपल्या शेतीवरील मालकीहक्क सोडून देण्याबाबत शेतकऱ्यांचें मन वळवितां येईल कीं त्याबाबत सक्ति करावी लागेल एवढेंच महत्त्वाचें आहे.

* * *

## ३ : स्वावलंबी बांधकाम

हुआई नदीच्या प्रशान्त प्रवाहांतून आमची बोट संथपणें चालली होती. हुआई, यांगत्सी आणि पीत या तीन नद्या चीनमधून वाहतात. त्यांच्यापासून शेतांत जसें धान्य पिकतें तसेंच त्यांच्या महापुरानें लोक निराधार बनतात. पण दारिद्य आणि हालअपेष्टा हीं अरिष्टें चिनी लोकांच्या ललाटीं अनेक शतकें लिहून ठेवलेलीं आहेत. आज मात्र नवचैतन्याचं वारं संकटांची धूळ उधळून लावून चिनी लोकांना आशेचा किरण दाखवीत आहे.

हें नवें जीवन जगण्याचा प्रयत्न करणारे लोक मीं पाहिले आहेत. चीनमधील आजचे नवयुवक उत्साहगीतांच्या तालावर वैभवाची वाटचाल करीत आहेत. नवराष्ट्र निर्माण करण्यासाठीं त्यांनीं दृढ निश्चय केला आहे. पण हें साध्य होईल कां ?

पेकिंगपासून हा भाग कितीतरी दूर आहे. पण येथील लोकांना जीवनाची तळमळ आहे. आमच्याभोंवतीं कितीतरी लोक जमले आहेत. लहान लहान मुलेंही बोटी चालवितात. चीनचें यथार्थ दर्शन येथें घडतें. क्रांतीनं या लोकांच्या जीवनांत क्रांति केली नाहीं तर हे लोक असेच शाश्वत दारिद्यांत पिचत पडतील. गेलीं अनेक शतकं चिनी लोकांना आशेचा किरण दिसला नव्हता. जमीन सुपीक खरी पण त्यातलं पीक मोठाल्या नद्यांच्या लहरींवर अवलंबून असे. चांगला पाऊस पडला तर भरघोस पिकें येत. पण अवर्षण अथवा अतिवृष्टि झाली तर धूळदाण होई. बाह्य जगाशीं संबंध आल्यामुळें नवीन सुधारणेचे वारे या देशापर्यंत येऊन पोंहोंचले नव्हते. समाज जीर्ण होता. शांतता आणि संरक्षण देणाऱ्या भूतकाळाच्या कुशींत दडणं लोकांना आवडे. राज्यें आलीं नी गेलीं पण चिनी जनता उदास नी उदासीनच राहिली. इसवी सनाच्या ४ थ्या नी ५ व्या शतकांत चीनमध्यें बौद्ध धर्माचा

प्रसार झाला खरा, पण त्या धर्मानं समाजाची घडण बदलण्याचा प्रयत्न केला नाहीं. आपल्या पूर्वजांप्रमाणें स्वार्थत्याग—अतीव स्वार्थत्याग—हेंच त्यांच्या जीवनाचं ब्रीदवाक्य बनलं. ' ना विष्णुः पृथिवीपतिः ' अशी राजांची वागणूक होती. सरंजामदार नी जमीनदार, जुन्या परंपरा नी रूढी यांच्या कात्रींत चिनी शेतकरी सांपडला होता.

पण नवचीननें ही घडण बदलली. भूतकाळाच्या मगर मिठींतून लोकांची सुटका झाली. समाजधारणाच आतां जणूं कांहीं उफाळून निघाली आहे. छोटासा कां होईना लहानसा जमिनीचा तुकडा आपल्या मालकीचा झाल्याचा आनंद शेतकऱ्याच्या तोंडावर दिसत आहे.

आणि ज्या कम्युनिस्ट पक्षानं हें मिळवून दिलं त्या पक्षाविषयीं त्या शेतकऱ्याला नितांत आदर नी भक्ति वाटूं लागली आहे. त्याची पाठ आंता वाकलेली नाहीं. त्याची नजर धीट झाली आहे. त्याचे कुटुंबीय या आनंदांत हौसेनें सहभागी होत आहेत. जमीनदारांच्या पाशवी दृष्टिक्षेपाना बळी पडण्याची आतां स्त्रियांवर पाळी येत नाहीं. बुद्धाच्या मूर्तीसमोर धूप जाळून आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता ते आतां मानीत नाहींत.

बोटींत बसल्या बसल्या माझ्या मनांत हे विचार येत होते. थंडगार वारा अंगाला किंचित झोंबत होता. प्रवाहांत लाटांचे तरंग उठत होते. आजूबाजूला शेतं दिसत होतीं. हीं शेतं म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनाचं आश्रयस्थान ! या जमिनीवर उभें राहातां आल्याबरोबर जीवनाची लढाई जिंकण्याची उमेद त्याला आली. जमीन हेंच त्याच्या जीवनाचें साधन नी साध्य. त्याचें व्यक्तिगत जीवन या घटनामुळें बदललें खरें, पण आजूबाजूच्या परिस्थितीची जाणीव झाली होती कां ? आजपर्यंत भविष्यकाळावर त्याचा विश्वास नव्हता. आतां त्याला जमीन मिळाली. जीवनांत मिळविण्यासारखं आतां काय राहिलं ? चार हजार वर्षांपूर्वीचा एक चिनी कवि म्हणतो—

सूर्योदयापासून
सूर्यास्तापर्यंत
मी कष्ट करतों—

मी माझी विहीर खणतों.
मीं माझं शेत नांगरतों.
मी अन्न मिळवितों
नी तहान शमवतो.
मग राजा कोण आहे
याची मीं कां चौकशी करावी.
कारण मला स्वास्थ मिळालं आहे.

आजवर चिनी शेतकरी आपल्या जमीनदाराचा गुलाम होता. तो कानकोंडा झाला होता. पण आज त्याला कानकोंडें होतां येत नाहीं. कारण त्यामुळें घडत असलेला समाज उलथून पडेल अशी त्याला भीति वाटते. कम्यूनिझमची चक्रें आतां फिरूं लागलीं होतीं. त्यासाठीं त्याला मिरवणुकींत सामील व्हावं लागत होतं, झेंडे नाचवावे लागत होते. जनहितासाठीं अनेक जबाबदाऱ्या उचलाव्या लागत होत्या. या दृष्टीनं पाहिलं तर त्यानं जमिनीसाठीं दिलेलं मोल अमोल होतं. त्याला आतां राष्ट्रीय सैन्यांत दाखल व्हावं लागत होतं. पण जमिनीकडे त्यानं एकदां दृष्टिक्षेप केला. एखादं ढेकूळ उचललं, कीं स्वामित्वाच्या नी आनंदाच्या भावनेनं त्याच्या अंगावर रोमांच उठतात. ज्यांनीं त्याला ही जमीन परत मिळवून दिली, त्या पुढाऱ्यांसाठीं तो हवं तें करायला तयार आहे. पण ही उपकाराची भावना किती काळ टिकेल ?

हुआई येथें असाच एक मोठा यज्ञ चालला होता. नदीच्या खोऱ्यांत राहाणाऱ्या लक्षावधि लोकांच्या कल्याणासाठीं हे लोक झटत होते. या नद्यांना धरणं बांधावयाचीं होतीं. एकाच दगडानं अनेक पक्षी मारावयाचे होते. या धरणाच्या योजनेची प्रमुख एक स्त्री होती नी ती आमच्याच बोटींत होती. अधिकाराच्या जागांवर काम करणाऱ्या पुष्कळ स्त्रिया मला पेकिंगमध्यें भेटल्या होत्या. आमच्या स्वतंत्र स्त्रियांचं त्या प्रतीक होत्या. सौंदर्यप्रसाधनं न वापरतांही त्या दृढनिश्चयी नि तेजस्वी दिसत. आमच्या बरोबरच्या दुभाष्या स्त्रियाही शिस्तबद्ध होत्या. गणवेष घातलेल्या स्त्रिया म्हणजे

नवचीनच्या प्रतिनिधीच. त्यांचे निळे गणवेष त्यांच्या तेजस्वितेंत भरच घालीत. मधूनमधून मात्र रेशमी व रंगीत स्कार्फ गळ्याभोंवतीं गुंडाळून आपल्या जुन्या आवडी त्या पुरवीत. तुम्हांला आकर्षक कपडे घालणं आवडत नाहीं कां ? असं मीं एकदां माझ्याबरोबर असलेल्या दुभाष्या स्त्रीला विचारलं. ती म्हणाली—" आमच्या देशाला परवडेल त्याच वेळीं आम्ही आकर्षक कपडे वापरूं. " शांघायमध्यें असतांना आनंदाच्या भरांत मी तिच्या कडे पाहून गाणं गुणगुणूं लागलों. ( चिनी लोकांना नृत्य आवडतं हें मला माहीत होतं. ) तिनं लगेच माझ्याकडे आपली तीक्ष्ण दृष्टि वळविली आणि नवचीनमध्यें तथाकथित भावनांना आतां थारा नाहीं असें सुचविलं. चीनमधील स्त्रिया आतां पूर्वीसारख्या अबला राहिल्या नाहींत.

आमच्या बरोबरच्या एंजिनियर बाईचं व्यक्तिमत्त्व प्रभावी होतं. तिच्या हाताखालीं हजारों पुरुष काम करीत होते. कम्युनिस्ट पक्षांत तिनं जबाबदारीचीं कामें केलीं होतीं. चालतांना ती ताठ चाले, आणि आमच्या एकूण प्रवासांत ती कधींच थकली भागलेली दिसली नाहीं. हाताखालचे नौकर तिच्याविषयीं आदर बाळगीत. तिच्याभोंवतीं जमत नि तिचं ऐकत. तशी ती देखणी नव्हतीच. पण तिचा आत्मविश्वास जबर होता. राग आणि हास्य यांचं एक गमतीदार मिश्रण तिच्या डोळ्यांत दिसून येई. कम्युनिस्ट पक्षाची अरेरावी श्रद्धा तिच्या अंगीं बाणत असल्यानें इतर साधारण स्त्रियांपेक्षा ती उठून दिसे.

आम्ही एक आठवडा बरोबर होतों. हुआई धरणासंबंधीं माहिती सांगतांना तिला कधींच कंटाळा आला नाहीं. " गेलीं नऊ वर्षे इथल्या लोकांनीं हाल अपेष्टा सोसल्या. महापुरांनं पन्नास लाख लोक बुडून मेले. मा ओत्से तुंग आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्या प्रेरणेनं सुधारणा घडून येऊं लागल्या. १९३८ मध्यें शत्रूंनीं पीत नदीचे कालवे फोडले. सगळं पाणी हुआई नदींत शिरलं नि हा प्रदेश म्हणजे एक मोठं सरोवर बनलं " ती म्हणाली.

अशीं विधानें केलीं कीं लोकांना चेव येई आणि वस्तुस्थितीकडे त्यांचें दुर्लक्ष होई. असल्या विधानांचे प्रयोग आमच्यासारख्या पाहुण्यांवरही करण्यांत येत त्यामुळें मतं बनवितांना आम्हांला भारी जागृत राहावं लागे. खरं म्हणजे हुआई नदीला आजपर्यंत एकूण ९ ३५ वेळां महापूर आले. तिच्यामुळं जनतेला हालअपेष्टा सोसाव्या लागल्या असल्या तरी लोकांचं या नदीवर मनापासून प्रेम होतं. म्हणून या नदीच्या पाण्याला अडविण्याचं काम जें सरकार हातीं घेईल त्या सरकारला जनतेचं पाठबळ मिळण्याची खात्री असे. कम्युनिस्ट सरकारनं ही संधि साधली.

हुआई नदीचें धरण हें आजच्या चीनचे गुण आणि दोष यांचें प्रतीक आहे. भरपूर मनुष्यबळ आणि यांत्रिक शक्तीचा अभाव हीं दोन्हीं येथें नजरेला पडतात. कालवे आणि पाटबंधारे यांनींच या नदीचें पाणी आडवण्याचें काम आजवर होत असे. पण हे कालवे फुटत नि चहूंकडे पाणी पसरे. शेतकरी बिचारा हतबुद्धच होई. कालवे दुरुस्त करायचे म्हटलें तरी लक्षावधि लोक लागत. कम्युनिस्टांनीं हें काम केलें. पन्नास हजार कम्युनिस्ट सभासद नि एक लाख तरुण यांनीं सर्वत्र हिंडून लोकांत उत्साह आणला. सभा, घोषणा नी मिरवणुका यांनीं वातावरण दुमदुमून गेलें. "कम्युनिस्ट सरकारनें तुम्हांला जमीन दिली आहे. ती राखणें तुमचें काम आहे." कष्टांतच सुख आहे. वाईटांतून चांगलें निपजतें" अशा या घोषणा होत्या.

चाउ शान नांवाच्या एका शेतकऱ्याचा व आमचा परिचय करून देण्यांत आला. चाळीस वर्षांचा हा इसम शरिरानें धिप्पाड नि कामाला जणूं कांहीं वाघ होता. हुआई धरणाला लोकांची मदत घेण्यासाठी त्यानें प्रचार केला. एका सभेंत भाषण करतांना तो म्हणाला. "आजवर करांच्या ओझ्याखालीं आम्हीं भरडून निघालों होतों. जमीनदारांच्या जमिनींचं संरक्षण करण्यासाठींच आम्हीं नदीवर राखण करीत असूं. माओनं आतां आपल्याला जमीन दिली अरेह. आतां या जमिनीचं रक्षण करणं हा आपला धर्म आहे."

चिन शुलिंग नांवाच्या एका मुलीचे वडील जपान्यांच्या हातून मारले गेले. त्या वेळीं ती केवळ नऊ वर्षांची होती. जमीनवांटप कायद्या-

खालीं तिलाहि थोडी जमीन मिळाली. गांवोगांवचे स्त्रीपुरुष या धरण योजनेसाठीं गोळा करणें हेंच तिचें काम होतें. या सगळ्यांच्या प्रयत्नांनीं हुआई धरणाच्या कामासाठीं दोन लाखांवर लोक गोळा झाले. हीं माणसें आपल्या घरून हत्यारें घेऊन येत असत. त्यांना राहायला घरें नि जेवण फुकट मिळे. वर्षातून ऐंशी दिवस ते काम करीत. गेल्या दोन वर्षांत या लोकांनीं सुमारें पंधराशें मैलांचे कालवे बांधले आणि पांचशें चाळीस मैल जमीन परत मिळविली.

पण केवळ नदीचा प्रवाह बदलून भागणार नव्हतें. पाण्याच्या प्रवाहाचा वेग आवरणें नि पाणी सांठवणें हें महत्वाचें होतें. हुआई नदीला जवळ जवळ दोनशें उपनद्या येऊन मिळतात. या उपनद्यांच्या उगमाशीं धरणें बांधायला हवीं होतीं. मधूनमधून नदीचा प्रवाह अडविण्यासाठीं प्रवाह सोडून सरोवरें तयार करणें आवश्यक होतें. या कामावर सध्यां सोळा हजार तंत्रविशारद काम करीत आहेत. या आंकड्यांवर कोणाचा विश्वास बसणार नाहीं.

बरोबर आलेली एंजिनियर बाई ही कोणी पदवीधर एंजिनियर नाहीं. पण तिच्या बोलण्यानं नि उत्साहानें आम्हीं जणूं कांहीं अगदीं मुग्ध झालों होतों आमचा बोटींतील प्रवास फारसा सुखावह नव्हता. पण त्या प्रवासापासून आम्हांला कितीतरी धडे घेतां आले. या योजनेनें ऐंशी लक्ष एकर जमीन लागवडीला आली. १७ लक्ष लोकांचा फायदा झाला नि पन्नास लक्ष लोकांचे हाल वांचले. ही एक मोठीच योजना होती. आम्हांला ही योजना चिनी पंतप्रधानांच्या खास आदेशावरून दाखविण्यांत येत होती. सर्व साधारण पाहुण्याला हें काम पाहाण्याची परवानगी मिळत नाहीं. असें आम्हांला सांगण्यांत आलं म्हणून आम्ही हें काम पाहण्यास अतिशय उत्सुक होतों. पण अखेरीस आमच्या पदरीं निराशाच पडली.

आमची बोट प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें चालली होती. कांठावरील लोकांचें जीवन सुधारलेलें आढळून आलें नाहीं. कित्येक ठिकाणीं कालवे बांधण्याचें काम पुरें झालें होतें. नदीचें पात्र आकारांत आलें होतें. मधून-

मधून लाल झेंडे घेतलेल्या मुलांच्या टोळ्या नजरेस पडत होत्या. पण त्या टोळ्या शांत होत्या. घोषणा वगैरे आल्हांला ऐकूं आल्या नाहींत. रात्री अगदीं शांत होत्या. चिनी लोकांची प्रख्यात नृत्येंही आम्हांला ऐकूं आलीं नाहींत. जनतेंत उत्साह असा फारसा दिसला नाहीं.

यांग को या नांवाचें चिनी लोकांचें एक प्रख्यात नृत्य आहे. माओनें या नृत्याला अधिक चालना दिली त्या नृत्यास राष्ट्रीय महत्त्व आलें. पिकें तयार झालीं कीं खेड्यांतील शेतकरी हें नृत्य करतात. ताशे आणि ढोल यांची या नृत्याला साथ असते. या नृत्याची चाल सोपी आहे पण तें आपल्याला कंटाळवाणें वाटतें. या नृत्याच्या भावार्थ असा आहे.

दरवर्षी शेतांत पीक पिकतें पण आमच्या हातीं कांहींच लागत नाहीं,
दरवर्षी कर्ज वाढतच जातें.
मोडक्या झोंपड्या, फुटकीं तपेलीं नि चोरलेलीं भांडीं.
अर्धा एकर जमीन नि पांच थडगीं !

अजूनही सर्वत्र हीच परिस्थिति आहे. अर्धा एकर जमीन नि पांच थडगीं !

आम्हीं गेलों त्या वेळीं अघोटीचीं कामें चाललीं होतीं, शेतकऱ्याला नृत्यें वगैरें करण्यास वेळच नव्हता. या धरणाच्या योजनेनें शेतकऱ्याच्या जीवनांत चेतना निर्माण झालेली दिसली नाहीं.

आमच्या दोहों बाजूंला माणसांनीं खचलेल्या बोटींची ये. जा चालूं होती. त्यांची गति सहेतुक वाटली नाहीं. कित्येक लोकांनीं असल्या बोटींतच कायम वसति केली होती. चीनच्या शेतकऱ्यांना स्वास्थ्य मिळायला किती वेळ लागणार आहे कोण जाणें !

आम्ही जुंगोची येथें एकदांचे येऊन पोंहोंचलों. येथील अवाढव्य धरण पाहाण्यासाठीं आम्हीं आलों होतों.

पण नजर टाकतांच मला धक्का बसला. हें धरण म्हणे तीन महिन्यांत बांधण्याचा विक्रम करण्यांत आला होता ! या धरणाच्या बांधकामांत म्हणे लोकांची बुद्धिमत्ता नि श्रम दिसून येत होते. ! कसलें हें धरण ? नदीचा

प्रवाह अडविण्यासाठीं बांधलेला तो एक बांध होता ! अगदीं साधा बांध. या धरणाचा झालेला गवगवा आम्हीं ऐकला होता. पण प्रत्यक्ष धरण पाहिल्यावर आमच्या सर्व अपेक्षा मावळल्या. हें धरण मीं पाहिलें नसतें तरी बरें झालें असतें असें मला वाटलें ! इतकी माझी निराशा झाली ! आमची ही निराशा आमच्या बरोबर आलेल्या एंजिनियर बाईच्या बहुधां ध्यानीं आली असावी. लाखों लोकांचे श्रम, त्यांची येथें झालेली वसति यांचा कांहींच मागमूस दिसेना ! थोड्याश्या झोंपड्या दिसत होत्या मात्र ! धरण अजून पुरें झालेंच नव्हतें ! एंजिनियर बाईनीं थोडीशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ वाटला. तिला राग आला असावा बहुधां ! ती त्या धरणाचा खर्च सांगू लागली, भविष्य काळाच्या योजना सांगू लागली, याच धरणासाठीं इतरत्र कामें सुरूच आहेत असें म्हणू लागली, एकादें काम प्रत्यक्ष पाहून निराशा पदरीं घेण्यापेक्षां त्या कामाचे सरकारी अहवाल वांचून तीं वक्तव्यें ऐकून समाधान मानून घ्यावें असें मला वाटूं लागलें.

अर्थातच या सफरीचा एक फायदा मात्र झाला. जमीन—सुधार-योजनेचे परिणाम होतात हें आम्हांला कळलें. जमीनीची नुकसान भरपाई, शेतकऱ्यांचीं स्थलांतरें या गोष्टी अशक्य नाहींत हें आम्हांला पटलें.

एखाद्या देशाला स्वावलंबनानें आपली सुधारणा करून घ्यावयाची असल्यास उपलब्ध असलेल्या साधनांनी ती करून घेतां येते याचेंही या सफरींत आम्हांला प्रत्यंतर आलें. मनुष्यबळाच्या सहाय्यानें मोठमोठीं कामें अशीं तडीला नेतां येतात हेंही आम्हांला पाहावयाला सांपडलं; पण कम्युनिस्ट सरकारच्या कार्यक्रमांमुळें देशांत मोठी थोरली उत्साहाची लाट पसरली आहे असें जें आम्हांला वारंवार सांगण्यांत येत होतं त्याचें मात्र प्रत्यंतर आम्हांला आलें नाहीं. आपण करीत असलेलें काम आपल्या व देशाच्या उन्नतीला उपकारक होत आहे, औद्योगिक विकासाला आपण हातभार लावीत आहों अशी आजच्या चीनमधील शेतकऱ्याची भावना झालेली आहे असें सरकारी पत्रकांत सांगण्यांत आलें होतें. पण त्याचा प्रत्यय आम्हांला आला नाहीं. एवढें मात्र

खरें कीं स्वतःच्या मालकीची जमीन झाल्यामुळें चीनमधील आजचा शेतकरी खूश झाला आहे. आणि तो प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. पण स्वतःच्या मालकीची जमीन असण्याचा आनंद आणि त्यामुळें आपल्या देशाचा होणारा विकास हीं सारखींच आहेत काय ?

* * *

चँग कै शेकला सत्तेचा लोभ असल्यामुळें त्याचा नाश झाला असें एका लेखकानें म्हटलें आहे. युद्धाच्या वेळीं चिनी शेतकरी आणि कामगार यांनीं आपलें सर्वस्व पणास लाविलें पण त्यानंतर मात्र सर्व पारडें उलटलें. " आमचें रक्त शोषण करणाऱ्या जमीनदारांचा नाश होवो " अशा घोषणा सर्वत्र सुरू झाल्या. शेतकऱ्यांमध्यें आपल्या परिस्थितीबद्दल अत्यंत चीड निर्माण झाली, कम्युनिस्टांनीं या संधीचा फायदा घेतला. इतके दिवस त्यांचे प्रयत्न कर कमी करणें आणि जमिनीचें फेर वांटप करणें हीं उद्दिष्टें जाहीर करून त्यांनीं जनतेचीं हृदयें काबीज केलीं व सत्ता हस्तगत केली.

तसें पाहिलें तर चीनमधील क्रांति शेतकऱ्यांची होती. अर्थात् यामुळें राजकारणांतही शेतकऱ्यांचें वर्चस्व व्हावयास हवें होतें. पण कम्युनिस्टांना कामगारांचें वर्चस्व हवें होतें. शेतकऱ्यांची सत्ता त्यांना नाहींशी करावयाची होती. जमीन वांटप केल्यामुळें शेतकरी वर्ग खूश झाला. राजकारणाच्या बाबतींत तो अलिप्त राहिला. परंतु शेतकरी व कामगार यांच्यांत अजून संघर्ष चालूच आहे. आणि तो संघर्ष कोणत्या बाजूला वळावेल यावर कम्युनिस्टांचें यशापयश अवलंबून आहे.

कम्युनिस्टांनीं हें इंगित ओळखलें आहे म्हणून त्यांनीं शेतकऱ्यांना जमिनी देऊन त्यांचें तोंड बंद केलें. चीनमध्यें शेतीच्या बाबत झालेल्या सुधारणांचा आपण पूर्वीं आढावा घेतलाच आहे. कामगार हेच राष्ट्राचे खरे नेते आहेत असा वारंवार पुकारा करून आणि कामगारांचे हात बळकट करून कम्युनिस्ट सरकार आपलें चीनमधील आसन आतां स्थिर करूं पाहात आहे.

कामगारचळवळ हा चीनमधील कम्युनिस्ट राज्यकारभाराचा जणुं कांहीं आत्माच आहे. यासाठीं सरकारकडून कामगारांना हरतऱ्हेची मदत मिळते. याचा मोबदला म्हणून कामगार वर्ग सरकारी धोरणाचा पाठपुरावा

करतो आणि कम्युनिस्ट पक्षाचें सामर्थ्य वाढवतो. चीनमध्यें कामगारांच्या मोठमोठ्या संघटना आहेत. कामगारासाठीं करण्यांत आलेले कायदे अमलांत येतात किंवा नाहीं हें पाहाण्याची जबाबदारी या संघटनांवर असते. सरकारी कारखान्याची व्यवस्था नि उत्पादन यांची जबाबदारी या संघटनांनाच सांभाळावी लागते. म्हणून संघटनांचें चीनमध्यें वर्चस्व झालें आहे. कायदेशीर रीत्या मजुरांवर संघटनेंत सामील होण्याची सक्ति केली जात नाहीं. पण अशा संघटनांत सामील होणें हें मजुरांस व्यावहारिक दृष्ट्या आवश्यक वाटतें. ऑल चायना फेडरेशन ऑफ लेबर या संस्थेचे सध्यां साठ लक्ष सभासद आहेत. उद्योगधंदे, टपाल, तार, वाहतूक, शिक्षण, छापखाने वगैरे सर्व धंद्यांतील लोक या संघटनेचे सभासद आहेत.

मजुरांस व कामगारांस लोकसत्ताक राज्यपद्धतींतील कांहीं अधिकार तरी मिळावेत म्हणून प्रत्येक कारखान्यांत व्यवस्था समित्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. सरकारी कारखान्यांत या समित्यांचा उपयोग उत्पादन वाढविण्याकडे करून घेण्यांत येतो. बाकीचीं कामें एका सरकारनियंत्रित समितीच्या द्वारां करण्यांत येतात. सरकारकडून आलेल्या सूचनांची अंमलबजावणी या समित्यांस करावी लागते. कामगारांच्या हिताच्या गोष्टी करण्यासहि सरकारी मंजुरीची आवश्यकता असते. कांहीं खाजगी उद्योगधंदे सरकारी मालकीचे झाल्यानंतर तेथील मजुरांचे पगार कमी झाल्याचीं उदाहरणें आहेत; परंतु खाजगी धंद्यांत मात्र मजुरांच्या समितीच्या हातीं मोठी सत्ता असते. मालक व मजूर यांत चर्चा व वाटाघाटी होतात. पगार, काटकसर, वगैरे प्रश्न सरकारकडे लवादासाठीं जातात नि बहुशः सरकार कामगारांची बाजू घेतें पण कारखाना सरकारच्या ताब्यांत गेला कीं मात्र मग निकाल नव्या मालकाच्या म्हणजे सरकारच्या बाजूनें होतो. यामुळें खाजगी धंद्यांत अतिशय कटकटी निर्माण होतात व फायद्याचें प्रमाण घसरतें.

सरकारच्या धोरणाचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीनें कामगार संघांचा पुष्कळ उपयोग होतो.

कोरियामध्यें युद्ध सुरू झालें त्या वेळीं अधिक तास काम करण्याचें व युद्धफंडास मदत करण्याचें कामगारांवर दडपण आणण्यांत आलें. कामगारांना दररोज दहा ते अकरा तास काम करावें लागे. काम संपल्यानंतरही त्यांनीं बैठकांस हजर राहावें लागे. हें कार्य उपयुक्त खरें पण त्याचा कामगारांवर असह्य ताण पडे.

'चीनची पुनर्घटना' या ग्रंथांत म्हटलें आहे कीं "चिनी कामगाराला आतां जीवनाबद्दल एक नवीन तळमळ वाटूं लागली आहे. आपण या देशाचे मालक झालों आहों याची त्यास जाणीव होऊं लागली आहे. कारखान्यांतील उत्पादन आपण जसें जसें वाढवूं तसें तसें आपलें व आपल्या राष्ट्राचें वैभव आपण अधिक वाढवूं हेंही त्यास पटलें आहे."

पण चिनी कामगाराच्या या तळमळीच्या मागें राजकारणी लोकांच्या कारवाया आहेत. राजकारणांत कामगारांचें महत्व वाढविण्याचा आव आणून त्यांच्याकडून अधिकाधिक काम मात्र करवून घेण्यांत येत आहे.

यासाठीं सरकारतर्फे एक नवें आमिष दाखविण्यांत येत आहे. प्रत्येक कारखान्यानें आपल्यांतून एक 'आदर्श कामगार' निवडावयाचा. या कामगाराला अधिक पगार व सवलती द्यावयाच्या. कारखान्याला पाहुणे भेट देण्यास आले कीं हा आदर्श कामगार त्यांच्या बरोबर असतो. निरनिराळे शोध व निर्मिति-विक्रम या आदर्श कामगारांमुळें साध्य झाले असें सांगण्यांत येतें. त्यांना वृत्तपत्रांत प्रसिद्धी देण्यांत येते व पेकिंगसारख्या शहरीं राष्ट्रीय समारंभांत भाग घेण्यासाठीं त्यांना सन्मानानें पाठविण्यांत येतें. असे अनेक 'आदर्श कामगार' मला निरनिराळ्या ठिकाणीं पाहावयास मिळाले. आदर्श कामगारांची निवड कोणत्या पद्धतीनें करण्यांत येते हें मात्र मला पाहावयास मिळालें नाहीं. एवढें मात्र खरें कीं गुणग्रहणाच्या या अभिनव पद्धतीमुळें कामगारांच्या विचारशक्तीला दिवसेंदिवस अधिक वेग येऊं लागला आहे. एका मोटारीच्या कारखान्यांत कांहीं हत्यारांची कमतरता आढळून आली. पण तेथील कामगारांनीं एकत्र जमून व विचारविनिमय करून हातीं असलेल्या साधनांच्या साहाय्यानें तीं हत्यारें तेथेंच तयार केलीं हें या बाबतींतील एक उदाहरण होय.

अशा तऱ्हेनें तयार झालेली एक गाडी मीं स्वतः पाहिली होती. कापडाच्या धंद्यांत अशीं कितीतरीं उदाहरणें आढळून आलीं. चीनमध्यें कापडाची कमतरता आहे. अशा परिस्थितींत उत्पादन वाढविणें हा एकच उपाय होता. कापूस वायां जात असे. त्यांतही काटकसर करणें आवश्यक होतें. अशा वेळीं हा चिन सू या कामगार स्त्रीचें बुद्धिकौशल्य प्रत्ययास आलें. फुकट जाणाऱ्या कापसाचें प्रमाण शेंकडा एक टक्क्यापासून तिनें पाव टक्क्यावर आणलें. तिची पद्धति प्रमाण म्हणून समजण्यांत आली. हा प्रयोग यशस्वी झाला तर दर वर्षी सव्वासहा कोटी वार अधिक कापड तयार होईल व एक मोठा प्रश्न सुटेल. या कृत्याबद्दल हा चिने सूचें सर्वत्र कौतुक झालें, तिला अनेक मानाच्या जागा मिळाल्या. हेंगयुआन येथील कापडाच्या गिरणींत मला आणखी एक पुरावा मिळाला. या गिरणींत पूर्वीं एक हजार कामगार होते. आतां तेथें आंठराशें कामगार असून दहा तासांची एक अशी दोन पाळ्या चालू आहेत. पूर्वीं दर मागापासून दररोज ४७ वार कापड निघत असे. आतां ६३ वार कापड निघतें. हें प्रमाण आजच्या भारतीय कामगाराच्या बरोबरीनें आहे.

चीनमधील आजच्या कामगाराला किती पगार मिळतो हें जाणून घेण्याची मला उत्सुकता होती. बहुतेक ठिकाणीं सरकारनें किमान वेतन ठरवून दिलेलें आहे. सर्वसाधारणपणें दोन प्रौढास जगतां येईल इतका पगार एका कामगारास देण्यांत येतो. याबाबतींत मला तपशीलवार माहिती मिळूं शकली नाहीं. पण चिनी कामगारांचे पगार बऱ्याच अंशीं समाधानकारक आहेत असें मला आढळून आलें आहे. वृद्धापकाळ व आजारीपणा यांसाठीं सरकारनें कामगारांसाठीं सुख सोयी केलेल्या आहेत. सध्यांच्या कायद्यान्वयें चीनमधील कामगारांचा वैद्यकीय खर्च व आजारीपणांतील भर पगारी रजाहीं कारखानदारांनीं द्यावयाचीं असतात. कारखान्यांत अपघात झाल्यास तीन महिने भरपगारी रजा देण्यांत येते. एरवी भरपगारी रजेची मर्यादा दीड महिना असते. त्यानंतर तीन ते सहा महिने अर्ध पगारी रजा मिळूं शकते. त्यानंतर जरूर वाटल्यास असमर्थता फंडांतून पेन्शन मिळूं शकतें. पुरुषांना

वयाच्या साठाव्या वर्षी व स्त्रियांना पन्नासाव्या वर्षी पेन्शन मिळण्याची व्यवस्था आहे. एकूण पंचवीस वर्षे व ज्या कारखान्यांतून निवृत्त व्हावयाचें असेल तेथें दहा वर्षे तरी त्या कामगाराची नोकरी झाली असेल तरच तो पेन्शनला पात्र होतो. बाळंतपणासाठीं स्त्रियांना छपन्न दिवस भरपगारी रजा मिळते व खेरीज इतर सवलती मिळतात. स्त्रीकामगाराचा बाळंतपणाचा सर्व खर्च सरकार सोसतें.

कारखान्याच्या व्यवस्थापकांच्या सहकार्यानें मजुरांच्या संघटनांतर्फे आरामगृहें, स्वास्थ्यगृहें व बालसंगोपन केंद्रें बांधण्यांत आलीं आहेत. कारखान्यांत स्वस्त भोजन गृहें आहेत. कोणाही कामगारास आजाराव्यतिरिक्त रजा मिळूं शकत नाहीं. नौकरीवरून कोणाही कामगारास काढून टाकण्यांत येत नाहीं कम्युनिस्टांच्या अर्थशास्त्रांत उत्पादन मूल्यांस फारसें महत्व देण्यांत येत नाहीं. त्यामुळें या सर्व गोष्टी साधतात. आजवर चीनमध्यें अर्थशास्त्राचें गणित फारसें नव्हत्तेंच. अद्यापहि मला हवे असलेले आंकडे मिळूं शकले नाहींत. चीनमध्यें तयार माल विकतांना त्यावर घालतां येणारीं बंधनें आणि बाजारभावांची स्थिरता यांचाच विचार करण्यांत येतो. देशाच्या उत्पादन सामर्थ्यानुसार कामगारांचे पगार वाढविण्यांत येतात. भांडवलशाही राष्ट्रांत मागणी व पुरवठा या तत्त्वावर निरनिराळ्या धंद्यांतील कामगारांचे पगार ठरवितात. विशिष्ट वस्तू कोणत्या भावानें व किती प्रमाणांत खपेल यावर चीनमधील वेतनश्रेणी ठरते. कारण कारखान्यांपासून मिळणारा फायदा सरकारला मिळतो. एका विशिष्ट व्यक्तीच्या अथवा व्यक्तिसमूहाच्या हातीं जात नाहीं. फायद्याचें वांटप करतांना जनतेच्या सुखाचा विचार केलाच जातो. त्यांतच कामगार सामावले जातात म्हणून ही पद्धति चालूं शकते.

आपल्या स्वतःबद्दल, आणि आपल्या देशाबद्दल, स्वतःच्या आणि देशाच्या उन्नतीबद्दल मला सर्वत्र जागरूकता दिसली. चीनमधील कामगारवर्ग स्वतःला पुढारलेला समजतो. राजकीय व आर्थिक चळवळींत कामगार पुढाकार घेतात. नव्या चीनमध्यें लोकशाही निर्माण करण्यासाठीं त्यांचा उपयोग केला जातो. याबाबत खालील प्रश्नोत्तरें उद्बोधक वाटतील. एका सतरा

वर्षाच्या उमेदवारानें विचारलेल्या प्रश्नांना दिलेलीं हीं उत्तरें आहेत. एका कारखानदाराची साक्ष चालू होती.

प्रश्नः—उमेदवार काय करतो !

उः— तो धंदा शिकतो.

प्र.:—मग त्याला मारझोड का करावी ?

उ.:—ती माझी चूक आहे.

प्र.:—यासाठीं काय करावे ?

उ.:—मला कामगार म्हणून समजावें व एखाद्या कामगाराच्या हातीं काम करण्यास सांगावें.

प्र.:—तुम्हीं तुमचा कबुलीजबाब सरकारकडे दिला होताच, मग हें प्रकरण आमच्याकडे कां आलें ?

उ.:—कारण कामगारांचा वर्ग सर्व समाजांत पुढारलेला आहे.

प्र.:—मग, तुम्ही कोणत्या प्रकारचे गृहस्थ आहां ?

उ.:—मी एक वाईट माणुस आहें.

प्र.:—तुम्ही गुन्हेगार आहां काय ?

उ.:—होय.

कामगारांच्या हातीं सत्ता देऊन आणि सुवर्णयुगाच्या निर्मितीचें मधाचें बोट लावून त्यांच्या भावना अशा प्रकारें चेतविण्यांत येतात. देशाची मालकी त्यांच्या हातांत आहे असें दाखवून या **आगींत तेल** ओतण्यांत येतें. आदर्श कामगारांच्या पद्धतीनें आशेचा अंकुर फोंफावतो; मला हें स्थित्यंतर माझ्या प्रवासांत दिसून आलें. आजवर चिनी कामगार कष्टाचीं कामें करीत होताच, आतां त्याच्या जोडीला त्याच्या जीवनांत आशा निर्माण झाली आहे. तो आज निराश नाहीं. आपलें काम शिकावें, त्यांत लक्ष घालावें, आपण साक्षर व्हावें असें त्याला वाटतें. पण असल्या मार्गानीं चीनला आपलें ध्येय साध्य करतां येणार नाहीं एवढें मात्र त्या बिचाऱ्याला अजून उमगत नाहीं.

* * *

## ५ : परकीय मदत

चीनच्या औद्योगीकरणाचा विचार करतांना सध्यां चीनमध्यें परकीयांनीं गुंतविलेलें भांडवल, यापुढें ते गुंतविणार असलेलें भांडवल आणि खुद्द चीनमध्यें उपलब्ध असलेलें तांत्रिक ज्ञान यांची आठवण होणें अपरिहार्य आहे. आपली औद्योगिक वाढ करणें अथवा असलेल्या साधनसामग्रीचा पुरेपूर उपयोग करणें हें आजपर्यंत चीनमध्यें घडलें नाहीं. किनाऱ्याच्या बाजूला कांहीं उद्योगधंदे सुरू झाले. पण अंतर्गत विभागांत शेतीच चालू होती. या शेतांतून तयार होणारा कच्चा माल परदेशीं निर्यात होईल व पक्क्या मालासाठीं चीनला परकीयांच्या तोंडाकडे पाहण्याची वेळ येई. अन् हे उद्योगधंदे तरी कोणते होते ? कापड, साबण, सिगारेट्स् यांचेच कारखाने चीनमध्यें दिसून येत. वाहातूक, पाणी पुरवठा आणि वीज यांचे थोडे कारखाने दृष्टीस पडत. यांपैकीं बहुतेक कारखाने परकीयांच्या मालकीचे होते. परदेशांतील संपत्ति लुटून आपला खिसा गरम करण्यासाठीं हे परकीय लोक चीनमध्यें येत. ही लूट थांबविण्याची शक्ति चिनी लोकांत नव्हती. मालाच्या किंमती, कामगारांचे पगार, देशाची आर्थिक स्थिति यासंबंधीं विचार करण्यासाठीं चिनी लोकांस वावच नव्हता. चीनमध्यें मजुरीचे दर स्वस्त होते. त्यामुळें कांहीं वर्षांतच या परकीयांनीं गुंतविलेल्या भांडवलाच्या दुप्पट तिप्पट फायदा मिळविला.

यांतून मार्ग काढावयाचा तर जनतेचें जीवनमान प्रथम सुधारलें पाहिजे. देशाचें स्वातंत्र्य व ऐक्य अबाधित राहील, त्याबाबतींत कोणाही परकीयाकडून अडथळा येणार नाहीं अशीही सरकारला खबरदारी घ्यावी लागते; पण चीनमधील कम्युनिस्टांना केवळ सत्ता व वर्चस्व हवें, जनतेची उन्नति वगैरे गोष्टी नंतरच्या आहेत असें ते मानतात. चिनी लोक स्वभावतः शांत व सहनशील आहेत. पण सहनशक्तीलाही सीमा असते. शिवाय परकीयांचें चीनमधील अस्तित्व कम्युनिस्ट महत्त्वाकांक्षेला बाधक होतें. त्यामुळें परकीयांविरुद्ध त्यांनीं

विरोध पुकारला. बरें या विरोधामुळें चिनी जनतेंत आत्मविश्वास बाणला असता, त्यांना स्वतःच्या उन्नतीची चाड वाटली असती, देशाचें आर्थिक आरोग्य सुधारलें असतें तर कांहीं अर्थ होता. पण मला असें दृश्य चीन-मध्यें कोठेंही आढळून आलें नाहीं.

आज चीनजवळ पैसा नाहीं, यंत्रशास्त्रज्ञ नाहींत. कारखाने सुरू करावयाचे म्हटलें तर यंत्रसामुग्री नाहीं. अशा परिस्थितींत हातीं असलेल्या साधन-सामुग्रीचा जास्तींत जास्त उपयोग करूनच चीनला आपली औद्योगिक प्रगति करून घेणें भाग आहे. अशा वेळीं चीनमधील कामगार व एंजिनियर यांनीं आपलें बुद्धिसर्वस्व पणास लावलें तर यश हातीं येण्याची शक्यता आहे. पण तशीं चिन्हें आढळून येत नाहींत.

चीनमध्यें वाहतुकीची गैरसोय हा पूर्वींपासून चालत आलेला तिच्या औद्योगिक प्रगतीच्या आड येणारा अडथळा आहे. रेल्वे रस्ते फक्त किनाऱ्यानेंच दक्षिणोत्तर आहेत. आंत गेलें कीं वाहतुकीच्या साधनांचा अभाव दृष्टीस पडतो. जलमार्गानें पश्चिमोत्तर वाहातूक होते. चीनमधील रेल्वेरस्ते सुमारें १२०० मैल लांब असून पूर्वीं ते ब्रिटिश, फ्रेंच जपानी व चिनी लोकांच्या हातीं होते. आज चीनमधील लोहमार्गांची व्यवस्था चांगली आहे. शांघाय वगैरें ठिकाणची वीज व पाणी यांची व्यवस्था चिनी लोकांनीं आतां आपल्या ताब्यांत घेतली आहे. त्यांच्याकडून ती जबाबदारी कितपत पार पडेल या विषयींच्या शंका आतां निराधार ठरल्या आहेत. पण कारखाने साधनसंपन्न नाहींत आणि तेथील व्यवस्था समाधानकारक नाहीं. हे कारखाने चालविण्यास लागणारीं लायक माणसेंच नाहींत; अशा परिस्थितीत नजीकच्या भविष्यकाळांत सुधारणा होईल असेंही वाटत नाहीं.

चीनमधील पुष्कळ विद्यापीठांस मीं भेटी दिल्या. उद्योगधंद्यांस लागणारे कुशल कामगार तयार करण्याची या विद्यापीठांत काय व्यवस्था आहे हें पहाण्याचा माझा हेतु होता. या विश्वविद्यालयांत शिक्षणाचीं साधनें नाहींत. इंग्रजी क्रमिक पुस्तकें बाद केलेलीं असून त्यांची जागा घेणारीं चिनी भाषें-तील क्रमिक पुस्तकें तयार नाहींत असें या पहाणींत मला आढळून आलें.

कामगारांची वाण असल्यामुळें शिक्षणक्रम संपतांच या कच्च्या विद्यार्थ्यांना नोकऱ्यांवर हजर राहावें लागतें. एखाद्या कारखान्यास लागणारे सुटे भाग तयार करणें अथवा तत्सम प्रश्नांचा व अडचणींचा विचार करणें एवढेंच या विद्यापीठांत काम होतें त्यामुळें कारखान्यांसाठीं लागणारें दीर्घ मुदतीचें शिक्षण देणें अथवा एखादी दूरगामी योजना आंखणें हें त्यांना अशक्य होतें.

चीनला भरपूर यांत्रिक मदत मिळत आहे, हजारों रशियन चीनमध्यें आले असून तेथील उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करीत आहेत असें आपण ऐकतों. या बाबतींत खात्रीलायक अशी आंकडेवार माहिती उपलब्ध नसली तरी चीनच्या गरजांच्या मानानें रशियन एंजिनियरांची संख्या फारच अपुरी पडते असें आढळून येतें. पेकिंग, मुकडेन आणि टिएन्स्टिन येथील हॉटेलांत कांहीं रशियन मला भेटले. पण भल्या पहाटे उठून ते आपल्या कामाला जात. त्यांचें जेवणखाण स्वतंत्र होत असे. त्यांच्यासाठीं राखून ठेवलेल्या खास मोटारींतून ते हिंडत. या मोटारींना कित्येक वेळां काळे पडदे लावलेले असत. ही मंडळी चिनी सरकारला निरनिराळ्या विषयांवर सल्ला देत असत असें मला सांगण्यांत आलें. त्यांना लष्करी शिस्तींत वागावें लागे. जेवणखाण, राहाणें व थोडासा भत्ता एवढेंच त्यांस मिळे. कारखान्यांत काम करतांना मी माझ्या दोन्ही भेटींच्या वेळीं एकाहि रशियन एंजिनियरला पाहिलें नाहीं. नाहीं म्हणायला एका ठिकाणीं मला एक तैलचित्र पाहावयास मिळालें. बुकॉफ हा प्रख्यात जलशास्त्रज्ञ एका योजनेबाबत चिनी लोकांशीं चर्चा करीत आहे असें दृश्य त्या चित्रांत रेखाटण्यांत आलें होतें.

चीनमधील बहुतेक सर्व कारखाने चिनी लोकांच्या देखरेखीखालीं चालू आहेत. ज्या वेळीं एखादी अडचण उपस्थित होईल त्याच वेळीं रशियन लोकांना बोलावून त्यांचा सल्ला घेण्यांत येई.

खरें म्हटलें तर आजच्या चिनी सरकारनें जुन्या सल्लागारांची मदत घेतली असती तर बरें झालें असतें. जपान, अमेरिका व इंग्लंड या राष्ट्रांनीं चीनमध्यें अमाप भांडवल गुंतविलें आहे. जपान्यांचा पराभव झाल्यानंतर त्यांचें भांडवल सरकारजमा करण्यांत आलें. अमेरिकेंतील चिनी भांडवल मोकळें कर-

ण्यासाठीं चीनमधील अमेरिकन भांडवल गोठविण्यांत आलें. इंग्लंडच्या चीन-मधील भांडवलाला मात्र मुळींच धक्का लागला नाहीं. १९३० मध्यें चीन-मध्यें इंग्लंडनें दोनशें कोटी पौंड गुंतविले होते असा अंदाज आहे. त्यानंतर यांत भरच पडली. आज तर इंग्लंडचे सुमारें साडेतीनशें कोटी पौंड चीनमध्ये गुंतलेले असावेत असा तर्क आहे.

ब्रिटिश लोकांना चीनमधील आपले धंदे चालूं ठेवावयाचे होते. त्यांची व्यवस्था नमुनेदार होती. चीनमधील समस्यांची त्यांस कल्पना होती. त्यांच्यापैकीं कांहीं लोक वीस वीस वर्षें चीनमध्यें राहिलेले होते. चिनी जनते-बद्दल त्यांना मोठासा आदर नसला तरी फायद्याच्या आशेनें चीनमधील आपले उद्योगधंदे चालूं ठेवण्यास ते तयार होते. ब्रिटिश सरकारवर त्यांचें वजन असल्यामुळें चीन व ब्रिटन यांच्यामधील संबंध सलोख्याचे राहण्यासही त्यांच्यामुळें मदत झाली असती.

या कारणांमुळें इतर परकीय लोकांनीं चीनमधून जरी काढता पाय घेतला तरी ब्रिटिश लोक चीनमध्यें राहिले. यंत्रे व तांत्रिक साहाय्य यांची चीनला गरज भासेल, त्यांस भांडवल लागेल हें ब्रिटिश लोक जाणून होते आणि त्यांना धंदा करूं दिला असता, फायदा मिळूं दिला असता तर या बाबतींत चीनला मदत करण्याची त्यांची तयारी होती.

इंग्रज लोकांच्या या विचारांत चूक नव्हती. चीनची ज्याला थोडी-फार माहिती आहे त्यांना चीनपुढें उभ्या असलेल्या संकटांची कल्पना होती. चीन सरकारलाही याची कल्पना असल्यामुळें त्यांनीं सुरवातीला भांडवलदारांना देशांत राहूं दिलें होतें. या बाबतींतही लिहितांना माओ त्से तुंग म्हणतो— "देशांतील उद्योगधंदे वाढवावयाचें म्हटलें तर अवाढव्य भांडवलाची जरूर आहे. हें भांडवल कोठून येणार ? जनतेनें आपल्या जवळील शिल्लक पैसे सरकारला देणें अथवा परकीय देशांकडून कर्जे घेणें हे दोनच मार्ग उपलब्ध आहेत. जों-पर्यंत आम्हांला झळ पोंहोंचत नाहीं आणि जोंपर्यंत चीनमधील कायद्यांचें पालन होत आहे तोंपर्यंत परकीयांकडून कर्जे घेण्यास आमची हरकत नाहींच.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ७७२-७११० दि: २१-५-८१२७
क्रमांक ..... नों: दि: २२।९।२१५८

माओत्सेतुंगनें आणखींही एक दोन प्रसंगी अशीं आश्वासनें दिलीं होतीं. त्यामुळें ब्रिटिश भांडवलदारांनीं आपला पैसा चीनमध्येंच ठेवला. समाजांतील व्यक्तींना आपल्यावर केल्या गेलेल्या जुलुमांची नित्य आठवण राहाते. पण राष्ट्रनेत्यांना वैयक्तिक मानापमानाच्या कल्पना देशाच्या हितासाठीं बाजूला ठेवाव्या लागतात. चीनमधील जनतेची उन्नति होण्यासाठीं मिळेल तेथून मदत घेणें भागच होतें. कम्युनिस्ट राष्ट्रांपेक्षां युरोपांतील राष्ट्रें व अमेरिका मोठ्या प्रमाणांत चीनला मदत करण्यांस समर्थ होती. चीनच्या अंतर्गत राज्यकारभारांत या राष्ट्रांना हात घालण्यास संधि मिळणार नाहीं एवढी खबरदारी घेतली म्हणजे झालें. आणि हस्तक्षेपाच्या भीतीनें मदत नाकारणें म्हणजे आपल्या सरकारचा दुबळेपणा कबूल करण्यासारखें होतें.

परंतु चीनला ब्रिटनच्या बाबतींत निर्णय घेतां आला नाहीं. ब्रिटिशांच्या आजवरच्या अरेरावी व फायदाखाऊ वृत्तीची जनतेस चीड आली आहे. आजवर चीनमध्यें ब्रिटिशांचें वर्तनच तसें आहे. म्हणून सरकारी वक्तव्यांत कांहींही म्हटलें असलें तरी परकीयांना चीनच्या बाहेर घालवून देण्याकडेच चीन सरकारची प्रवृत्ति दिसते. ब्रिटिश भांडवल चीनमधून काढून घेण्यासंबंधीं सवलती मिळाव्यात म्हणून ब्रिटिश सरकारनें चीन सरकारला एक खलिता लिहिला होता. मी त्यावेळीं तेथें होतों. यासंबंधीं चीनमधील पीपल्स बँकेच्या गव्हर्नराला मीं एक प्रश्न विचारला होता. चीनमध्यें सध्यां असलेल्या परकीय भांडवलाच्या बाबतींत तुमचा काय दृष्टिकोन आहे असा तो प्रश्न होता. या प्रश्नास उत्तर देतांना गव्हर्नर म्हणाला— " परकीय भांडवलदारांनीं व व्यापाऱ्यांनीं येथें व्यापार करण्यास हरकत नाहीं. उभय राष्ट्रांचा फायदा होत असेल आणि अरेरावीची भाषा नसेल तर अशा लोकांची आर्थिक मदत आम्हीं अवश्य स्वीकारूं, मात्र अशीं कृत्यें कायद्याच्या कक्षेंत बसलीं पाहिजेत.

वर सांगितलेल्या ब्रिटिश खलित्याला चीनच्या उपपरराष्ट्रीय मंत्र्यानें असेंच उत्तर दिलें होतें. परंतु ह्या गोष्टी केवळ बोलाच्याच वाटतात. चीनमधील परकीय भांडवल हळू हळू कमी कमी होत आहे. एखाद्याला अधिक त्रास देण्यानें कांहींना अमानुष आनंद होत असतो. परकीयांनीं आजवर

चीनमध्यें अमाप फायदा मिळविला. चिनी जनतेची त्यांनीं गांजणूकही केली फायद्याचा मोह न सोडतां आल्यानें ते आयतेच सांपळ्यांत सांपडले. आतां या परकीयांना आपलें सर्वस्व चीनमध्यें सोडून जाण्याची वेळ आली आहे. आजवर केलेल्या पापांचे सध्यां ते प्रायश्चित्त भोगीत आहेत असेंच क्षणभर म्हणान

आपली मालमत्ता चीनमध्यें सोडून जाण्यासही परकीय लोक तयार आहेत. पण तसें करण्याचीही त्यांस परवानगी मिळत नाहीं. कॅथे हॉटेल या नांवाचें चीनमध्यें एक जगप्रसिद्ध हॉटेल आहे. आपली सर्व मालमत्ता चीनमध्यें सोडून स्वदेशी परत जाण्याचें या हॉटेलच्या मालकानें ठरविलें. पण सर्व देणीं देणें आणि सरकारकडे सर्व हिशोबाची रुजवात करणें यास दोन वर्षें लागलीं. एका तंबाखूच्या परकीय कारखानदाराचा कारखाना आपल्या ताब्यांत घेण्यास चिनी सरकारनें एक वर्ष घेतलें व स्वदेशी जाण्याचा परवाना त्यास अजून मिळाला नाहीं. कर व कामगारांचा पगार अजून चालूच आहे, कारण अधिकृत रीत्या कारखाना अजून बंद झालेला नाहीं. यामुळें त्या व्यापाऱ्याचें देणें वाढतच आहे. कारखान्यांतील नौकरांनीं एखादें बेकायदा कृत्य कधींही केलें असेल तर त्याची जबाबदारी त्याच्यावरच आहे. त्यामुळें त्याला स्वातंत्र्य नाहीं कीं स्वास्थ्य नाही.

शांघाय येथें मला अनेक परकीय कारखानदार भेटले. चिनी माणसांबद्दल त्यापैकीं कांहींच्या कल्पना पूर्वीप्रमाणेंच साम्राज्यवादी होत्या. त्यामुळें ते लोकांत मिसळत नसत. मला भेटतांच त्यांना आनंद झाला. आमच्या हिंदी वकिलातीकडून त्यांना हरतऱ्हेची मदत लागे. म्हणून त्यांनीं माझें आनंदानें स्वागत केलें असा मात्र याचा अर्थ नव्हे. मी वृत्तपत्रकार आहें आणि वस्तुस्थिति दर्शक गोष्टीबाबतच मीं त्यांच्याशीं चर्चा करूं शकत होतों हें त्यांस माहीत होतें.

मी त्यांच्या कचेऱ्यांत जाऊन त्यांस भेटलों. एकटाच जात असें मी. माझ्या या ‘ धाडसाबद्दल ’ ते लोक आश्चर्य व्यक्त करींत. माझें हें हिंडणें माझ्या चिनी वाटाड्यांस आवडत नसें हें मला माहीत होतें. कोठूनहि मी

परत आलों कीं मी कोठें गेलों होतों. यासंबंधी ते विचारपूस करीत. अनेक व्यापाऱ्यांशीं माझी बोलणी चालत. अखेर हिंदी वकिलातीकडून मला निरोप आला. माझ्या या कृत्यानें माझें वैयक्तिक स्वास्थ धोक्यात आहे आणि त्यामुळें वकिलातीची अडचण होत आहे असा तो निरोप होता.

शांघाय येथील एका दुकानांत एकदां मी गेलों होतों. दरवाज्यावरच एक चित्र होतें. एक परकीय व्यापारी लांचलुचपत व वायदेबाजार यांच्यांत कपड्यांत गुंडाळलेला दाखविला होता. एक कामगार त्या व्यापाऱ्याच्या पोटांत बंदुकीची संगीन खुपसत आहे असेंहि त्या चित्रांत दाखविलें होतें. हें चित्र दुकानाच्या व्यवस्थापकाच्या प्रवेशद्वारावर रंगविलें होतें. ज्या ज्या वेळीं तो आपल्या खोलींत प्रवेश करी, त्यावेळीं त्याला हें चित्र दिसे. पण त्या बाबतींत त्याला कांहीं करतां येणें शक्य नाहीं. परस्परांना मदत करणें, सर्वांना सारखा वाव मिळणें आणि कायद्याचा आश्रय मिळणें या बाबतींत चीनमध्यें परकीयांना जितकें पिळून घेतां येईल तितकें घ्यावयाचें नि मग चोथा फेकून देतात तसें त्यांना फेंकून द्यावयाचें असें त्यांनीं ठरविलें होतें. या आपत्तींतून कोणीहि परकीय सुटूं शकत नव्हता.

चीनमध्यें गेलीं सातशें वर्षें ब्रिटिश लोक व्यापार करीत होते. पण आपल्या रकमा व्यवस्थित गुंतविणें अथवा व्यापार चालू ठेवणें त्यांस अशक्य होतें. जागतिक अशांतता, कोरियांतील युद्ध, आणि नव्या चिनी सरकारचें धोरण हीं सर्व ब्रिटिशांच्या विरुद्ध होतीं. अवास्तव करवाढ, खर्चाचें वाढतें प्रमाण, खाजगी लोकांच्या हातून धंदा काढून तो सरकारच्या हातीं देणें, वस्तूंच्या किंमतीवरील नियंत्रण यांमुळें परकीय व्यापारी संस्था अडचणींत सांपडल्या होत्या. त्यांच्याजवळचे पैसे संपत चालले होतें. कर्जें वाढत होतीं, नि बँकांकडून मदत मिळत नव्हती, तुरुंगांत जाण्याची शक्यता आ वासून सतत उभी असे. " इंग्लंडमध्यें एका पौंडावर एकोणीस शिलिंग टॅक्स आहे; येथें तर ६ शिलिंगच आहे. मग कर भरण्यास तुमची हरकत कां असावी ? " असा मीं एकाला प्रश्न विचारला. तो म्हणाला, " फायदा मिळो अथवा न मिळो, आम्हांला कर हा भरावाच लागतो. शिवाय फायदा फारसा मिळतच नाहीं.

आपल्या मालमत्तेची अथवा मिळकतीची फेरमोजणी करण्यास परकीय संस्थांस चीनमध्यें परवानगी मिळत नाहीं. त्यामुळें बाजार तेजींत आला तरी त्याचा फायदा या संस्थांस मिळत नाहीं. पण जास्त फायदा झाला आहे असें गृहित धरून भरमसाठ कर वाढविले जातात. पियानो विकणारें एक दुकान होतें. त्यांनीं सबंध वर्षांत एकही पियानो विकला नाहीं पण त्यांस कर मात्र भरावे लागले. चिनी व्यापारी संस्थांना सर्व सवलती मिळत. परकीय दुकानांना आकारलेले कर तावडतोब भरावे लागतात व कर न भरल्यास रोज शेकडा एक टक्का दंड द्यावा लागतो.

कारखान्यांतील कामगारांना कच्च्या मालाच्या अभावीं वर्षभर काम मिळत नसे पण पगार मात्र पूर्ण द्यावा लागे. कोणाही कामगाराला नोकरी-वरून कमी करण्याची परवानगी मिळत नसे. कामगार संघटनेच्या संमतीनें तीन महिन्यांचा पगार देऊन कामगारास कमी करतां येण्याची व्यवस्था होती. पण ती अमलांत येणें अशक्य आहे. कारण या गोष्टीस मजूर संघटनांची मान्यताच मिळत नसे. मिळाल्यास तीन महिन्याचा पगार व कामाच्या प्रत्येक वर्षास एक महिना या प्रमाणें होणारा पगार एका रकमेनें द्यावा लागे. संस्था बंद पडेपर्यंत सर्व कामगारांना पूर्ण पगार मिळत रहावा यासाठीं ही योजना असे. देशांतील वाढती बेकारी कमी करण्याचाही यांत हेतु असे. यामुळें व्यापाऱ्याला फायदा मिळत नाहीं. तो आपला गाशा गुंडाळायला लागतो. फायद्याची गोष्ट क्षणभर बाजूस ठेवली तरी चीनमधील परकीय व्यापाऱ्यांचें अस्तित्वच धोक्यांत येऊं लागलें आहे. कच्चा माल, कर व पगार हे तावडतोब द्यावे लागतात. मालाची मात्र विक्री होत नाहीं, तो वाढतच जातो. त्यामुळें पैसा अडकून पडतो. कापडासारख्या धंद्यांना बँकाची मदत व कर भरण्यास मुदत मिळाली असती तर त्यांनीं टिकाव धरलाही असता. पण पीपल्स बँक त्यांस कर्ज देत नाहीं. त्यामुळें या व्यापाऱ्यांना आपल्या मायदेशाहून अधिक भांडवल आणावें लागतें. तें न आणल्यास व कर न दिल्यास व्यवस्थापकांवर तुरुंगांत जाण्याची पाळी येते.

जार्डिन, मॅथेसन कं. लिमिटेड या नांवाची व्यापारी संस्था पूर्वीच्या काळीं शिखरावर होती. बोटी, बंदरें, कापड, एंजीनियरिंग, वगैरे कितीतरी व्यवसाय ही कंपनी करीत असे. या कंपनीच्या भट्टयांत तयार झालेली सर्वच्या सर्व दारू चिनी सरकार विकत घेत असे. १९५२ च्या जानेवारींत काटकसरीच्या नांवाखालीं बीअर ही दारू कमी करण्यांत आली त्यामुळें या मालाचा खप पडला. कंपनीजवळ बीअर दारुची तीस हजार पिपें शिल्लक राहिलीं. पैसा गुंतून पडला. नोकरांचे पगार देणेंही कंपनीला अशक्य होऊं लागलें. आपल्या मालाच्या तारणावर कंपनीनें बँकेकडून कर्ज मागितलें. पण ती मागणी फेटाळली गेली. लंडनहून पैसे मागविणें अथवा कर्जबाजारी होऊन तुरुंगांत जाणें एवढाच मार्ग कंपनीच्या व्यवस्थापकांसमोर उभा राहिला. व्यवस्थापकानें लंडनहून पैसा मागवावयाचा नाहीं असें ठरविलें. कारण तो परत करण्यास सरकार परवानगी देणार नाहीं हें तो ओळखून होता.

या व्यवस्थापकाला कैदेंत टाकावें तर सर्व परकीय संस्थांची नाराजी ओढवून घ्यावी लागते. (तसें करणें इष्ट नाहीं हें चिनी सरकार ओळखून होतें.) अथवा कायदा डावलावा असा सरकारपुढें पेंच पडला. या व्यवस्थापकाचें नांव गॉर्डन असें होतें. सुमारें वीस दिवस चिनी सरकारनें गॉर्डनशीं वाटाघाटी केल्या. साम, दाम, दंड व भेद हे सर्व प्रयत्न फसले. अखेर गॉर्डनला कैद करणें चिनी सरकारला भाग पडलें, यामुळें इतर ब्रिटिश व्यापारी चिडले आणि सुमारें ३५ कोटींची मालमत्ता चीनमध्यें ठेवून ते चीनमधून निघून गेले.

इंग्लंडमधून अधिक भांडवल चीनमध्यें यावें यासाठीं हे सर्व प्रयत्न होते. इ. स. १९५१ मध्यें ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं चीनमध्यें सहा कोटी पौंड आणले. १९५२ मध्यें हें प्रमाण तीन कोटी पौंडांवर आलें; कारण या वेळेपर्यंत ब्रिटिशांचा चीनमधील व्यापार खालीं येत चालला होता. परकीय भांडवल आपल्या देशांत आणणें भाग पाडावयाचें व नंतर परकीय व्यापाऱ्यांना देशांतून घालवून देऊन तें सर्व भांडवल गिळंकृत करावयाचें असा चिनी सरकारचा या धोरणामागें डाव होता.

पण ब्रिटिश लोकांची सहनशीलता अजब खरी ! अशी परिस्थिति असूनही ते झोकांत कपडे घालून कचेऱ्यांत जात नि रविवारीं मजा करीत. त्यांचा आत्मविश्वास जबर होता. चीनला आपली अत्यंत जरूर आहे हें ते जाणून होते. नवीन नवीन परिस्थितीशीं जुळते घेण्याचा त्यांनीं निर्धार केला होता.

जॉन केसविक या नांवाचा एक इसम मला हॉंगकॉंगमध्यें भेटला होता. उंच थोराड व देखण्या अशा या खेळकर इंग्रजाला चीनमधील आर्थिक परिस्थितीची पूर्ण कल्पना होती. चीनमध्यें आपल्याला व्यापार करतां येईल अशी त्याला प्रबळ आशा होती. त्याचे मित्र तर त्याला थट्टेनें 'कम्युनिस्ट' म्हणत. त्यानें अखेर चीन सरकारच्या हातीं तुरी देऊन टिएनस्टेन येथून पलायन केलें. अनेक दिवस वाट पाहून अखेर त्याला स्वदेशीं परतण्याची परवानगी मिळाली. केसविकला परत जाऊं दिलें तर त्याच्या संस्थेमार्फत इंग्लंडहून येणारें भांडवल बंद होईल अशी त्यानंतर चीन सरकारला भीति वाटूं लागली. केसविक या वेळीं बोटीवर चढलाहि होता. एक चिनी पोलीस अधिकारी बोटीवर गेला व त्यानें त्याला बोटीवरून उतरून बंगल्याकडे परत फिरण्याची विनंति केली ! विनंति कसली, हुकूमच होता तो.

आपण या मागणीला नकार दिला तर जबरदस्तीनें आपल्याला खालीं उतरविण्यांत येईल हें केसविकनें ताडलें. म्हणून तो बोटीवरून उतरला नि बंगल्यांत परत गेला. दोन दिवसांनंतर त्यानें आपल्या चिनी नोकराला पोलीस स्टेशनवर पाठविलें व आपला परवाना परत मिळावा अशी मागणी केली. त्याचा परवाना जप्त करण्याचा हुकूम नसल्यानें पोलिस अधिकाऱ्यानें तो परवाना केसविकला परत केला. पंधरा दिवस वाट पाहूनहि केसविकला पोलीस खात्याकडून बोलाविणें आलें नाहीं.

याच वेळीं एक ब्रिटिश जहाज टिएनस्टेनहून हॉंगकॉंगला जाणार होतें.. " आपली मीं पंधरा दिवस वाट पाहिली. परंतु आपणांकडून माझ्याकडे कसलीच विचारणा झाली नाहीं, म्हणून मी या बोटीनें जात आहें.

असें त्यानें पोलीस खात्याला कळविलें. " मी येथें अधिक काळ राहूं इच्छित नाहीं व मजजवळ परवाना असल्यानें माझें प्रयाण कायदेशीर आहे" असेंहि त्यानें लिहिलें. पोलीस खात्याला काय करावें तें कळेना. पेकिंग येथील आपल्या वरिष्ठांकडून सूचना मागवाव्या तर त्यालाहि वेळ नव्हता, त्यामुळें केसविकला उघड माथ्यानें चीन सोडतां आलें.

रशियासारख्या देशानेंहि ब्रिटन व अमेरिका यांजबरोबर स्वार्थाच्या हेतूनें व्यापारी संबंध जोडले.

चीनला हें कां करतां येऊं नये ? असा अडमुठेपणा त्यांनीं कां करावा ?

* * *

## ६ : औद्योगिक प्रगति

चीनचें औद्योगीकरण करणें हें ध्येय नवचीनच्या नेत्यांनीं आपल्यापुढें ठेविलें आहे. अर्थात त्याअगोदर कांहीं वर्षें चीनची आर्थिक घडी नीट बसविली पाहिजे. औद्योगीकरण यशस्वी करण्यासाठीं भांडवल, ग्रामोद्योग, तंत्र, वगैरे महत्त्वाचे घटक गोळा केले पाहिजेत, एकत्रित केले पाहिजेत. तें काम आधीं झालें पाहिजे.

चीनमध्यें १९५० पासून या कामाला सुरुवात झाली. १९५१ व १९५२ या दरम्यान मीं चीनला प्रथम भेट दिली. त्यामुळें प्रारंभिक स्वरूपाचीं कार्यें कशीं सुरू झालीं व त्यांची प्रगति कोठवर आली हें मला समजूं शकलें. चीनमधील दारिद्र्य नाहींसे करावयाचें झाल्यास तेथें उद्योगधंदे सुरू झाले पाहिजेत. पण या ध्येयसिद्धीच्या मार्गांत अनंत अडचणी आहेत. त्यांपैकीं कांहीं जगांतील सर्व मागासलेल्या देशांत आढळून येतात. कांहीं त्या देशापुरत्याच मर्यादित आहेत.

आपण यांपैकीं बऱ्याच अडचणींवर मात केली असून प्रगतीचा मोठाच टप्पा गांठला आहे असें चीनचें म्हणणें आहे. भारतांत नुकत्याच भरलेल्या एका औद्योगिक प्रदर्शनांत चीनमध्यें तयार केलेल्या वस्तू मांडण्यांत आल्या होत्या. त्या पाहून प्रेक्षकांनीं आश्चर्य व्यक्त केलें होतें. चीनच्या औद्योगीकरणाच्या यशाचे नगारे सर्वत्र झडत आहेत. वैभवाचा काळ अगदीं जवळ येत चालला आहे असें वृत्तपत्रें मोठमोठ्यानें सांगत आहेत. पण या सर्व प्रचारांत अतिशयोक्ति आहे.

पूर्वीच्या काळांत चीनमध्यें जगांतील हलक्या प्रतीचा सर्व माल खपत असे. युद्धाच्या काळीं या मालाच्या किंमती वाढूं लागल्या. वस्तू भूमिगत होऊं लागल्या नि त्या वस्तूंची चणचण वाढूं लागली. या वस्तु अजून विकल्या जात आहेत. १० वर्षांपूर्वीं तयार झालेल्या वस्तूंनीं चीनमधील

दुकानें आजहि भरून गेलेलीं दिसतात. सिगरेट्स्, कापड, साबण वगैरे वस्तू चीनमध्यें तयार होतात पण त्या महाग आहेत.

जनतेच्या मूलभूत गरजा भरपूर प्रमाणांत पुऱ्या झाल्या म्हणजे त्या देशाची आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे असें समजण्यास हरकत नाहीं चीनमध्यें या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. शेतीच्या उत्पादनांत खूप वाढ झाली आहे. शेतकऱ्याजवळ त्याच्या पिकापैकीं बराच भाग रहातो. त्यामुळे त्याला स्वास्थ्य मिळतें व इतर तयार वस्तु विकत घेण्याची त्याला इच्छा उत्पन्न होते. या वस्तु देशांत तरी तयार झालेल्या असतात किंवा परदेशांतून आयात कराव्या लागतात. चीनमध्यें अजून थोड्याच वस्तू तयार होतात.

भारताप्रमाणेंच चीन हाही कमी सुधारलेला देश आहे. तेथें ज्या थोड्या वस्तू तयार होतात त्यांच्या कारखान्यांची मालकी बहुधा परकीयांची होती. शांघाय, टिएन्स्टेन, कँटन व मांचूरिया हीं अशा धंद्यांचीं केंद्रेंच होतीं. चीनमधून परकीयांचें उच्चाटन करण्यांत आल्यामुळें तांत्रिक ज्ञान व धंदा चालविण्याची कुवत यांबाबतची व्यवस्था करण्याचा मोठा प्रश्न चीन-मध्यें निर्माण झाला आहे.

चीनमध्यें मांचूरिया आतां समाविष्ट करण्यांत आला असल्यानें चीन-मधील उद्योगधंद्यांचा फायदाच झाला आहे. मांचूरिया जपानच्या ताब्यांत असतांना जपाननें तेथें पूर्वीच्या तिप्पट भांडवल गुंतविलें होतें. या भांडवला-मुळें मांचूरियाच्या अर्थकारणाला वाव मिळाला आणि तेथील कच्च्या मालाचा अधिक उपयोग होऊं लागला. नव्या कारखान्यांस लागणारी वीज कोरियाच्या सरहद्दीपलीकडे असलेल्या पीत नदीच्या पाण्याच्या साहाय्यानें तयार करण्यांत आली. कोळसा, लोखंड, पोलाद, कथील, जस्त, सोनें आणि तेल यांचा शोध लागला व नव्या नव्या उद्योगधंद्यांत चालना मिळाली. अनशान व मुकडेन येथें यंत्रसामुग्रीचे कारखाने निघाले. त्यामुळें कापडाच्या गिरण्या व विजेचे कारखाने फोंफावले. जपान्यांना ही भीति वाटत होतीच. त्यामुळें त्यांनीं टिएनस्टेन येथील नानकाई विश्वविद्यालयावर अनेक बॉंबहल्ले करून तें उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला.

मँचूरियाला भेट देण्याची मला ज्या वेळीं संधि मिळाली त्या वेळीं सहाजिकच आनंद झाला. या प्रांतांतील सर्व उद्योगधंदे रशियानें आपल्या ताब्यांत घेतल्याच्या बातम्या मीं भारतांत असतांनाच ऐकल्या होत्या. पण हें कृत्य रशियन लोकांचें नसून दहशतवाद्यांचें होतें असें पेकिंग येथें मला समजलें. रशियन लोकांनीं यंत्रसामुग्री नेली खरी, पण ती नंतर जशीच्यातशी परत केली असें एका जबाबदार इसमानें मला सांगितलें. रशियन लोकांनीं असा प्रामाणिकपणा दाखविला नाहीं असेंहि कांहींनीं मला सांगितलें.

मीं हा प्रवास रेल्वेनें केला. रस्त्यानें मला चीनचें सूक्ष्म अवलोकन करतां आलें. चीनमधील शेती पूर्वापार पद्धतीनें चालू आहे, आधुनिक पद्धतीनें नाहीं असें मला आढळून आलें.

मुकडेन येथें भरलेल्या औद्योगिक व शेतकी प्रदर्शनापासून आम्हीं आमच्या निरीक्षणास सुरवात केली. या प्रदर्शनांत स्थानिक वस्तूच ठेवण्यांत आल्या होत्या. औद्योगिक अवजारें व देशांत तयार झालेला सर्व प्रकारचा माल प्रदर्शनांत मांडण्यांत आला होता. लेथ, एंजिन, जनरेटर्स, विजेच्या तारा, विद्युत्‌उत्पादक यंत्रें, रसायनें, तेलें, कांचेचें सामान, भांडीं, आणि कापड येथें आम्हीं पाहिलें. उद्योगधंद्यांतील निर्मितीच्या अवस्था दाखविणाऱ्या यंत्रांच्या प्रतिकृती याही प्रदर्शनांत दिसल्या. प्रदर्शनाची मांडणी सुबक होती. प्रेक्षकांना पाहाण्याजोगें आणि शिकण्याजोगें असें तेथें पुष्कळच होतें. प्रत्येक ठिकाणीं तरुण मुलें व मुली प्रेक्षकांस माहिती सांगत. त्यांना स्वतःला किती समजत होतें कोण जाणे ! आजूबाजूच्या खेड्यांतून मोटारी भरभरून प्रदर्शन पहाण्यासाठीं लोकांस आणण्यांत येत होतें आणि प्रदर्शन पाहून ती मंडळी खुष होत होती ! आशियांतील इतर देशांचे पाहुणे हें प्रदर्शन पाहून आश्चर्य-चकित होत. पण या प्रदर्शनांत मांडण्यांत आलेली यंत्रसामुग्री चीनमध्यें तयार झालेली नसून परदेशी होती हें यांतील गुपित होतें. कम्युनिस्ट प्रचा-राचा तो एक भाग होता. मांडणीचा तपशील, देखाव्याची परिपूर्णता, आणि मानवाच्या भोळेपणाचा अचूक अंदाज यांवर प्रदर्शनाची उभारणी होती !

एक लोखंडाचा कारखाना, खाणीला लागणारी यंत्रसामुग्री बनविण्याची एक फॅक्टरी, आणि रेल्वे एंजिनें बनवणारी प्रयोगशाळा हीं आम्हीं पाहिलीं. या कारखान्यांचे अधिकारी कम्युनिस्ट पक्षाच्या खास अनुयायांतून निवडलेले होते. मुकडेन येथील रशियन एंजिनियरांच्या सहाय्यानें ते आपल्या अडचणी निवारीत. परदेशी पाहुण्याच्या भेटीच्या वेळीं 'आदर्श कामगार' हजर असत. त्यांना पगार अधिक असे, सवलतीहि मिळत. त्यामुळें इतर कामगारांत काम करण्याची ईर्ष्या उत्पन्न होई. पुष्कळ कारखान्यांत पूर्वी जपानी कामगार काम करीत पण त्यांची जागा आतां चिनी लोकांनीं भरून काढली आहे.

मनुष्यबळाच्या साहाय्यानें बरींचशीं कामें करण्यांत येतात असें येथें आम्हांस आढळून आलें. यंत्रसामुग्रीचें उत्पादन फारच थोडें दिसलें. ज्या वेळीं यंत्रसामुग्री मिळेल त्या वेळीं उपयोगी पडतील असे कामगार तयार करण्याचें कार्य सध्यां येथें चालू आहे असें दिसतें. कम्युनिस्ट राजवटींत खर्चाला महत्त्व नाहीं. प्रचारावरच त्यांचा अधिक भर असतो. खाणींत लागणारी सर्व यंत्रसामुग्री चीनमध्येंच तयार होते असें प्रदर्शनाच्या वेळीं आम्हांस सांगण्यांत आलें होतें. अशा तऱ्हेचा एक कारखाना पाहण्यास आम्हीं गेलों होतों. पण तयार झालेलें एकही यंत्र आम्हांस पहावयास मिळालें नाहीं. अशा तऱ्हेचें एकादें मशीन जोडतांना पाहाण्याची मीं इच्छा व्यक्त केली. पण या यंत्रांना इतकी मागणी असते कीं तयार होतांच यंत्र रवाना होतें. येथें शिल्लकच राहात नाहीं असें आम्हांस सांगण्यांत आलें.

चीनला अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग काढावयाचा आहे हें आम्हांवर बिंबविण्यासाठींच आमच्या या भेटीची व्यवस्था करण्यांत आली होती या अडचणींतून मार्ग काढण्याचा चिनी लोक आटोकाट प्रयत्न करीत आहेत हें आमच्या ध्यानांत आलें. पण इतका द्राविडी प्राणायाम करण्याच्या ऐवजीं चिनी लोकांनीं परकीयांचें साहाय्य घेऊन आपलें काम हलकें कां करूं नये हा यक्ष प्रश्न आम्हांला सुटला नाहीं. कदाचित असें असेल का कीं चिनी लोकांची परिस्थिति सुधारण्यासाठीं रशियाची मदत घेण्यापेक्षां त्यांस दुसरा पर्यायच नव्हता ? एक गोष्ट मात्र खरी कीं स्वार्थासाठीं रशिया बिचाऱ्या चीनच्या परिस्थितीचा गैरफायदा घेत होता.

मुकडेनला आठ महिन्यानंतर मीं पुन्हां भेट दिली. या काळांत तेथें बरीच प्रगति झाली असेल असें मला वाटलें होतें. कारखान्यांना लागणारी महत्त्वाची साधनसामुग्री रशिया व आशियांतील राष्ट्रांकडून चीनला मिळूं शकली असती. शिवाय चीन व रशिया यांत एक करारही झाला होता. या करारान्वयें रशियाकडून चीनला दर वर्षी ६ कोटी डॉलर मिळावयाचे होते. त्यांवर दरसाल दरशेंकडा एक टक्का व्याज होतें. विजेच्या कारखान्यांची यंत्र-सामुग्री, इतर यंत्रसामुग्री, कोळशाच्या खाणींसाठीं लागणारी यंत्रसामुग्री, रेल्वे व वाहातुकीचीं इतर साधनें, वगैरे चीनच्या औद्योगिक उन्नतीसाठीं लागणारी यंत्रसामुग्री या पैशांतून रशियाकडून चीननें खरेदी करावयाची होती. हा करार जर खरोखरी व्यवहारांत आला असेल तर चीनला पुष्कळ मदत मिळाली असली पाहिजे. पण ही मदत चीनला बहुधा मिळाली नसावी; कारण पूर्व युरोपांतील देशांकडून चीन सामुग्री खरेदी करीत आहे अशी माहिती मला मिळाली होती.

मुकडेन येथील एक इंजिनांचा कारखाना, आणि अवजारांचा कार-खाना पाहण्यासाठीं आम्हांस नेण्यांत आलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. पण पहिल्या दिवशीं आम्हांला फक्त एक औद्योगिक प्रदर्शन दाखविण्यांत आलें. एंजिनांचा कारखाना पाहण्याची आम्हीं पुन्हां इच्छा व्यक्त केली. त्या कार-खान्याऐवजीं एक कोळशाची खाण आम्हांस दाखविण्यांत येईल असें या वेळीं आम्हांस सांगण्यांत आलें. तसेंच सदरहू कारखान्यांत सध्यां एंजिनें तयार होत नसून केवळ जुन्या एंजिनांची दुरुस्ती व चाकें तयार करण्यांत येतात असा खुलासा करण्यांत आला. त्या कारखान्याचें पूर्वीचें स्वरूप मीं पाहिलें असल्यानें आम्हांला तेथें दुसऱ्यांदा न नेण्यांत कोणता हेतु आहे हें लगेच माझ्या ध्यानांत आलें.

कोळशाची खाण व तेल शुद्ध करण्याची जागा आम्हीं पाहण्यास गेलों. चीन व जपान यांत युद्ध सुरू होण्यापूर्वी चीनमधील सर्व कोळसा जपानमध्यें शुद्ध होत असे. आज तो कोळसा बाहेर पाठविला जात नाहीं. उद्योगधंद्यांत कोळशाचें खूप महत्त्व आहे. चीनमध्यें पूर्वीइतका कोळसा निघूं लागला तर

उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें फायदाच होईल. कोळशाच्या उत्पादनाचें प्रमाण दिवसें-दिवस वाढत आहे असें मीं वृत्तपत्रांत वाचलें होतें. १९५० पेक्षां टाटुंग खाणीं-तील कोळशाचें उत्पादन १९५१ मध्यें २८४ पटीनें वाढलें होतें अशीही बातमी आली होती. पण टाटुंग येथील खाणींतून निघालेला कोळसा खेचरांच्या पाठीवरून वाहून नेत असल्याचें दृश्य मीं पाहात असल्यानें येथें कमी कोळसा निर्माण होतो हें मला कळलें होतें व वरील आंकड्यांवर माझा विश्वास बसलाच नव्हता.

मुकडेनहून आम्हीं फुशुनकडे निघालों. मांचुरियांतील या ठिकाणीं जपाननें पूर्वीं बरेच कारखाने सुरू केले होते. गिरण्यांचीं धुराडीं सर्वत्र दिसत होतीं. फुशुन हें शहर पाश्चात्य धर्तीचें आहे. येथें सर्वत्र कोळशाची धूळ पड-लेली दिसते. घरांमध्यें सर्व प्रकारच्या सोयी आहेत. एक शर्यतीचें मैदानही आहे. लुंगफुंग ही प्रसिद्ध खाण आहे. तोंडावर कापडाचे पट्टे बांधून आम्हीं खाणींत उतरलों. मधूनमधून एखाद्या लॉरींतून कोळसा येत होता. खाणीचें प्रत्यक्ष काम कसें चालतें हें पहाण्याची संधि आम्हांला मिळाली नाहीं. युद्धोत्तर काळांत या खाणींतील उत्पादन चौपट वाढलें आहे असें आम्हांस सांगण्यांत आलें पण त्याचा पुरावा मिळूं शकला नाहीं. येथें दहा हजार कामगार काम कर-तात आणि त्यांची रहाण्याची व्यवस्था आहे एवढें आम्हांस सांगण्यांत आलें. आमच्यापैकीं कांहीं पाहुणे कंटाळून परत गेले.

दुपारीं आम्हीं आणखी एक खाण पाहण्यास गेलों. ही खाण खरो-खरच प्रेक्षणीय आहे. ७००० यार्ड लांब, ३०० ते १२०० यार्ड रुंद व १७० यार्ड खोल अशी ही मोठी खाण आहे. आजपर्यंत आम्ही पाहिलेल्या खाणींपैकीं या खाणींतच व्यवस्थित काम चालूं होतें. या खाणीला लागणारी जवळजवळ सर्व यंत्रसामुग्री चीनमध्येंच तयार झाली आहे. युद्ध-पूर्व कालाइतकें उत्पादनहि सध्यां येथें होत आहे.

यंत्रसामुग्री तयार करण्याचा एक कारखानाहि आम्हीं पाहिला. येथें तयार होणारें सामान साधें होतें, त्यास कौशल्याची गरज नव्हती. रशियांतून मागविलेलीं कांहीं यंत्रें येथेंच प्रथम आम्हांस दिसलीं. त्यांवर मात्र रशियन भाषेंतील नांव होतें. चीनमध्यें मोठमोठीं यंत्रें तयार होत अस-

त्याच्या बातमींतील फोलपणा या हातचलाखीमुळें आमच्या ध्यानीं आला. असलीं यंत्रें चीनमधील कोणत्या ठिकाणीं तयार होतात असें मीं विचारलें. ज्या कारखान्याचें नांव आम्हांस सांगण्यांत आलें त्या ठिकाणाचा आमच्या कार्यक्रम पत्रिकेंत अंतर्भाव नव्हता. विशेष प्रकारचीं यंत्रें चीनमध्यें तयार होऊं शकत नाहींत असें या व इतर ठिकाणीं मिळालेल्या पुराव्यावरून आमचें मत झालें.

कापडाच्या गिरण्यांच्या बाबत मात्र असा प्रकार नाहीं. शांघाय येथील ब्रिटिश उद्योगपतींकडे चौकशी करतां आम्हांस असें कळलें कीं कापडाच्या गिरण्या चालविण्याचें कौशल्य व बुद्धि चिनी लोकांजवळ आहे. चीनमधील बहुतेक गिरण्या शांघायच्या आसपास आहेत. त्यांपैकीं बहुतेक गिरण्या खाजगी मालकीच्या आहेत. कांहीं ब्रिटिशांच्या ताब्यांत आहेत. पण या सर्व गिरण्यांवरील सत्ता एका सरकारी संस्थेच्या हातीं आहे. सरकार या गिरण्यांना कापूस देतें व तयार कापड आपल्या ताब्यांत घेतें. गिरणी मालकांना मजुरी व इतर खर्च मात्र मिळतो. पण सरकारनें कापडाच्या किंमती ठरवून दिल्यामुळें स्पर्धेला अथवा अधिक फायद्याला जागा राहात नाहीं.

चीनमध्यें कापडाची कमतरता आहे. आणि अन्नाच्या खालोखाल कापडाची जनतेस अत्यंत जरुरी आहे. म्हणून चीनच्या पुनर्रचनेच्या योजनेस कापड धंद्यास महत्त्वाचें स्थान आहे. आतां कापडाचा भरपूर सांठा असून चिनी कामगार अधिक कापड वापरूं लागला आहे असें सांगण्यांत येतें. अन्न व वस्त्र यांचा आतां भरपूर सांठा असल्यानें चीनची आर्थिक परिस्थिति सुधारत आहे असेंहि मत व्यक्त करण्यांत येतें. जमीन सुधारपद्धतीमुळें शेतकऱ्याचें उत्पन्न वाढलें असून पूर्वी दर माणशीं कापडाचा खप सरासरी सवातीन वार असे. तो १९५१ मध्यें ८ वार व आतां १६ वार आहे असें पेकिंगच्या नगराध्यक्षानें आम्हांस सांगितलें.

काओ कांग नांवाच्या एका खेड्यास आम्हीं भेट दिली. तेथील एक शेतकरी म्हणाला— " पूर्वी मजजवळ फक्त एकच फाटका व ठिगळें लाव-

लेला सूट होता. आज मजजवळ पांच सूट आहेत. चिनी जनतेचें आर्थिक व नैतिक सामर्थ्य वाढल्याचा हा पुरावा आहे.

पूर्वी मात्र चीनमध्यें कापडाची फारच टंचाई होती. जपानहून चीनमध्यें पुष्कळच कापड आयात होत असे. भारतांतून चीनमध्यें कापूस निर्यात होई. कापूस नसल्यानें सहा महिनेपर्यंत गिरण्या बद ठेवाव्या लागल्या होत्या परदेशाहून कापड येऊं शकत नव्हतें. अजूनही चीनमध्यें भरपूर कापड मिळत असेल असें मला वाटत नाहीं. सरकारनें या धंद्यावर नियंत्रणें घातल्यानें एकाच सांच्याचें कापड चीनमध्यें तयार होतें. त्याच्या किंमती वाढतात व तें अपुरें पडतें. एक वार कापडाला जवळजळ दोन ते अडीच रुपये पडतात.

आमच्या बरोबर\ जे चिनी अधिकारी असत. ते दररोज एकच एक निळा सूट घालीत. तो धुतलेला नसे कीं त्यास इस्त्रीही केलेली नसे. त्यांना एकच सूट दर वर्षी मिळे ! अशा परिस्थितींत चीनमध्यें सध्यां कापडाची विपुलता आहे असें कसें म्हणतां येईल ?

टिएनास्टेन येथील हेंग्वान कापड गिरणीचा पिएन शी चिंग या नांवाचा मालक आहे. १९५१ च्या ऑक्टोबर महिन्यांत माझी व त्याची भेट झाली, त्या वेळीं तो प्रख्यात होता. त्याची मुद्रा करारी दिसे. त्याला टक्कल पडलें होतें व त्याच्या चष्म्यामुळें तो उग्र दिसे. त्याचे कपडे व्यवस्थित होते. तो अबोल होता आणि आपल्या कामगारांवर त्याचा चांगला वचक असावा असें दिसत होतें. त्याच्या घरीं आम्हांस उत्तम प्रकारचा चहा मिळाला. आपली हकीगत सांगतांना तो म्हणाला—" १९५० मध्यें कापसाची टंचाई आली. मी एका खाजगी कारखान्याचा मालक असल्यानें कापूस मिळेना. म्हणून मजुरी व खर्च सरकारनें द्यावा व कापूस पुरवून तयार होईल तें सर्व कापड सरकारनें आपल्या ताब्यांत घ्यावें असें त्यानें सरकारास सुचविलें. सरकारनें ही अट मंजूर केल्यानें शी चिंगचा फायदा झाला व काम मिळाल्यानें मजूरहि खूष झाले.

आम्हीं ज्या वेळीं ही गिरणी पाहावयास गेलों त्या वेळीं मजूर संघटनेचे प्रतिनिधी व आदर्श कामगार हजर होतेच. याठिकाणीं आम्हांस धंद्यासंबंधींची नेहमीं देण्यांत येणारी माहिती दिली गेली नाहीं. शी–चिंगला भाषणें करणें आवडत नसे. आमच्या प्रश्नांना मात्र ते उत्तर देत. त्यांना माहिती चांगली होती. त्यांनी आम्हांस सर्व गिरणी दाखविली. आमचें शंकानिरसन केलें. त्यामुळें आम्हांस बरें वाटलें. उत्तरें देतांना त्यांनीं इतरांप्रमाणें टाळाटाळ केली नाहीं. त्यांचा कामगारवर्ग संतुष्ट दिसला.

टिएनस्टेनला ज्यावेळीं पुनः भेट दिली त्यावेळीं राष्ट्रीयीकरणाचा दंडुका या गांवालाही बसला होता. श्री. शी चिंग यांस भेटण्याची मीं इच्छा व्यक्त केली पण माझ्या विनंतीस उत्तरच मिळालें नाहीं. बहुधा शी चिंग यांचा धंद्यांतील अवतार दरम्यानच्या काळांत संपला असावा.

टिएन्स्टेन येथील कापडधंद्याची पद्धति वेगळी होती. सरकारकडून कापूस घेऊन तयार झालेलें कापड सरकारला विकणें व यासाठीं झालेला खर्च घेणें ही शांघायची पद्धति होती. पण या प्रकारांत गिरणीला फायदा असा फारंच थोडा राही. जी सरकारी कंपनी हें कापड विकत घेत असे तिला भरपूर फायदा मिळे. एवढें मात्र खरें कीं या व्यवस्थेनें गिरणीला वर्षभर काम मिळे आणि निदान खर्चाचीं दोन्ही तोंडें तरी मिळत.

शांघाय येथें असतांना देशी व परकीय उद्योगपतींशीं मीं चर्चा केली. कच्चा माल मिळत नसल्यानें अथवा मालाला भरपूर मागणी नसल्यानें महिन्यांतून तीन आठवडे अनेक कारखाने बंद ठेवावे लागतात असें त्यांनीं मला सांगितलें चिनी लोक भरपूर प्रमाणांत धूम्रपान करतात. परंतु वर दिलेल्या कच्च्या मालाच्या अभावीं इंपिरियल टोबॅको कंपनीच्या कारखान्यांत नेहमीपेक्षां $\frac{1}{3}$ च काम होई. बीअरची तीच अवस्था.

या सगळ्याचा निष्कर्ष असा निघतो कीं, गेलीं तीन वर्षे चीननें आपल्या औद्योगिक प्रगतीच्या बाबत जी पावलें टाकलीं आहेत त्यांत अजून त्याला यश मिळालेलें नाहीं. प्रयत्न मात्र चालूंच आहेत.

कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री आणि कच्चा माल यांची चणचण अजून संपली नाहीं. कांहीं कांहीं बाबतींत तर तांतडीच्या गरजा पुऱ्या करण्यासाठीं चीनला हस्तव्यवसायाची मदत घेणें भाग पडलें. जीवनमान वाढणार नाहीं एवढी दक्षता घेऊन व अनावश्यक वस्तूंवर जबर कर बसवून चीननें आज परिस्थिति मात्र कांबूत ठेविली आहे. उदाहरणार्थ नॅनकिंग येथील एका सायकलच्या दुकानांत इंग्रजी सायकलींच्या किंमती जवळ जवळ एक हजार रुपयांच्या सुमारास होत्या. तर जपानी सायकली रु. ४०० पासून रु. ८५० पर्यंत होत्या. चीनमधील मोठमोठ्या शहरांतून ट्रॅम व रिक्षांखेरीज सायकल हें एकमेव स्वावलंबी वाहन आहे.

आपल्याजवळ असलेल्या थोड्याश्या सामूग्रीचा जास्तींत जास्त उपयोग करून कामगारांना अधिक वाकबगार करणें व लोकांत यंत्रांसंबंधीची आवड निर्माण करणें इकडे सध्यां चीनचें लक्ष आहे. प्रदर्शनाच्या द्वारें हें शिक्षण अधिक यशस्वीरीत्या देतां येतें. टिएनस्टेन येथें भरलेल्या एका प्रदर्शनांत जनतेच्या जीवनक्रमाचीं माहिती देणारी भित्तिपत्रकें लावलेलीं होतीं, सरकारचें उद्दिष्टहि या पत्रकांच्या द्वारें व्यक्त करण्यांत आलें होतें. शेतकी, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य, संस्कृति याबाबत सरकारचीं कोणतीं उद्दिष्टें आहेत याची रूपरेषाहि या पत्रकांत दिलेली होती. चीनमध्यें तयार केलेली मोटारगाडीहि या प्रदर्शनांत ठेवली होती. ही मोटार म्हणजे चिनी कामगारांच्या कर्तृत्वशक्तीचें एक प्रतीकच होतें. ही मोटार रस्त्यावरून जोरानें धावो वा न धावो, पण चिनी जनतेच्या मनांत या दृश्यांमुळें उत्साह संचरला यांत शंका नाहीं.

देशांत अमुक टक्के प्रगति झालेली आहे असें नुसतें जाहीर करून चालत नाहीं. प्रत्यक्ष कार्य जनतेला दिसलें पाहिजे म्हणजे लोकांची खात्री पटते. अशा तऱ्हेचा प्रत्यक्ष प्रचार अधिक बोलका ठरतो. अशीं प्रदर्शनें पाहून आलेले लोक, चीनमध्यें मोटारी तयार होतात, पेट्रोल तयार करण्यांत येतें असें सांगतात आणि त्याचा लोकांच्या मनावर इष्ट परिणाम होतो.

* * *

## ७ : पुनर्रचनेचे प्रयोग

दुसऱ्या महायुद्धानंतर चीनची आर्थिक स्थिति फारच ढासळली होती. मांचुरियासारख्या प्रदेशांत तर उद्योगधंदे थंड झाले होते. तेथील यंत्रें पळविण्यांत आलीं होतीं. आगगाड्यांचें दळणवळण बंद पडलें होतें. शेतीची अवहेलना झाली होती. दुष्काळ पडला होता. ज्याला जसें सांपडेल तसे लोक धान्य सांठवीत होते. आर्थिक परिस्थिति खालावूं लागल्यानें चीनमधील नाण्यांचें अवमूल्यन होत होतें. सरकारी नाण्यांवर लोकांचा विश्वास नसल्यानें व्यापार विस्कळित झाला होता. १९४९ मध्यें सरकारी नाण्यांपेक्षां सोनें आणि परकीय नाणी यानांच किंमत होती. त्यावेळच्या सरकारनें कागदी नोटा छापण्याचें काम चालूं ठेवलेंच होतें. त्यामुळें त्यांस किंमतच नव्हती. एखाद्याजवळ एक हजार चिनी डॉलर्स असले तरी नाण्यांच्या अवमूल्यनामुळें तेवढ्या रकमेंत काड्याच्या पेटींतील एक काडीहि विकत मिळत नव्हती.

शेतीचें उत्पादन शेंकडा ३० व उद्योग धंद्यापासूनचें उत्पादन शेंकडा ५० वर आलें होतें. अशा रीतीनें राज्य चालणें अशक्यच होतें पण थोडक्याच काळांत कम्युनिस्ट सरकारनें आपल्या कर्तृत्वशक्तीनें परिस्थिति सुधारली आणि निराश झालेल्या जनतेंत आत्मविश्वास निर्माण केला. छोटे व्यापारी आणि कारखानदार यांना आजच्या सरकारबद्दल जो आपलेपणा वाटतो तो यामुळें. आज चीनमध्यें वस्तूंचे भाव फारसे वाढलेले नाहींत. आणि नाणें बाजार वाढला असला तरी लोकांना सुरक्षितता वाटत आहे.

१९५० च्या मार्च ते जून या तीन महिन्यांत सरकारनें चलनवाढीस आळा घालण्यास सुरुवात केली युद्धामुळें झालेली हानी भरून काढून आर्थिक सुव्यवस्था निर्माण करण्याचा सरकारनें चंग बांधला. इतक्या थोडक्या अवधींत ही परिस्थिति पालटली याचें कारण चीनमधील राज्यकारभार बऱ्याच प्रमाणांत हुकूमशाही स्वरुपाचा झाला होता. मात्र ही हुकूमशाही कर्तबगार

जनतेच्या कल्याणासाठीं झटणारी होती. चलनवाढ थांबविण्यासाठीं तीन गोष्टींची जरुर होती. देशाचें उत्पन्न व खर्च याचा मेळ घालणें आवश्यक होतें. लोकांजवळ असलेला पैसा सुरक्षित राहील, त्याचे अवमूल्यन होणार नाहीं याची त्यांस खात्री करुन देणें आवश्यक होतें. आणि वस्तूंच्या वाढलेल्या किंमतीवर नियंत्रण घालणें आवश्यक होते.

यांपैकीं पहिलें ध्येय साध्य करण्यासाठीं सरकारनें आर्थिक प्रश्नाकडे लक्ष दिलें. सर्व वसुली केंद्रें सरकारनें आपल्या हातांत घेतली आणि खर्चावर नियंत्रण ठेवलें. धान्य आणि कापूस यांच्या द्वारां साऱ्याची रक्कम देण्याची शेतकऱ्यांस परवानगी देण्यांत आली. सरकारनें कारखाने सुरूं करविलें आणि त्यांत तयार झालेल्या मालाच्या विक्रीची हमी घेतली. रेल्वे रस्त्यांची दुरुस्ती करण्यांत आली. यामुळें सरकारचें उत्पन्न वाढलें. खर्चावर कडक नियंत्रणें घालण्यांत आलीं. पुष्कळशा सरकारी नोकरांस पगाराऐवजीं, अन्न, वस्त्र व आसरा देण्यांत आला. लष्कर स्वावलंबी होईल आणि त्याच्या खर्चाचा बोजा तिजोरीवर पडणार नाहीं अशा योजना आंखण्यांत आल्या. यामुळें अंदाजपत्रकांतील तूट भरून येण्यास मदत झाली.

पॅरिटी डिपॉझिट यूनिट नांवाचें एक नवें खातें उघडून परकीय चलनांचे भाव निश्चित व स्थिर करण्यांत आले. सरकारी संस्था, शाळा, सैनिकं यांनीं आपल्याजवळ तीन दिवसांच्या खर्चापेक्षां अधिक रक्कम ठेवावयाची नाहीं असा हुकुम काढण्यांत आला. शिल्लक असलेला सर्व पैसा लोकांनीं बँकेंत भरावा असा त्यांस आदेश देण्यांत आला. या पैशाचें वस्तूंत मूल्यमापन करण्यांत आलें. अमुक पैशांत अमुक वस्तु मिळेल. मग त्या वस्तूची बाजारांतील किंमत कोणतीही असो' असें जनतेस आश्वासन देण्यांत आलें. वस्तूंचें मूल्यमापन करतांना हिशोबासाठीं तांदूळ, कापड, तेल, कोळसा वगैरे नित्योपयोगी वस्तू घेण्यांत आल्या. सोन्याची देवाणघेवाण बेकायदेशीर ठरविण्यांत आली व लोकांनीं आपल्याजवळील सोनें बँकाकडे भरावें असा आदेश देण्यांत आला. या सोन्याची किंमत मुद्दाम कमी लावण्यांत आली. परकीय चलनांचा हिशोब करण्यांत आला. सोनें व परकीय चलनें यामुळें आयात होणाऱ्या

मालाची किंमत देणें चीनला सोयीस्कर झालें. बाजारांत वायदे वाढूं नयेत म्हणून चीनमधील सर्व बँका (यांची संख्या ८०० होती) पीपल्स बँक नांवाच्या एका मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाखालीं आणण्यांत आल्या.

धान्य, कापड, कोळसा व इतर जीवनोपयोगी वस्तूंचा व्यापार एका मध्यवर्ती संस्थेच्या हवाली करण्यांत आला व त्यांचे भाव स्थिरावण्यांत आले. सरकारनें स्वतः दुकानें उघडून अशा वस्तू वाजवी दरानें विकण्यास सुरवात केली. लोकांत विश्वास व सुरक्षितता निर्माण झाल्याबरोबर दडलेल्या बऱ्याच वस्तू बाहेर आल्या. पण अन्नाचा प्रश्न कठिणच होता. पण सरकारला साऱ्याच्या रूपानें पुष्कळ धान्य मिळालें शिवाय सरकारनें बाजारांतून धान्य खरेदी केलें, व पुढील दोन वर्षांचा साराही आगाऊ वसूल केला. त्यामुळें धान्याचा प्रश्न बराचसा सुटला. कोळशाच्या निर्यातीस बंदी केल्यानें जळणाचा प्रश्न आटोक्यांत आला.

नान हान चेन हा पीपल्स बँकेचा व्यवस्थापक. चीनच्या अर्थकारणाचीं सर्व सूत्रें त्याच्या हातांत होती. पूर्वीं तो एक साधा बँकेतील कारकून होता. पण आज आपल्या धडाडीनें व बुद्धिमत्तेनें चीनचा आर्थिक डोलारा त्यानें सांवरून धरला आहे बाजारांत प्रथम भरपूर पैसा सोडावयाचा व नंतर तो पुन्हां आपल्या ताब्यांत घेऊन वस्तूंच्या किंमती खालीं आणावयाच्या असें त्याचें धोरण आहे. त्यांनीं आम्हांस चीनच्या आर्थिक परिस्थितीसंबंधी माहिती दिली. ते तीन तास बोलत होते. वास्तविक हा विषय अत्यंत रुक्ष; परंतु त्याचें विवेचन इतकें साधें सोपें अन् सरळ होतें कीं त्यांनीं आम्हांस मंत्रमुग्ध केलें. ते स्वतः कम्युनिस्ट पक्षाचे सभासद नाहींत. पण जर्मनींतील डॉ. शॅट यांच्या-प्रमाणें आपल्या सरकारशीं ते प्रामाणिक असून सरकारचें धोरण निष्ठेनें अमलांत आणीत आहेत.

ते आपल्या भाषणांत म्हणाले "आज कोणत्याहि वस्तूची सांठेबाजी नाहीं कीं कमतरता नाहीं. आम्हांला अनावश्यक असलेल्या वस्तु आम्ही आयात करूं देत नाहीं. उलट उद्योगधंदे व शेती यांस उत्तेजन देऊन आम्हीं आमच्या देशांत त्या वस्तूंना गिऱ्हाईक निर्माण केलें आहे. यामुळें व्यापार वाढला व

चलनाची देवघेवही वाढली. आज आमचें अंदाजपत्रक समतोल आहे. आमच्याजवळ परकीय चलन भरपूर आहे. आर्थिक व किंमतविषयक बाबतींत आम्हीं सुरक्षित आहों. कधींकधीं वस्तूंचा पुरवठा कमी पडतो परंतु त्याबाबतींत आम्हीं लगेच उपाययोजना करतो उत्पादनक्षम अशा उद्योगधंद्यांची आम्हीं वाढ केली आहे आणि त्याचा आमच्या अर्थकारणास नी जनतेस फायदाच झाला आहे हुआई नदीच्या धरणासारख्या योजना आम्हीं हातीं घेतल्या आहेत आणि दुष्काळामुळें पडीक जमीन पूर्वी २ कोटी एकर होती ती आतां ७० लक्ष राहिली आहे. आमच्याकडे अजून थोडी कमतरता आहे पण थोड्याच काळांत आम्हीं ती भरून काढूं. ''

त्यांचें हें भाषण खरोखरच स्फूर्तिदायक होतें. आर्थिक बाबतींत लोकांचा विश्वास संपादन करणें आणि परकीय चलन व सोनें यांचा हुंडणावळीसाठीं उपयोग करूं न देणें हें या भाषणाचें सूत्र होतें. पॅरिटी डिपाझिट यूनिटच्या पद्धतीनें जीवनोपयोगी वस्तूंवर आपोआपच सरकारी नियंत्रण आलें.

सरकारनें धान्याच्या रूपानें सारा वसुल करण्याचें ठरविलें, आणि वेतन धान्याच्या रूपानें देण्यास सुरुवात केली. त्यामुळें लोकांना शाश्वती वाटूं लागली. वाढ झाली ती उत्पन्नांत न होतां उत्पादनांत झाली. लोकांच्या जवळ पैसा असला व हवी असलेली वस्तू उपलब्ध असली तरच लोकांस ती घेण्याची शक्यता निर्माण होते.

राज्यकारभार खंबीर पायावर उभारला गेला. जनतेचा सरकारवर विश्वास बसूं लागला. प्रारंभी सरकारच्या प्रयत्नांना न जुमानतां चलनवाढ झाली. पण फेब्रुवारी १९५० मध्यें रशियाशीं तह करून माओ त्से तुंग परत आल्याबरोबर नाणें बाजार स्थिरावला, सरकारचें आसन स्थिर झालें. जागतिक युद्ध झाल्यासच सरकारला धक्का पोंहोंचण्याचा संभव होता. सोनें व परकीय चलन कमी दरांत सरकारला मिळाल्यानें सरकारला आपलें आर्थिक धोरण अमलांत आणतां येऊं लागलें.

वस्तूंच्या किंमती हळूं हळूं वाढूं लागल्या. सरकारला अधिकाधिक नोटा छापणें भाग पडलें. ५० लक्ष सैन्य सांभाळणें, मोठमोठ्या योजना हातीं घेणें, सरकारी यंत्रणा राबविणें या गोष्टी मागासलेल्या देशांत हुकुमशाही सरकारलाही जड जातात. चीनच्या अंदाजपत्रकांतील आंकडे अजून जाहीर झाले नाहींत. पण एवढें मात्र खरें कीं खर्चापेक्षां जमेची बाजू कमीच आहे. १९५३ च्या फेब्रुवारींत पेकिंग सरकारतर्फे राष्ट्रीय अंदाजपत्रकांतील आंकडे प्रथमत: जाहीर करण्यांत आलें. १९५२ मध्यें चीनचें उत्पन्न ८०० कोटी डॉलर होतें व खर्चवेंच जातां १० कोटी डॉलर शिल्लक पडेल असा सरकारी अंदाज होता. अर्थातच हे आंकडे आपणांस प्रमाण म्हणून मानतां येणार नाहींत. १९३७ च्या मानानें जीवनमान पंचवीस हजार पटीनें वाढलें होतें. शिवाय बऱ्याच उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें होतें. परकीय व्यापारावर सरकारनें आपलें नियंत्रण ठेवलें होतें. अंदाजपत्रकांतील निम्में उत्पन्न करांच्या रूपानें वसूल व्हावयाचें होतें. तसेंच बाजारांत जरूरीपेक्षां अधिक नाणें फिरत होतें. १९५०-५१ मध्यें वस्तूंच्या किंमती वाढत होत्या सरकारी अंदाजाप्रमाणें ही वाढ ४० टक्के होती तर लोकांच्या अंदाजाप्रमाणें ती शंभर पट होती.

चीनमध्यें सर्व लोकांचें पगार गहूं अगर तांदूळाच्या हिशेबानें देण्यांत येतात. अर्थातच त्या वस्तूंचे पगाराच्या दिवशीं जे बाजारभाव असतील त्या दरांच्या हिशेबानें ही रक्कम रोख देण्यांत येते. त्यामुळे जीवनोपयोगी वस्तूंची खरेदी करतांना अडचण पडत नाहीं. किंमतींतील फरक इतर वस्तूंच्या बाबतींतच आढळून येतो. यामुळें ग्राहकांच्या खरेदीशक्तीवर नियंत्रणें बसतात हें मात्र खरें.

या प्रकरणीं लिहितांना 'पीपल्स चायना' हें पत्र म्हणतें— सुरुवातीस वस्तूंचें उत्पादन भरपूर प्रमाणावर होत नसल्यानें वस्तूंच्या किंमती वाढल्या होत्या. पण आर्थिक पुनर्रचनेच्या वेळीं अशा गोष्टी अपरिहार्य असतात. इतकेंच नव्हे तर आपणांस असें म्हणतां येईल कीं या वस्तूंच्या किंमतींत झालेली वाढ ही ग्राहकाच्या वाढत्या खरेदीक्षमतेची एक साक्षच होय.

कामगारांचे पगार वाढल्यानें वस्तूंच्या किंमती वाढल्या असें कोणी यावर म्हणेल पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं वस्तूंच्या उत्पादनांतही वाढ झाली असल्यानें मूळ किंमतींतच ग्राहकांना वस्तु मिळावयास हव्या होत्या.

चीनचें अंदाजपत्रक अजून तुटीचेंच आहे. अवाढव्य लष्करी खर्च व नव्या नव्या योजना यांचा खर्च चलनवाढ करून भागविण्यांत येत आहे. सरकारवर जोपर्यंत जनतेचा विश्वास आहे तोंपर्यंत हें चालेल. वास्तविक चलनवाढीला नेहमीं कांहींतरी तारण लागतें पण चिनी सरकारजवळ आज तसें तारण दिसत नाहीं. गरज लागेल त्याप्रमाणें सरकार नोटा छापून घेत आहे.

तसेंच वेळोवेळीं देणग्या व वर्गण्या जनतेवर लादून सरकार पैसा गोळा करीत आहे. या वर्गण्या नांवापुरत्याच ऐच्छिक आहेत. गेल्या तीन वर्षांत तीन वेळां वर्गण्या मागण्यांत आल्या. यामुळें बाजारांतील चलनाचे व्यवहार थंडावले.

नॅन हॅन चेन यांना माझ्या चीनच्या दुसऱ्या सफरीच्या वेळीं पुन्हां भेटलों. मीं आगाऊ त्यास एक प्रश्नावली पाठविली होतीच. त्यानंतर कांहीं दिवसांनीं मला त्यांच्याकडून बोलावणें आलें.

माझ्या प्रश्नांना उत्तर देतांना ते म्हणाले " वस्तूंवरील कर, व्यवसायकर, उत्पन्नकर व विक्रीकर, सरकारनियंत्रित धंद्यापासून येणारें उत्पन्न व जमीन महसूल हीं आमची उत्पन्नाचीं प्रमुख साधनें होत. जमीन महसुलापासून आम्हांस फारसें उत्पन्न होत नाहीं. आमच्या अंदाजपत्रकाची आतां तोंडमिळवणी झाली आहे आणि आम्हीं आतां शिल्लक टाकूं शकूं अशी आम्हांस उमेद आहे. आमच्या योजनांना आम्ही आतां स्वतःचें भांडवल पुरवूं शकतों. भांडवलाच्या बाबतींत आम्हीं डोळ्यांत तेल घालून असतों. प्रत्येक प्रांताला उत्पन्नाचा भाग देण्यांत येतो. आमच्याकडे आतां चलनवाढ नाहीं. गरज व पुरवठा यांच्या तत्वानुसार वस्तुंच्या किंमती कमीजास्त होतात. आमच्याजवळ असलेल्या साठ्यांच्या साहाय्यानें आम्ही बाजारांतील वस्तुंच्या किंमती स्थिरावूं शकतों. यांत निर्माता व ग्राहक या दोहोंचें हित पाहिलें जातें. आमची एकंदर आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे. "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

आम्ही एकूण तीन तास बोलत होतों आणि मीं पाठविलेल्या प्रश्नांवरच आमची चर्चा चालू होती. चीनमध्यें सध्यां चलनवाढ आहे. सरकार बेरमाप नोटा छापीत आहे, व जनतेजवळचा शिल्लक पैसा सरकार या ना त्या मार्गानें परत काढून घेत आहे या विधानांचा त्यांनीं इन्कार केला. सरकारचें आर्थिक धोरण खंबीर आहे व लोकांजवळील पैशापैकीं दोन तृतीयांश पैसा सरकारनें काढून घेतला आहे एवढें मात्र त्यांच्या बोलण्यांत आलें. वस्तूंच्या भारी किंमती व खरेदीवर घातलेलीं नियंत्रणें यामुळें हें शक्य झालें असावें. जीवनमान व चलन याचा फारसा संबंध आढळून आला नाहीं, पैशाच्या जोरावर सरकार राहातें आणि या राहाण्यासाठीं हव्या तेवढ्या नोटा सरकार छापतें.

* * *

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०१९५

चीनचे पंतप्रधान यांच्या मताप्रमाणे चीनच्या अर्थकारणाचे पांच विभाग पडतात. अर्थातच हें अर्थकारण लोकशाही पद्धतीचें असून त्याचें नियंत्रण सरकारकडून होतें. कच्च्या मालाचा पुरवठा वस्तूंच्या बाजारपेठा, मजुरांची परिस्थिति, यांत्रिक सामुग्री, राष्ट्रीय अर्थशास्त्रासंबंधीचें धोरण वगैरे अर्थशास्त्रांच्या विभागांचें केंद्रीकरण करणें, त्यांचा समवाय साधणें हें लोकशाही सरकारचें कार्य आहे.

खाजगी शेती व हस्तव्यवसाय, खाजगी उद्योगधंदे, सरकारी उद्योगधंदे, राष्ट्रीयीकरण झालेले धंदे असे चीनच्या अर्थकारणाचे प्रमुख विभाग होत. पूर्वी जपान व इतर परकीय राष्ट्रांच्या हातीं असलेले उद्योगधंदे आतां चिनी सरकारनें आपल्या ताब्यांत घेतले असल्यानें त्यांचा या विभाजनांत अंतर्भाव करण्यांत आला आहे. मोठ्या उद्योगधंद्यापैकीं शेंकडा ८० व लहान उद्योगधंद्यांपैकीं शेंकडा ३० उद्योगधंदे अशा प्रकारें आपल्या ताब्यांत घेतले आहेत.

चीनमधील कांहीं शेती अजून खाजगी व्यक्तींच्या ताब्यांत आहे. पण जुनी सरंजामशाही व आगामी लोकशाही यांच्या संधिकालापुरतीच ही परिस्थिति आहे. माओ म्हणतो—" आमच्या धोरणाचे पहिलें पाऊल म्हणजे लोकशाही व नंतरची पायरी म्हणजे समाजसत्तावाद. यांपैकीं पहिलें पाऊल जास्त काळापर्यंत रेंगाळत राहील." चीनमध्यें होत असलेल्या लोकशाही क्रांतीसंबंधीं लिहितांना तो म्हणतो—

" आर्थिक दृष्ट्या या क्रांतीचा विचार करावयाचा झाल्यास आपणांस असें म्हणतां येईल कीं भांडवलदारांची सत्ता, साम्राज्यवादी, देशद्रोही व प्रतिगामी प्रवृत्तीचे लोक यांच्या हातीं. असलेल्या उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण करावयास हवें. मोठमोठ्या जामीनदारांच्या ताब्यांत असलेली जमीन लहान शेतकऱ्यांच्या ताब्यांत द्यावयास हवी. लहान उद्योगधंद्यास मदत करावयास

हवी. श्रीमंत शेतकऱ्यांचे रक्षण मात्र करावयास हवें. अशा रीतीनें भांडवलदारांचें उच्चाटन करतां करतां समाजसत्तावादाची स्थापना करावयास हवी.

चीन आज जरी कम्युनिस्ट असला, तरी त्या देशांत अजूनही भांडवलदारांच्या हातीं सत्ता असल्याचें आढळून येतें. त्यांना नफाहि चांगला मिळतो. खाजगी धंदा करणाऱ्यांना पंधरा टक्के मिळाल्यास तो वाजवी आहे व बँकांनीं आठ टक्क्यांपर्यंत डिव्हिडंड वांटण्यास हरकत नाहीं असें तेथील सरकारचें धोरण आहे. पण या फायद्यापैकीं दहा टक्के फायदा गंगाजळींत ठेवण्याचें कारखानदारांवर बंधन आहे. राहिलेल्या फायद्यापैकीं साठ टक्के फायदा भागीदारांस बोनस म्हणून द्यावा लागतो व पंधरा टक्के कामगारांच्या कल्याणासाठीं खर्च करावा लागतो. हेंग्वान येथील कापडगिरणीचा धंदा वरील धोरणामुळें आतां कायदेशीर होऊं लागला आहे. यापूर्वीं तो तोट्यांत चालू होता व त्या कारखान्याजवळ भांडवल राहिलें नव्हतें असें मला सांगण्यांत आलें.

चीनमधील उद्योगधंद्यांत आतां फायदा मिळूं शकत नाहीं असें चीनमधील ब्रिटिश उद्योगपती म्हणतात. कापडाला चांगला भाव येत असूनही कापडाच्या गिरण्यांना फायदा रहात नाहीं. कारण सरकार कारखानदारांना केवळ प्राक्रियांचा खर्च देऊन सर्व फायदा स्वतः घेतें असें त्यांचें म्हणणें आहे. कांहींवेळां सरकार या कारखानदारांना आपलें कापड व्यापाऱ्यांस विकण्याची परवानगी देतें. पण व्यापारी माल थोडासाच मागवितात व कारखान्यांत मोठाले साटे शिल्लक राहतात. व्यापाऱ्यांचें गिऱ्हाइक तुटलें असून तें सरकार अथवा सरकारी संस्थांच्या हातीं गेलें आहे. हें म्हणणें खरें असावें कारण ज्या ज्या ठिकाणीं मी गेलों तेथील सरकारी दुकानें गिऱ्हाइकांनीं गजबजलेलीं व इतर दुकानें ओस पडलेलीं मला आढळून आलीं. वास्तविकरीत्या चीनमध्यें वस्तूंचे भाव ठरविण्यांत आले आहेत पण खाजगी व्यापारी गिऱ्हाइकाच्या घरीं जाऊन तोच माल स्वस्त दरानें विकण्यास तयार असतात.

हेंग्वान गिरणीच्या चालकांनीं आपल्या शिलकींतून सिॲन येथें कापडाची एक नवी गिरणी उघडावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें इमारती बांधून तयार झाल्या. यंत्रसामुग्रीही आली पण त्या गांवाचे कामगारच मिळेनात. बाहेरून

कामगार आणावे तर त्यांना अधिक वेतन द्यावें लागणार. याबाबत चर्चा करण्यासाठीं कारखान्याचे चालक सरकारला भेटले व त्यांनीं आपल्या अडचणी सरकारपुढें मांडल्या. अखेर सरकारनें ती गिरणीच आपल्या ताब्यांत घेतली.

जमीन सुधारणेच्या कायद्यामुळें कारखान्यांना कामगार मिळेनासे झाले. आपल्याला मिळालेली जमीन सोडून नोकरीवर जाण्यास लोक तयार होईनात. या कायद्यापूर्वीं स्वतःच्या मालकीची जमीन असणारे लोक फारच थोडे होते व बेकारीची भीति नेहमीं असे.

सरकारचा व्यापार मात्र सध्यां चीनमध्यें वाढत्या प्रमाणावर आहे. आयात व निर्यात व्यापाराचा मोठा भाग सरकारच्या ताब्यांत आहे. अन्न-धान्यें, कोळसा, कापड, मीठ, साखर, लोखंड पोलाद, लाकूड, व सीमेंट या वस्तूंच्या व्यापारापैकीं शेंकडा चाळीस ते शंभर टक्के व्यापार सरकारच्या ताब्यांत आहे. किरकोळ व्यापारापैकीं शेंकडा तीस टक्के व्यापार सरकारकडे व सहकारी संस्थांकडे आहे. आपला सर्व माल सरकारला विकण्याचे करार कित्येक कंप-न्यांनीं सरकारशीं केले आहेत.

तसं पाहिलं तर चीनमधील अर्थव्यवस्था मिश्र स्वरूपाची नाहीं. आपलें ध्येय साधण्यासाठीं सरकारनें खाजगी धंद्यावर नियंत्रण ठेवलें असून त्यांजवर बंधनें लादलीं आहेत.

तयार माल व कच्चा माल यांवर नियंत्रणें घालणें, रोख व कर्जाच्या व्यवहारांवर बंधनें घालणें, औद्योगिक व व्यावसायिक कर आकारणें, फायद्याच्या वांटणीवर बंधनें घालणें, यामुळें खाजगी कारखानदारांची स्थिति कंत्राटदारा-सारखी झाली आहे. सरकार मोठ्या प्रमाणावर मालाची खरेदी करते व आपल्या दुकानांतर्फे त्या मालाची विक्री करते. त्यामुळें मालाच्या किंमती ठरविण्याचा अधिकार आपोआपच सरकारकडे आला आहे.

चीनमधील खाजगी धंदे जमीनदोस्त होऊं लागले आहेत. सरकारी धोरणाच्या ३१ व्या कलमांत खालील उल्लेख आहे " ज्यावेळीं गरज असेल अथवा शक्यता असेल त्यावेळीं सरकारला मदत करणें खाजगी धंदेवाल्यांना कबूल

करावें लागेल. सरकारी उद्योगधंद्यांस मदत करणें व सरकार सांगेल तो माल विकत घेणें हें खाजगी धंदेवाल्यांचें कर्तव्य समजलें जाईल.''

लांचलुचपत नाहीशी करण्यासाठीं सॅन फॅन वू फॅन नांवाची एक प्रचंड मोहिम सध्यां चीनमध्यें चालू आहे. या मोहिमेची माहिती पुढें देण्यांत येईल. या मोहिमेनुसार व्यापाऱ्यांवर जबर दंड लादण्यांत येतो. त्यामुळें अनेक दुकानें बंद करण्याची वेळ आली आहे. कर्जें मिळत नाहींत व धंदा चालत नाहीं अशी त्यांची परिस्थिति झाली आहे. मोठे कारखानदार लहान व्यापारी होऊन आपलें उत्पन्न कमी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. कारण हे दंड तथाकथित मोठ्या उत्पन्नावर लादण्यांत येतात. पण याचा सरकार फायदा घेतें व खाजगी धंदेवाल्यांस आपण मदत करीत आहों असा पुकारा करतें. या धंदेवाल्यांस माओनें प्रतिगामी लोक असें नांव दिलें आहे. समाजसत्तावाद रूढ झाला कीं पोलिस, लष्कर व कोर्टें यांच्या साहाय्यानें आपण त्यास धडे शिकवूं असें उघडपणें म्हटलें जात आहे, चीनमध्यें कम्युनिझम फैलावावयाचा असेल तर हे मध्यमस्थितींतील भांडवलदार नाहीसे केलेच पाहिजेत ! चीनचें अर्थकारण सध्यां या दिशेनें वाटचाल करीत आहे.

जनतेचें जीवनमान सुधारण्यासाठीं चीननें एक पंचवार्षिक योजना आंखली आहे. या योजनेनुसार मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ करण्यांत येणार असून शेतीचें यांत्रिकीकरण करण्यांत यावयाचें आहे. पण परराष्ट्रांकडून मदत मिळाल्याशिवाय हें ध्येय साध्य होणें शक्य नाहीं असें मला माझ्या पहाणीनंतर आढळून आलें आहे.

वास्तविक चीनमधील सध्यांचें जीवनमान अत्यंत खालच्या दर्जाचें आहे. लोकांना नोकऱ्या देणें, धंद्यांस भांडवल पुरविणें, आणि अधिक त्यागासाठीं जनतेची तयारी करणें हीं कामें आधीं करावयास हवींत.

लोकांवर हुकुमशाही सरकारला करांचें ओझें लादतां येतें पण त्याचबरोबर रोजच्या जीवनांत अधिक सुखसोयी उपलब्ध करणें व जीवनमान वाढविण्याची खात्री पटविणें हीं कामें सरकारला करावीं लागतात. यासाठीं सरकारला आपल्या कार्यक्षमतेची वारंवार जाहिरात करावी लागते आणि

लोकांनीं आपल्या यातना व दुःखें विसरावींत म्हणून त्यांना कोणाच्या तरी विरुद्ध चिथवावें लागतें. ज्या देशांत जनतेला खरेंखुरें स्वातंत्र्य असतें, जेथें स्वार्थत्याग करण्याची जनता आपणहून तयारी दर्शविते, तेथेंच जनतेच्या स्वार्थत्यागाच्या व सहकार्याच्या बळावर राष्ट्राला आपला भविष्यकाळ उज्वल बनवितां येतो.

आशियांतील राष्ट्रें अजून सुधारलेलीं नाहींत. भविष्यकाळच्या भर-भराटीची केवळ आशा दाखवून तेथील जनतेला हालअपेष्टांत ढकलणें योग्य नाहीं.

लोकांचीं दुःखें नाहींशीं करण्यासाठीं सरकारनें आपलें सर्व शक्तिसर्वस्व पणाला लावलें पाहिजे, जनतेला विश्वासांत घेऊन तिचें सहकार्य मागितलें पाहिजे तरच देशाची आर्थिक उन्नति होते. आशियांतील राष्ट्रांजवळ आज पैसा नाहीं त्यामुळें त्यांना परकीय मदत घेणें आवश्यक आहे. पण कम्युनिस्ट चीनला हा मार्ग मंजूर नाहीं. आज चीनमध्यें हुकुमशाही सरकार आहे. तुटीचीं अंदाजपत्रकें तयार करणें, जनतेवर करांचें जबरदस्त ओझें लादणें या मार्गानीं चीन सरकार आपल्या राज्यकारभाराचा अवाढव्य खर्च चालवूं शकतें, खडें सैन्य ठेवूं शकतें, व अर्थव्यवस्था जिवंत ठेवूं शकतें. पण भाडोत्री कामगारांकडून मोठालीं कामें होऊं शकत नाहींत.

प्रचाराच्या साहाय्यानें आज चीनमध्यें लोकांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न चालूं आहे. अमेरिका हा आपला शत्रू आहे अशा घोषणा करून जनतेला अमेरिकेविरुद्ध चिथावून देऊन लोकांच्या दुःखावर फुंकर घालण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. याचा जनतेवर अनिष्ट परिणाम होण्याचा फार संभव आहे. जनतेच्या सहनशक्तीलाही मर्यादा असते. चीनमधील जनता आपलें स्वातंत्र्य अबाधित ठेवील कीं, आपल्या यातनांचा शेवट करण्यासाठीं इतरांवर आक्रमण करील ? लक्षावधि चिनी जनतेला आपल्या विश्वासांत घेण्याचें कार्य चीनमधील कम्युनिस्ट सरकारकडून होईल काय ?

* * *

## — ३ —

### १ : बुद्धिभ्रमाचे प्रयोग

आपल्या मतप्रणालीवर लोकांनीं पूर्णपणें श्रद्धा ठेवावी आणि शंक-कुशंका काढूं नयेत असें कम्युनिझमचें तत्त्व आहे. म्हणून जनतेच्या विचारांची वाढ खुंटविणें, त्यांच्या विचारांवर नियंत्रण घालणें, एवढेंच नव्हे तर आपण म्हणूं त्याला सत्य मानण्याची जनतेची विचारप्रणाली बनविणें हें साधण्यासाठीं चिनी लोकांच्या शिक्षणावर बहुधा नियंत्रणें घातलीं जातील असें मला वाटतें.

चीनमधील प्रजासत्ताक राज्य स्थापनेच्या दिवशीं एक कार्यक्रम जाहीर करण्यांत आला. या कार्यक्रमास कॉमन प्रोग्रॅम असें नांव देण्यांत आलें आहे. या कार्यक्रमासंबंधींची माहिती शेवटीं परिशिष्टांत दिली आहे.

" राष्ट्राच्या उद्धाराचें नि क्रांतीचें कार्य पुरें करण्यासाठीं सार्वत्रिक शिक्षण सुरू करण्यांत येईल " असें या कार्यक्रम पत्रिकेंत म्हटलें आहे. चीन-मध्यें क्रांतीची जी नवी लाट उसळणार आहे त्या क्रांतीचें माध्यम शिक्षण हेंच रहाणार आहे.

ज्ञानदानाचा संकल्प सोडला तर खरा. पण हें काम अत्यंत बिकट आहे. त्यासाठीं चिनी लोकांना आपल्या पारंपारिक समजुती बदलाव्या लागतील. चिनी लोकांचें जीवनविषयक असें एक विशिष्ट तत्त्वज्ञान आहे. सहानुभूतीचा अभाव आणि कडकपणा यांचें त्या तत्वज्ञानास वावडें आहे. जीवनाचीं अंगें विविध खरीं पण ज्ञानचक्षूंच्या साहाय्यानें त्या विविधतेंतून आपल्यापुरता मार्ग शोधून काढणें हें चिनी लोकांचें एक खास वैशिष्ट्य आहे. खूप अभ्यास करावा, साधें जीवन जगावें आणि सभोंवताली असलेल्यांच्या मनोव्यापारांशीं समरस व्हावें एवढेंच चिनी विद्यार्थ्यांचें उद्दिष्ट असे.

अट्टाहास असा कोणत्याच बाबतींत नसे. एवढेंच काय, पण जणूं-कांहीं या विचारसरणीचा प्रभाव पडूनच एरवीं उग्र वाटणारी बुद्धाची मूर्ति आतां सौम्य झालेली आहे. नव्या चीनमध्यें अट्टाहास व दुराग्रह आहे. हा दुराग्रह उग्र आहे, क्रूर आहे.

मॅडम सन् यत् सेन यांनीं शांघाय येथें एक शिशुविहार चालविला आहे. तो मीं पहावयास गेलों होतों. तीन ते सात वर्षांचीं सुमारें दोनशें मुलें तेथें होतीं, मॅडम सन् यत् सेन यांनीं आपलें उर्वरित आयुष्य सामाजिक सेवेंत खर्च करण्याचें ठरविलें असल्यानें या शाळेस भेट देण्याची आम्हांस खास विनंति करण्यांत आली होती. आमच्या भेटीनिमित्त मुलांनीं खास कार्यक्रम करून दाखविले. जनतेची मुक्ति फौज आकाशांतील अमेरिकन विमानाकडे आपल्या छोट्या बंदुका रोखून कूच करीत आहेत असा एक प्रसंग या कार्यक्रमांत होता. द्वेष आणि हत्या यांचें जणूं कांहीं बाळकडूच या मुलांना देण्यांत येत होतें. पितृभूमि, समाज, कष्ट, शास्त्र आणि सार्वजनिक मालमत्ता याविषयीं आदर बाळगण्याची शिकवणही त्यास देण्यांत येई. पण आपले आईवडील व आपलें कुटुंब याविषयींच्या प्रेमाचा त्या शिक्षणांत अंतर्भाव नव्हता. मुलांना त्यामुळें चुकल्यासारखें वाटे. शाळेंत पाहुणे आले कीं हीं मुलें त्यांना बिलगत नी त्यांचेकडून लाड करवून घेत. एखाद्यानें कडेवर घेतलें कीं मुलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकत. कठोरपणा म्हणजे काय हें मला येथें समजलें.

आम्हीं कोठेंही गेलों तरी अशींच दृश्यें आमच्या नजरेस पडत. लहान मुलें आमच्या भोंवतीं जमत, मोठीं माणसें आपलेपणाची अपेक्षा दाखवीत. त्यांना माणुसकी नी मैत्री हवीशी वाटे. संकटें आली तरी चिनी माणसाचें हास्य मावळत नाहीं अशी चिनी भाषेंत एक म्हण होती. पण आतां ते हास्य मावळलें आहे.

मॅडम सनच्या शिशुमंदिरांत लहानपणापासून मुलांना कम्युनिझमचे पाठ मिळत. चीनमधील शिक्षणपद्धतीची वाखाणणी मीं ऐकिली होती. देश-सेवा करण्याचें ध्येय बाळगून लोकप्रिय व शास्त्रीय पद्धतीवर चीनमध्यें शिक्षणदान करण्यांत येतें असें मला समजलें होतें. त्यामुळें चीनमधील सर्व प्रकारचें शिक्षण पाहण्याची मला इच्छा होती. म्हणून मी माध्यमिक शाळा, विश्वविद्यालय वगैरेंस भेटी दिल्या.

पेकिंगमधील एका इंग्रजी शाळेंत नऊशें विद्यार्थी होते. चीनचा उपपंतप्रधान क्यूओ मो जो याचाही मुलगा या शाळेंत जात होता. जुनी पुस्तकें, जुने अभ्यासक्रम, जुन्या अध्यापनपद्धती आतां रद्द करण्यांत आल्या होत्या. कारण आतां रशियन पद्धतीनें शिक्षण देण्यांत येत होतें. तें लोकाभि-मुख होतें. सर्व विद्यार्थी युवक संघांचे सभासद होते. ते राजकारणांत भाग. आमच्यापैकीं एकानें विद्यार्थ्यास प्रश्न विचारला. "रशियानें चीनवर हल्ला केल्यास तुम्हीं काय कराल ?" "असें घडणारच नाहीं" असें उत्तर मिळालें.

कनफ्यूशिअस कोण होता या प्रश्नास तो एक जुनाट संरंजामशाही तत्त्वज्ञानी होता असा जबाब मिळाला.

शेतकरी व कामगार यांच्यासाठीं नेहमींच्या सहा वर्षांचा अभ्यासक्रम तीन वर्षांवर आणण्यांत आला होता अशा सुमारें चाळीस शाळा असून त्यांत पंधरा हजार प्रौढ विद्यार्थी होते. शेतकरी व कामगार हे आपल्या गांवाचे शासक व्हावेत व कम्युनिस्ट पक्षाचे शिस्तीचे सेवक व्हावेत अशा रीतीनें शिक्षणक्रमाची आंखणी करण्यांत आली होती. लिहिणें व वाचणें याखेरीज मार्क्सवाद, विज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र व क्रांतीचा इतिहास हे विषय या शाळांतून शिकविण्यांत येत. त्यांना शाळेंतच रहावें लागे व एकमेकांवर

सक्त नजर ठेवावी लागे. आपले विचार व कृत्यें यांची रोज नोंद ठेवण्याची त्यांजवर सक्ति असे. या नोंदींची चर्चा होई आणि अनिष्ट विचारांचा नायनाट करण्यांत येई.

२३ ऑक्टोबर १९५१ रोजी केलेल्या एका भाषणांत माओ म्हणाला—" लोकशाही सुधारणा घडवून आणावयाच्या असल्यास समाजांतील बुद्धिमान लोकांच्या मनाची घडण बदलली पाहिजे. त्यांच्या विचारांना नवी दिशा दाखविली पाहिजे. " हें परिवर्तन पांच मार्गांनीं घडविण्यांत आलें. टीका आणि आत्मनिरीक्षण हा पहिला मार्ग या बाबतींत चाऊ एन् लाय यानें पुढाकार घेतला होता. मित्र आणि शत्रू यांतील भेद कळणें प्रतिगामी कल्पनांना झिडकारणें हा दुसरा मार्ग. पेकिंगचा महापौर पेंग चेन यानें या विभागाची जबाबदारी उचलली होती. कम्युनिझम आणि चीनची अर्थव्यवस्था हे या विचारसरणींतील अनुक्रमें ४ था व ५ वा प्रकार. प्रत्येक व्यक्तीनें आत्मनिरीक्षण करावें आणि त्यापासून निघणारे निष्कर्ष तपासून घ्यावें हा शेवटचा मार्ग होय.

या मार्गानें विचारांची वाटचाल सुरू झाल्यावर प्राध्यापक, लेखक व इतर बुद्धिवादी लोक यांच्या विचारांत पुष्कळच क्रांति झाली. ऑक्स्फर्ड येथें घेतलेलें सर्व शिक्षण विसरून जाण्याचा प्रयत्न करणारा एक प्राध्यापक मला या सुमारास भेटला. चीनचें तत्वज्ञान हें जुनाट व बुरसलेलें आहे असें तत्वज्ञानाच्या दोन प्राध्यापकांचें मत झालें. त्यांनीं आपलें पूर्वीचें सर्व लेखन व विचार चुकीचें आहेत असें जाहीरपणें सांगितलें व कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला.

चीनमधील जनतेला कितपत बौद्धिक स्वातंत्र्य आहे असा एका चिनी कवीला मीं प्रश्न केला. तो म्हणाला, " कामगार, शेतकरी व सैनिक यांस उपयोगीं पडेल अशा प्रकारचें वक्तव्य करण्यास चिनी सैनिकांना पूर्ण स्वातंत्र्य आहे.

चीनमधील जनता विद्यापीठांत या मतप्रणालीचें प्रस्थ खूपच वाढलें होतें. या विद्यापीठाचा कुलपति वु यू चँग हा चीनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या

कार्यकारी मंडळाचा सभासद आहे. हें विद्यापीठ १९५० मध्यें स्थापन झालें. या विद्यापीठांतील २८०० विद्यार्थ्यांपैकीं २००० विद्यार्थ्यांची सांस्कृतिक पातळी खालावलेली होती व त्यासाठीं त्यांना एक वर्षाचा खास अभ्यासक्रम देण्यांत आला होता. मार्क्सवाद हीच आधुनिक चीनची संस्कृति मानली जाई. आणि ही संस्कृति या विद्यार्थ्यांना आत्मसात करतां न आल्यामुळें त्यांना येथें पाठविण्यांत आलें होतें. या दोन हजार विद्यार्थ्यांपैकीं ७१.७ टक्के विद्यार्थी अनुभवी सरकारी नौकर होते हें ध्यानांत घेण्याजोगें आहे.

तात्विक व व्यावहारिक अभ्यास हें या अभ्यासक्रमाचें वैशिष्ट्य होतें. अर्थशास्त्र, अर्थनीति, बँकेचे कारभार, व्यापार, सहकार, कारखान्यांची व्यवस्था आणि राजनीति हे विषय येथें शिकवले जात खरे पण एकूण वेळेपैकीं ७० टक्के वेळ क्रियाशील कार्यक्रमांत जाई. संपूर्ण अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वरील विषयाखेरीज, अर्थशास्त्रीय व्यवस्था, कायदा व रशियन भाषा हे विषय अधिक शिकावे लागत. शैक्षणिक संशोधन या नांवाचा येथें आणखी एक स्वतंत्र विभाग होता या विभागाचे सदतीस गट होते. शैक्षणिक विषयांचें संशोधन करणें, मार्क्सवाद व माओवाद यांचें अध्ययन करणें व शिक्षकांवर नजर ठेवणें हें या विभागाचें काम असे.

आम्हीं ज्यावेळीं विद्यापीठाला भेट देण्यास गेलों त्यावेळीं अपेक्षेप्रमाणें कांहीं निवडक विद्यार्थीच आमच्या नजरेला पडले. आम्हांला त्यांच्या दैनंदिन्या दाखविण्यांत आल्या. या दैनंदिन्या इतरांनीं वाचावयाच्या व त्यावर चर्चा करावयाची असा प्रघात असल्यानें त्या दडपणाखालीं लिहिलेल्या असत.

शिक्षण, शिक्षण साहित्य व क्रमिक पुस्तकें यांचा येथें अभाव होता. जुनीं क्रमिक पुस्तकें बाद झाल्यामुळें विद्यार्थ्यांना आपल्या टिपणांवरच अवलंबून रहावें लागे. अध्यापकांपैकीं कांहींजणांनीं रशियांत शिक्षण घेतलें होतें. त्यांच्या टिपणांच्या प्रती देशभर पाठविण्यांत येत. शिक्षणाचीं सूत्रें ज्ञानी लोकांच्याऐवजीं राजकीय लोकांच्या हातीं असत. मुकडेन येथील वैद्यकीय कॉलेजच्या प्राचार्यांचें शिक्षण अर्धवटच राहिलें होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 27224 वि:
क्रमांक ......... नों: दि:



मी आणखी पुष्कळ विद्यापीठें पाहिली. राज्यकारभारास व कारखान्यास उपयोगी पडेल असेंच शिक्षण सर्वत्र देण्यांत येत आहे. पूर्वी या विद्यापीठांत ज्ञानाचे मुक्तद्वार उघडलेलें असे. आज मात्र अमेरिका विरोधी निदर्शनें व मोर्चें काढण्यांत विद्यार्थ्यांचे अनेक दिवस जातात.

नॅनकिंग येथील एका स्त्रियांच्या कॉलेजांत मिस वू या नांवाची एक प्राध्यापिका होती. ती देखणी, हुशार व विद्यार्थिप्रिय होती. आम्ही तिला भेटण्याचा प्रयत्न केला पण ती शांघाय येथें गेल्याचें आम्हांस कळलें. शांघाय येथे ती आमच्याशीं मोजकेच बोलली तिनें आत्महत्या केल्याचें कांहीं दिवसांनीं आम्हांला समजलें.

जीवनशास्त्राच्या एका प्राध्यापकालाहि जीव देणें भाग पडलें. एकाच वेळीं दोन कॉलेजांत दोन शिकवून दोनहि ठिकाणचा पगार घेतल्याचा त्याच्यावर आरोप होता. त्याच्या या कृत्याबद्दल वर्तमानपत्रांत कडक टीका झाली होती.

चीनमधील शाळा कॉलेजांमधील अभ्यासक्रमाची सुरुवात मार्क्सवादापासून होते व माओवादाच्या अध्ययनानंतर शिक्षणक्रम पुरा होतो. शिक्षणक्रम पुरा होतांच ही पोरें सरकारीं नोकरींत शिरतात. आपण कोणता शिक्षणक्रम घ्यावा हें ठरविण्याचा विद्यार्थ्यांना अधिकार नसतो. साक्षरतेचें प्रमाण अल्प असल्यानें हें घडतें.

चीनमधील सर्व शिक्षण फुकट होतें व सध्यां आहे. एकंदर शिक्षणाची पातळी खालवलेलीच आहे. दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठींच केवळ शिक्षणाचा उपयोग केला जातो. मोठमोठ्या शास्त्रज्ञांनाही डी. डी. टी. तयार करण्यासाठीं संशोधन करावें लागतें. निरनिराळ्या परिभाषिक संज्ञांना चिनी शब्द तयार करण्याचें काम चालू आहेच.

सिॲंगाकिंग येथें अणुसंशोधन चालू असल्याचें मला समजलें. एक ब्रिटिश शास्त्रज्ञ हें काम करीत आहे अशी बातमी आहे. पण या बातम्यांत फारसें तथ्य नाहीं कारण चीनमध्यें खऱ्या अर्थानें अजून शिक्षणाचा फारसा प्रचार झालेला नाहीं.

आमच्या बरोबर अललेल्या एका दुभाषी बाईचें न्यूयॉर्कमध्यें शिक्षण झालेलें होतें. परंतु ती परदेशांत हिंडून आली आहे हें आम्हांस कितीतरी दिवसांनीं कळलें. अमेरिकेंतील न्यूयॉर्क येथें ती होती. त्याबद्दल बोलतांना ती म्हणाली—" मला त्या शहराचा तिटकारा वाटत असे. नानकिंग येथें तिचे आईवडील रहात होते. आमच्या बरोबर श्री. विजयालक्ष्मी पंडित होत्या, आम्हीं नॅनकिंगला पोंहोचल्यावर तिला घरीं जाऊन आपल्या आईबाडिलांस भेटण्यास सांगितलें. ती परत येईपर्यंत आम्हीं कोठेंही जाणार नाहीं असें कबूल केलें. पण ती आम्हांला सोडण्यास तयार होईना. "

आमच्या दिमतीस दिलेल्या सर्व दुभाषांत आमच्याशीं आपलेपणानें असें कोणीच वागत नसे. आम्हीं तेथून निघतांना त्यांच्यापैकीं एक मात्र आमच्याजवळ आला. आणि भरल्याडोळ्यांनीं त्यानें आम्हांस निरोप दिला. बरं झालं. त्याला कोणा चिनी अधिकाऱ्यानें पाहिलें नाहीं. नाहींतर त्याची गच्छंतीच व्हायची.

चँग नांवाच्या आमच्या एका दुभाषाला चांगलं इंग्रजी येत असे. थोडेसं फ्रेंचही तो बोलूं शके. त्याच्या बोलण्यांत विनोद नसे, नी बहुधा भावना नांवाची वस्तु त्याला अज्ञात होती. चीनमधील आमच्या वास्तव्याचा तो शेवटचा दिवस होता. खूप उकडत होतं नी डांसही खूप झाले होते. हॉटेल मोडकळीस आलेलें होतें. नी रात्रीं कोणालाच झोंप आली नव्हती. सकाळीं आम्हीं कंटाळलेल्या चेहऱ्यानें न्याहारीसाठीं आलों. आमच्यांतील एकजण जरा विनोदी होता. तो म्हणाला— "काल रात्रीं डोळ्याला डोळा लागला नाहीं. रात्रभर डांसांनीं माझं रक्त शोधून घेतलें. चँग, ते डांस म्हणजे जणूं कांहीं जमीनदारच. " यावेळीं चीनमध्यें जमीनदार असे नव्हतेच म्हणून चँग उसळला नी म्हणाला— " ते जमीनदार नव्हते. आक्रमक अमेरिकन साम्राज्यवादी असतील. "

देशाला आपलें आयुष्य वाहिलेले कितीतरी तरुण आम्हांला चीनमध्यें भेटले त्यापैकीं पुष्कळसे परदेशांतून शिक्षण घेऊन आलेले असून पोटांपुरतें वेतन घेऊन कष्टाचें जिणें जगत आहेत चीनमधील कम्यूनिझम

म्हणजे बलिदान करायला लावणारा एक धर्मपंथच म्हणाना. पण इतकं असूनहि हे तरुण बेजबाबदार किंवा उच्छृंखल नव्हते. कर्तव्यप्राप्तीचें समाधान अथवा निराशेचें दुःख त्यांना माहीत नव्हतें. आपला देश आणि त्या देशाचें तत्वज्ञान व्यक्त करणें आणि त्याच्या विरुद्ध असलेल्यांवर लक्ष ठेवावयाचें एवढेंच त्यांना आशास्थान होतें.

प्रौढ शिक्षणाबाबत मात्र चीननें आघाडी मारली आहे. चिनी भाषा मूळची कठीण. पण ती सोपी करण्यांत आली. आणि ८००।१००० शब्दांचा वापर करणारी वृत्तपत्रें आणि त्यांत आपल्या देशाची दिलेली माहिती लोक मोठ्या आवडीनं वाचूं लागले. सैनिकही साक्षर वाचक बनले. विद्यार्थी दुकानदार वगैरेंनीं जनतेस शिक्षण देण्यास सुरुवात केली. हें शिक्षण दररोज दोन तास चाले. ज्ञानार्जनाचा लोकांना अभिमान वाटूं लागला.

सर्व समाजाचा बुद्धिपालट करणें हें एक कठीण काम आहे. या प्रकाराशी विरोध असूनहि देशाची सेवा करण्याचा हा एक मार्ग आहे असें विद्वानांनीं मानलें आहे. आपल्या मातृभूमीशीं मनाविरुद्ध कां होईना समरस होणारी चीन सारखीं राष्ट्रें दुर्लभच होत.

चीनमधील सर्व युवक राष्ट्राच्या उद्धारासाठी आज झटत आहेत. कम्युनिझमचें तत्वज्ञान आणि त्याचें आचरण सर्वत्र होत आहे. एका इंग्रज धर्मगुरूनं म्हटलं आहे "मीं चीनमध्यें गेलीं अठ्ठावीस वर्षे रहात आहे. पण आजच्यासारखीं ज्ञानलालसा मीं आजवर पाहिली नाही. प्रौढांसाठीं आणि मुलांसाठीं ठिकठिकाणीं साक्षरतेचे वर्ग चालविण्यांत येत आहेत."

महत्त्वाकांक्षेनं प्रेरित झालेल्या तरुणांच्या टोळ्या एकसारख्या हिंडत असतात. आपलं भविष्य उज्वल होईल असें त्याना वाटतें. पण चीनला खरें-खुरें स्वातंत्र्य मिळालें तरच त्या भविष्यकाळाचा उपयोग !

* * *

कम्युनिस्ट चिनी सरकारनें लक्षावधि लोकांना जीवनांतून उठवलें असा त्या सरकारवर लोकशाही वृत्तपत्रें आरोप करतात. यादवी युद्धांत अनेक मानवी जीव धारातीर्थीं पडले हें खरं आहे. जनता मुक्तिफौजेनें तीन वर्षांत एकोणसाठ लक्ष प्रतिगामी विरोधकांचा निकाल लावला अशी माओ त्से तुंगनें कबुली दिली आहे. माओ पुढें म्हणाला—" अजून सुमारें पंधरा लाख विरोधी लोक शिल्लक आहेत. त्यांचीही थोड्याच काळांत व्यवस्था लावण्यांत येईल." त्यांचीही १९५१ मध्यें व्यवस्था लावण्यांत आली.

१९५१ मध्यें मी पेकिंगमध्यें होतों. कँटनमध्यें ६७६ दहशतवाद्यांची चौकशी चालू आहे असें त्यावेळीं मीं वृत्तपत्रांत वाचलें होतें. त्याच वेळीं निहुआ येथें २३४ लोकांवर याच कारणासाठीं खटले भरण्यांत आले होते. या खटल्यांच्या वृत्तपत्रांत त्रोटक बातम्या येत असत. त्यामुळें यासंबंधींची अधिक माहिती मिळणें मला कठिण झालें होतें. मिळतील तेवढ्या गप्पा ऐकावयाच्या व त्यांतून माहिती मिळवावयाची असें मीं ठरविलें.

चँग कै शेकचा पाडाव झाल्यानंतर त्याच्या फौजा चीनमध्यें इतस्ततः विखुरल्या गेल्या. त्यांनी आपलीं शस्त्रास्त्रें लपवून ठेविलीं होतीं. चीनमध्यें गुप्त मंडळें पुष्कळच होतीं. त्यांचें या फौजेला सहकार्य मिळालें. जमीन सुधार कायद्यानें असंतुष्ट झालेलें दक्षिण चीनमधील जमीनदार त्यांना सामील झाले. चीनमध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्यानंतर त्या सरकारनें एक जाहिरनामा काढला. चँगच्या फौजेंत जे नागरिक सामील होते त्यांनीं आपलीं नांवें सरकारांत कळवावीं असें त्या जाहीरनाम्यांत म्हटलें होतें. त्यांनी असें केल्यासच त्यांची गय करण्याचें सरकारनें मान्य केलें होतें. ज्यांनीं अशा प्रकारें नांवें नोंवविली नव्हती त्यांची धरपकड करण्यांत आली. जमीनसुधार कायदा जसजसा जारी होऊं लागला तसतसे जमीनदार व त्यांचे लोक यांनी विरोध

करण्यास सुरुवात केली. एकट्या शांघायमध्यें तीन ते पांच हजार लोक पकडून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यांत आल्या असें मला कळलें.

इ. स. १९४९ मध्यें माओनें लोकसेनेची संघटना करण्यास सुरुवात केली. लोकरक्षक व लोकन्यायालयें यांचीही स्थापना झाली. अशी व्यवस्था सरकारनें सुरू केल्यास वर्गकलह निर्माण होतो असें माओचें मत होतें. इतर लोकांशीं सामोपचाराचें धोरण स्वीकारण्यास त्याने नकार दिला. राज्य-द्रोही माणसांशीं उदारपणानें वागणें इष्ट नाहीं असें त्यानें सांगितलें. लोक-सत्ताक विरोधी लोकांचा नायनाट करण्याचेंच त्यांनें ठरविलें होतें असें दिसतें. मृत्यू अथवा सक्तमजुरी हे दोनच मार्ग अशा लोकांच्या बाबतींत आचरावयाचे असें ठरविण्यांत आलें. अशा लोकांना जमिनी देऊन त्यांना काम करावयास लावावयाचें व सुधारण्याची संधि द्यावयाची असें सरकारनें ठरविलें.

वर उलेखिलेल्या कँटन येथील खटल्यांत २२ लोकांना ताबडतोब फांशी देण्यांत आलें. ११ लोकांची फाशीं दोन वर्षें लांबणीवर टांकण्यांत आली, १६ लोकांस मुक्त करण्यांत आलें आणि ६२७ लोकांस स्थानबद्धतेंत ठेवण्यांत आलें.

या खटल्याची सर्व सूत्रें पोलिस खात्याच्या हातीं होतीं. पुरावा गोळा करणें, लोकांकडून कबुली जबाब येणें व खटल्याची व्यवस्था करणें यांची व्यवस्था त्यांजकडे होती. हे खटले जाहीररीत्या चालविण्यांत आले. साक्षी-दारांनीं साक्षी दिल्या. या खटल्यांतील आरोपीस बचावाची संधि देण्यांत आली नाहीं. साक्षीदारांनीं दिलेला पुरावा मान्य अथवा अमान्य करणें एव-ढेंच ते करूं शकत. साक्षीदाराची उलट तपासणी करणें अथवा वकिलामार्फत बचाव करणें यास परवानगी नव्हती. जनतेंत भीति आणि आज्ञाधारक-पणा निर्माण करण्यास जाहीर खटल्यासारखें प्रचाराचें साधन नाहीं.

सक्तमजुरीच्या शिक्षा झालेल्यांस एकाठिकाणीं स्थानबद्ध करण्यांत आलें. अशा ठिकाणांस ‘ मजुरीच्या द्वारां सुधार मंडळ ’ असें नांव देण्यांत आलें होतें.

अशा तऱ्हेच्या एका ठिकाणचें एका चिनी वृत्तपत्रांत वर्णन आलें होतें. त्याचें मीं भाषांतर करून घेतलें होतें. तें खालीलप्रमाणें आहे.

" राज्य द्रोह्यांस सुधारण्यासाठीं सुमारें एक वर्षापूर्वी हें ठिकाण सुरू करण्यांत आलें. आर्थिक दृष्टया तर हा प्रयोग यशस्वी झालाच पण काम केल्यानें कैद्यांच्या मनांतील राज्यविरोधी विचार नाहींसे झाल्यामुळें राजकीय दृष्टयाही हा प्रयोग सफल झाला. अनेक कैद्यांना आपल्या पूर्वीच्या वर्तनाबद्दल पश्चाताप वाटत असून आपल्या कामाशीं ते समरस झालेले: आहेत. हें मंडळ जेव्हां सुरू झालें त्यावेळीं तेथील जमीन पडीक असून तेथें कोणीही रहात नव्हतें. आतां या ठिकाणीं आठ खेडी तयार झालीं असून २५०० खोल्या बांधण्यांत आल्या आहेत. (एका खोलींत चार माणसांची झोंपण्याची सोय होत असल्यानें या तुरुंगांत एकूण १०,००० कैदी असावेत असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाहीं. ). एक मोठा कालवा खणण्यांत आला आहे. वीजेच्या साहाय्यानें सुमारें आठ हजार एकर जमीन लागवडीस आणण्यांत आली आहे. टेलिफोन, रुग्णालय, वाहातुक, रसायनशाळा, विटांचा कारखाना पिठाची गिरणी वगैरे कितीतरी उद्योग धंदे येथें आतां सुरू झालेले आहेत.

हे कैदी ज्यावेळीं तेथें आले त्यावेळी त्यांच्यापैकीं पुष्कळांना कामाची सवय नव्हती व ज्ञानही नव्हतें. काम करणें हें त्यांपैकीं बहुतेकांना कमीपणाचें अथवा भीतिदायक वाटे. कांहींनीं संप पुकारण्याची वेळ आणली. माती वाहून नेतांना ते धेरी आल्याचें सोंग करीत व बसत. नैसर्गिक विधींना अधिक वेळ लावीत. कांहींनीं काम करण्याचें उघडपणें नाकारलें, कांहींनीं यंत्राची मोडतोड केली तर कित्येकांनीं इतर कैद्यांस पळून जाण्यास मदत केली. पण हळू हळू त्यांच्या विचारांत परिवर्तन झाल्याचें आढळून आलें. आतां बहुतेक कैद्यांनीं आपले गुन्हे कबूल केले. स्वतःची सुधारणा व्हावी अशी त्यांनीं इच्छा व्यक्त केली आहे. शिक्षेची मुदत संपल्यानंतरही कित्येकजण घरीं परतण्यास तयार नाहींत. येथेंच राहून काम करणें पसंत करतात.

हें परिवर्तन कसें घडून आलें ? काम करवून घेऊन त्याबरोबर राजकीय मतपरिवर्तन करविणें हें या प्रश्नाचें उत्तर आहे. त्यांच्या मनाची घडण बदलविणें सोपें नव्हतें. खूप काम करवून घेतल्यानंतरच तें साध्य झालें. लोकराज्याची तत्त्वें या कैद्यांना प्रथम जेव्हां सांगण्यांत आली आणि खूप काम करवून घेऊन त्या द्वारां त्यांचें मतपरिवर्तन घडवून आणण्यांत येईल असें ज्यावेळीं त्यांस कळलें त्यावेळीं त्यांनीं प्रथम पुष्कळ विरोध केला. कित्येक रडूं लागले, कित्येकांनीं अन्नसत्याग्रह पुकारला, कित्येकांनीं आपलीं मृत्युपत्रें खरडली. कित्येकांनीं पळून जाण्याचा अथवा आत्महत्येचा प्रयत्न केला.

समाजाची सुधारणा कशी झाली, श्रमदानानेंच जगाची उत्पत्ति कशी झाली, हें त्यांना समजावून सांगण्यांत आलें. कैद्यांचा श्रमदानाबद्दलचा तिरस्कार घालविण्यांत आला. परंतु काम करीत असतांनाही त्यांचे विचारपरिवर्तन लगेच झालें नाहीं. कोरियामध्यें अमेरिकन सैन्य उतरलें नी चिनी सैन्याला कांहीं काळ माघार घ्यावी लागली. झालें, आतां अमेरिकनांचा जय होणार व चँग कै शेक पुन्हां सत्तारूढ होणार असें या कैद्यांस वाटूं लागलें.

एवढे प्रयत्न करून सुद्धां कांहीं कैदी सुधारण्याच्या पलीकडेच आहेत. त्यांच्यापैकीं कांहींजण अजून आडमुठेच असून कामांत व शिस्तींत व्यत्यय आणण्याचे त्यांचे प्रयत्न चालूच आहेत. अशा कैद्यांना शिक्षा आणि पारितोषिक यांतील फरक समजावून सांगावा लागतो. शिक्षा व शिक्षण हे दोन्ही मार्ग त्यांच्या बाबतींत आचरावे लागतात. ज्या कैद्यांना कृतकृत्याबद्दल पश्चाताप वाटतो व ज्यांना सुधारण्याची इच्छा आहे त्यांच्या शिक्षेच्या मुदती कमी करण्यांत येतात. अशा प्रकारें सुमारें दोनशें कैद्यांना मुक्त करण्यांत आलें आहे. त्यापैकीं चाळीस लोकांना मूदतींपूर्वीच सोडण्यांत आलें. ज्यांच्यांत सुधारणा दिसून आलेली आहे, त्यांना सवलती देण्यांत आल्या आहेत. जे कैदी आपलें काम करीत नाहींत, आपली सुधारणा घडवून आणूं इच्छित नाहींत, कामांत बिघाड करतात, पळून जाण्याचा प्रयत्न करतात. त्यांना योग्य शिक्षा करण्यांत येतात. तू शिन चिन नांवाचा एक

गुप्त हेर आपल्या सहा सहकाऱ्यांसह पळून जातांना सांपडला. त्याला इतर कैद्यांच्या समोर गोळी घालून ठार मारण्यांत आलें."

आजच्या चीनमधील वृत्तपत्रशास्त्राचा हा एक अस्सल नमुना आहे. या मजकुरांतील विरोध, सक्तमजुरी व आत्महत्या यांचे उल्लेख सहज ध्यानांत येतील. चीनमधील सध्यांच्या वृत्तपत्रांत निर्भेळ बातम्या आढळून येत नाहींत. सरकारी प्रचाराची तीं केवळ माध्यमें आहेत.

वर नमूद केलेला मजकूर मीं मान्यही केला असता. पण तसें करण्यापूर्वी मला एखादें सुधारणामंडळ पहावयाची इच्छा होती. तसें मीं आमच्या दुभाषाला सांगितलेंही. पण तो गप्पच बसला. शांघायहून आम्ही कँटनला चाललों. होतों. एका स्टेशनवर सुमारें दोनशे कैद्यांची एक टोळी आम्हांला दिसली. त्यांच्या हातांत बेड्या होत्या आणि त्यांना कोठें तरी नेण्यांत येत होतें. आमची आगगाडी त्यांच्यापासून थोड्या अंतरावर थांबली. ही मंडळी कोण आहेत याची मी आमच्या बरोबरच्या एका अधिकाऱ्याजवळ चौकशी केली. 'पण समोर तर कांहींच दिसत नाहीं' असें त्यानें उत्तर दिलें त्या कैद्यांकडे मीं बोट दाखविलें तर 'असतील कदाचित' असें म्हणून तो गप्प बसला.

प्रचलित राज्पद्धतीविरुद्ध बंडाळी होण्याचा चीनमधील संभव कायमच आहे. कदाचित देशांतील विरोधकांचा नायनाट करण्यासाठीं तशा प्रकारचा प्रचार भडकपणें करण्यांत येतो. विरोध, मतभेद अथवा टीका ह्या गोष्टी राष्ट्रद्रोह समजण्यांत येतात. कम्युनिस्ट चीन धाक दाखवून लोकांची मांन्यता मिळवतो. कैद्यांचे छळ, रात्रींच्या रात्रीं लोक नाहींसे होणें, आत्महत्या, जाहीर खटले आणि सार्वजनिक हत्या या गोष्टी तेथें रोजच्या होऊन बसल्या आहेत.

मीं पेकिंगमध्यें असतांना असाच एक खटला चालू होता. तीन इटालियन, एक जर्मन, एक फ्रेंच, एक जपानी व एक चिनी असे त्या खटल्यांतील आरोपी होते. चिनी राज्यकर्त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केल्याचा त्यांजवर आरोप होता. २६ सप्टेंबर १९५० रोजी त्यांस अटक करण्यांत आली. त्यानंतर अकरा महिने त्यांची चौकशी चालू होती. अखेर १७ ऑगस्ट

१९५१ रोजीं त्याच्या खटल्याचा निकाल लागला. या खटल्याचें कागदपत्र माझ्या हातीं आले होते. ते पाहिल्यानंतर त्यांच्या खरेपणाबद्दल माझ्या मनांत शंका निर्माण झाली. एका पत्राअन्वयें एक आरोपी व अमेरिकेच्या वकिलातीतील लष्करी प्रमुख यांच्यांत संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. पत्र खालीलप्रमाणें होतें.

पेकिंग

२९ नोव्हेंबर १९४९.

प्रिय टोनी,

तूं आणि क्ष शुक्रवार २ डिसेंबर रोजीं दुपारीं पाऊण वाजतां माझ्या घरीं जेवावयास या. त्याच वेळीं मि. क्लब तेथें येणार आहे.

क्षला मीं स्वतंत्रपणें निमंत्रण न पाठविल्याबद्दल माझ्या वतीनें त्याची क्षमा माग.

तूं तुजजवळील मजकूर चिठ्ठीनें पाठवितोस. मला भीति वाटते. ही पद्धति ठीक आहे ना!

तुझ्या पोऱ्यानें त्यांतील एखादें पत्र जरी नेलें तरी गोंधळ होईल.

तूं पाठविलेला मजकूर मोलाचा आहे. तो पाहून मला आनंद वाटला.

तुझा

डेव्ह.

हें पत्र लिहिणाऱ्याची मातृभाषा इंग्रजी नसावी हें मीं लगेच ओळखलें. एखाद्या चिनी माणसानें बहुधा तें लिहिलें असावें. पण हें पत्र कोर्टांत हजर केलें गेल्यानें चीनमधील सर्व परकीय रहिवाशांवर शिंतोडे उडविले गेले. या आरोपींत एक पाद्री गोंवण्यांत आल्यानें त्यांच्यावर ठपका आला. वास्तविक रीत्या चीनमध्यें पाद्यांनीं बहुमोल कामगिरी बजावली होती. त्यांच्या एखाद्या चिठ्ठीनें कोर्टांतील कामें होत असत. पण आतां त्यांच्या सर्व चळ-

वळी राष्ट्रद्रोही समजल्या जाऊं लागल्या. कम्युनिझम हा धर्मविरोधी असल्यानें कम्युनिझमला पाद्रयांनीं विरोध करावा असें पाद्रयाचें मत असल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यांत आला. हें सत्य नव्हतें, पण ख्रिश्चन लोकांचा छळ करण्यासाठीं कम्युनिस्टांच्या हातीं हें मोठेंच कोलीत मिळालें.

चीनमध्यें कांहीं ख्रिश्चन भिक्षुणींनीं अनाथालयें चालविलीं होतीं. त्यांच्यावर अनेक आरोप ठेवण्यांत आले. एकदां या आश्रमांतील मोठ्या मुलांनीं या भिक्षुणींच्या विरुद्ध साक्षी दिल्या पण लहान मुलांनीं त्यांच्याबद्दल प्रेम व आदर यांचेच उद्‌गार काढले. या गोष्टी ऐकून मला आश्चर्य वाटलें. विशिष्ट जमातींबद्दल चीड उत्पन्न करण्याचा हा बुद्धिपुरःसर मार्ग होय. असेंहि याबाबतींत माझें मत झालें.

चीनमध्यें आज सुमारें सत्तर परकीय लोक कैदेंत आहेत. त्यांच्यावरील आरोप त्यांस सांगण्यांत आलेले नाहींत. त्यांची चौकशी निःपक्षपाती होणार नाहीं कीं त्यांना बचावाची संधीहि देण्यांत येणार नाहीं.

चीनमधील लोकसत्तेला जो कोणी विरोध करील त्यास चिरडून टाकावें असें चिनी घटनेचें ७ वें कलम म्हणतें. पण अशा खटल्यांची पूर्ण चौकशी झाली पाहिजे. अशा एका खटल्याची मला माहिती मिळाली. विजेच्या कारखान्यांतील एका कामगारावर राष्ट्रद्रोहाचा आरोप ठेवण्यांत आला. त्याच्या विरुद्ध असलेल्या कांहीं सहकाऱ्यांना त्याच्या विरुद्ध साक्ष देण्यास सांगण्यांत आलें. अमेरिकेचा रेडियो ऐकणें एवढ्या आरोपावर त्याला शिक्षा झाली.

राष्ट्रद्रोही समजल्या जाणाऱ्यांची चीनमध्यें अशी दशा होते. पण सर्वसाधारण माणसाची स्थिति काय होत असेल ? त्याच्या बाबतींत कायद्याची अंमलबजावणी होते काय ? प्रत्येक नागरिकांच्या मूलभूत हक्कांचें रक्षण होणें हें लोकशाहीचें पहिलें तत्त्व आहे. पण चीनमध्यें नागरिकांच्या व्यक्तित्वाला किंमत नाहीं. न्यायखातें कार्यकारी खात्यांच्या हातचें बाहुलें आहे. सर्वश्रेष्ठ न्यायालयांतील न्यायाधीश हा सरकारी नोकर असतो आणि सरकारचें राज-

कीय उद्दिष्ट साध्य करणें हेंच त्याचें काम असतें. कायद्याचें पालन न्यायाच्या तराजूनें होत नाहीं, राजकारणाच्या तागडीनें होतें.

न्यायाधिशांना कायद्याचें ज्ञान असलेंच पाहिजे असें नाहीं. पेकिंग वगैरे ठिकाणीं मीं कोर्टांतील जीं कामें पाहिलीं त्यावरून माझ्या वरील मतास दुजोराच मिळाला. या न्यायाधिशांच्या राजसत्तेशीं असलेल्या एकनिष्ठतेवर सरकारचा विश्वास होता. सर्व साधारणपणें खटल्यांना लागू असलेले नियम या न्यायालयांना लागू नव्हते. तसेंच जुन्या खटल्यांचे आधार पहाण्याची त्यांस आवश्यकता नव्हती. त्यांजजवळ कायद्याचें ग्रंथ नव्हते. आरोपी अथवा फिर्यादी यांच्यातर्फे वकील नव्हते. न्यायाधीश, आरोपी ज्या मंडळाचा सभासद असेल त्या मंडळाचा एक प्रतिनिधि व एक कारकून एवढ्यांचें न्यायालय असे. पूर्वीचे सर्व कायदे आतां रद्द करण्यांत आले असून, विवाहाचा कायदा, ट्रेड युनियन कायदा, जमीन महसूल कायदा व नवचीनची घटना, एवढेच सध्यां कायद्याचें ग्रंथ आहेत. खटल्याच्या वेळीं कोर्टांत जे प्रेक्षक हजर असतील, त्यांना केव्हांही कोर्टाच्या कामकाजांत भाग घेतां येतो, साक्षीदार म्हणून केव्हांही पुढें येतां येतें, नवे नवे आरोप करतां येतात व आरोपीस अधिक शिक्षा करावी अशी मागणी करतां येते.

पेकिंग येथील न्यायालयांत घटस्फोटाचा एक खटला ऐकण्यासाठीं मी गेलो होतों. आपल्या नवऱ्यानें आपणांस वाईट प्रकारें वागविल्यामुळें आपणांस घटस्फोट मिळावा असा एका बाईचा अर्ज होता. तिला तीन मुलें होतीं. आरोपीनें आपल्या वागणुकीचा फेर विचार करावा असें कोर्टानें सुचविलें "तुझ्या जुन्या कल्पना सोडून दे. तिला वाईट रीतीनें वागविण्याऐवजी तूं तिला शिक्षण दिलें पाहिजेस व तिची उन्नति केली पाहिजेस असें कोर्टानें आरोपी पतीस सांगितलें." हा खटला दोघांनींही काढून घेतला.

नॅनकिंगमध्यें एक खुनाचा खटला चालू होता. सासूनें आपल्या सुनेला आत्महत्या करण्यास भाग पाडलें अशी हकीगत होती. आपल्या बायकोच्या आहारीं गेल्याचा सासऱ्यावर आरोप होता. आणखी एक दोन नातेवाईकही या खटल्यांत गोंवण्यांत आले होते. खटला खळबळजनक होता.

गांवचे पुष्कळ लोक खटल्याचें काम पहाण्यास आले होते. न्यायाधिशानें आरोप वाचून दाखविला. त्यानंतर प्रेक्षकांपैकीं कांहीं लोक साक्षी देण्यास पुढें आले. सुनेला मिळणाऱ्या गैर वागणुकीच्या कांहीं हकीकती त्यांनीं सांगितल्या. आरोपींना या साक्षीदारांची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यांत आली नाहीं. अखेर सासऱ्याचा धीर खचला व आपल्या बायकोनें सुनेस छळलें असें त्यानें कबूल केलें. लोकशाही स्त्रीसंघटनेच्या एका प्रतिनिधीनें सामाजिक सुधारणा, स्त्रियांचें स्थान व कुटुंबव्यवस्था यांचें महत्त्व कोर्टास पटवून दिले. अखेर न्यायाधीशानें सर्व आरोपीस सजा फर्माविली. सासूला १५ वर्षे व बाईलबुद्धेपणाबद्दल सासऱ्यास दोन वर्षे सजा फर्माविण्यांत आली.

शांघायमध्यें एका बाईवर आपल्या मोलकरणीचा खून केल्याच्या आरोपावरून खटला भरण्यांत आला. याच आरोपावरून चँग के शेकच्या कारकीर्दींत तिच्यावर खटला भरण्यांत आला होता व त्यांत ती निर्दोषी सुटली होती. पण तिच्यावर आतां पुन्हां खटला भरण्यांत आला. तिच्या शेजाऱ्यांनीं तिच्याविरुद्ध साक्षी दिल्या. तिचा मुलगा जपान्यांचा गुप्तहेर होता असेंही आरोपपत्रकांत म्हटलें होतें. ह्या आरोपाचा खुनाशी साक्षात् असा संबंध नव्हताच. याही खटल्यांत उलट तपासणी झाली नाहीं. आरोपी स्त्रीनें गुन्हा नाकबूल केला.

चीनमध्यें न्यायाधीश व सरकारी वकील या एकच भूमिका आहेत असें या खटल्यांवरून माझें मत झालें. आरोपीला आपला निर्दोषीपणा सिद्ध करणें अतिशय कठिण जातें.

* * *

## ३ : सॅन फॅन वू फॅन

चीनमध्यें एक मोठीच चळवळ निर्माण झाली होती. 'कायदेभंग करणारीं' अशीं सीलें मारलेलीं व बंद केलेलीं कित्येक दुकानें मीं पाहिलीं. कॅंटनच्या बाहेर ब्रिटिश वसाहत आहे तेथें एका लहानश्या दुकानासमोर बरेच लोक जमून आरडा ओरड करीत होते. आमच्या हॉटेलमधून मीं निघालों व आमच्या बरोबर सावलीप्रमाणें असणाऱ्या दुभाषाला घेऊन त्या घोळक्याशीं जाऊन पोहोंचलों दुकानदार आपल्या नोकरासमोर खालीं वाकून पाया पडत असल्याचें दृश्य मीं पाहिलें. चौकशी करतां ती एक सभा असल्याचें मला कळलें.

दुसऱ्या दिवशीं एका वृक्षाच्या छायेंत आणखी एक सभा मीं पाहिली. हातांत पुस्तकें व वह्या घेतलेले कांहीं तरुण व तरुणी चर्चा करीत होते. मीं त्यांच्या जवळ जाऊन सहज चौकशी केली. हे लोक शाळेंतील विद्यार्थी असून सॅन फॅन वू फॅन चळवळीचा अभ्यास करीत आहेत असें मला समजलें. लांचलुचपत, हुकुमशाही व नाश यासंबंधीं ही चर्चा होती. मीं विचारलें, "शाळेतील अभ्यास सोडून नाश या विषयांवर चर्चा करणें हा एक नाशच नव्हे काय ?" "सध्यां शाळा बंद आहे. नी शिवाय ही एक प्रकारची देशसेवाच आहे." असें कोणीतरी म्हणालें.

त्या दिवशीं कॅंटनमध्यें अशीं अनेक दृश्यें मीं पाहिलीं. शाळेंतील मुलें व मुली, कारखाने व दुकानें यांतील कामगार, ढोल बडवीत व निशाणें फडकावीत मोर्चे काढीत होते. कांहीं दुकानदारांनीं तर या प्रकारांस कंटाळून आत्महत्येचा मार्ग पत्करला.

या प्रकरणाची हकीकत अशी आहे कीं, इ. स. १९५१ मध्यें कांहीं लोकांच्या चळवळी विघातक असल्याचें आढळून आलें. त्यांना त्यांच्या पक्षांतून हांकलून देण्यांत आलें. त्याच वर्षाच्या एप्रिल महिन्यांत महसूल खात्यांतील अधिकाऱ्यांचा एक कट उघडकीस आला. सुमारें २१ अधिकाऱ्यांनी

कांहीं रकमेचा अपहार केला होता. हळूं हळूं अशी अनेक प्रकरणें उघडकीस येऊं लागली. हातीं आलेल्या सत्तेचा दुरुपयोग होत आहे असें आढळून येऊं लागलें. लोकांना या मार्गानें सुखासीन आयुष्य घालविण्याची इच्छा होऊं लागली.

कम्युनिस्ट पक्ष हा समाजांतील प्रतिष्ठित व निष्कलंक विभागाचा प्रतिनिधि आहे असें मानलें जातें. त्यांतील कार्यकर्ते मोठे नेकीचे व जबाबदार असतात असें मानलें जातें. पण त्यावेळच्या कम्युनिस्ट पक्षांत अशी परिस्थिती नव्हती. या प्रकाराला आळा घातलाच पाहिजे व कठोर प्रकारांनी कां होईना हे प्रकार बंद पाडले पाहिजेत असें कम्युनिस्ट पक्षांतील विचारवंतांस वाटूं लागलें. कम्युनिस्ट पक्षांतच शुद्धीकरणाची आवश्यकता भासूं लागली होती. काओ कांग हा त्यावेळीं कम्युनिस्ट पक्षाचा मोठा नेता होता. तो अत्यंत क्रूर पण प्रामाणिक होता. त्यानें व माओनें आपल्या भाषणांत लोकांना प्रामाणिकपणें वागण्याचा उपदेश केला होता. व त्याप्रमाणें कम्युनिस्ट पक्षांतील लोकांपैकीं अप्रामाणिक व लांचखाऊ सभासदांची हकालपट्टी करण्यास सुरवात झाली होती. या चळवळीचें नांव सॅन फॅन वू फॅन असें ठेवण्यांत आलें व सरकारकडूनच कार्य सुरूं झालें. मोठमोठ्या अधिकाऱ्यांकडून त्यांच्या गुन्ह्यासंबंधीं अधिक्षेप व कबुलीजबाब घेण्यांत आले. आणि त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या या बाबतींत साक्षी व निवेदनें घेण्यांत आली. चार महिने हें चौकशीचें सत्र चालूं होतें. खात्यानिहाय चौकशा सुरू होत्या. यांपैकीं कांहीं आरोप तर हास्यास्पद होते. कायदा खात्याची मंत्री एक स्त्री होती. आपल्याला फुलें आवडत असल्यानें सरकारी खर्चानें आपण रोज फुलें आणून आपल्या टेबलावर ठेवतो अशी तिनें कबुली दिली. माओ त्से तुंग व चाउ एन् लाय यांनींहि आपल्या पूर्वीच्या गुन्ह्यांबद्दल स्वतःवर टीका केली. चौकशी पुरी झाली आणि १६७० अधिकारी या बाबतींत दोषी आहेत असें उघडकीस आलें. ज्यांनीं आपले अपराध कबूल केले ते थोड्या शिक्षा अथवा दंड यांवर सुटले पण ज्यांनीं कबुलीजबाब देण्याचें नाकारलें, त्यांना फांशीपासून मोठमोठ्या दंडापर्यंत शिक्षा फर्माविण्यांत आल्या.

व्यापाऱ्यांना माहिती पुरविण्याबद्दल बँक ऑफ चायनामधील नोकरांस खूप पैसा लांच म्हणून मिळत असे. या गुन्ह्याबद्दल कांहीं आरोपींना देहांताच्या शिक्षा देण्यांत आल्या. सरकारची फसवणूक केल्याच्या आरोपावरून व्यापाऱ्यांनाही शिक्षा देण्यांत आल्या. या चक्रांतून सरकारी नोकरही सुटले नाहींत.

या खटल्याचा एक चित्रपट घेण्यांत आला होता तो शांघाय येथें आम्हीं पाहिला. चीनचा सरन्यायाधीश व अर्थमंत्रि हे न्यायाधीश म्हणून काम पहात होते. खटल्यांतील सात आरोपी पोलिसांच्या बंदोबस्ताखालीं कोर्टांत आणण्यांत आले. त्यांनीं आपलीं मस्तकें खालीं केलीं होतीं. प्रेक्षकांच्या समोर त्यांस उभें करण्यांत आलें होतें. राष्ट्रद्रोही गुन्हेगार असे फलक त्यांच्या अंगावर लावले होते. या आरोपींची छीथू करण्यास लोक टपलेले होतेच. सरकारतर्फें असें सांगण्यांत आलें कीं, आरोपींनीं एकूण साडेचार कोटी डॉलर्सची अफरातफर केली आहे. या रकमेंत दोन लक्ष ऐंशी हजार लोकांना वर्षभर पुरेल इतकें अन्न विकत घेतां आलें असतें. अमेरिकन साम्राज्यशाहीशीं लढण्यासाठीं ६६ विमानें या रकमेंतून खरेदी करतां आलीं असतीं. हे शद्ब ऐकतांच प्रेक्षकांनीं त्वेषाचे उद्‌गार काढले. फिर्यादीचा वकील पुढें म्हणाला. "अशा तऱ्हेनें जर लांचलुचपत वाढत गेली तर देशाच्या उन्नतीसाठीं लागणारें भांडवल मिळणार नाहीं. एवढ्या पैशांत प्रत्येकी दोन ते तीन हजार मजूर काम करीत असलेले कारखाने सुरू करतां येतील." यानंतर आरोपींचीं हिडीस कृत्यें कोर्टास सांगण्यांत आलीं. या भाषणास प्रेक्षकांकडून एकसारखा दुजोरा मिळत होता. हे प्रकार पूर्वनियोजित होते. कित्येक लोकांनीं आपापल्या घरून टेलिफोन करून आरोपींस देहांत शासन देण्यास कोर्टास विनंति केली.

कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीनुसार खटल्याचें काम अशाप्रकारें चाललें पाहिजे कीं शिक्षा देण्याच्यावेळीं लोकांना आरोपीबद्दल चीड निर्माण झाली पाहिजे. अशा खटल्यामुळें जनतेला दहशत बसली पाहिजे आणि अशा 'शत्रू' बद्दल जनतेच्या मनांत त्वेष निर्माण झाला पाहिजे, हें भाषण संपतांच आरोपींना देहांत शासन देण्यांत यावें अशी लोकांनीं मागणी केली. आरोपीवर नासकीं

अंडी, टोमॅटो व दगड फेंकण्यांत आले. आरोपी बिचारे खालीं मान घालून बसले होते. आरोपींना प्रश्न विचारण्यांत आलें नाहींत अथवा त्यांचें म्हणणेंही ऐकून घेण्यांत आलें नाहीं. दोघांस देहांतशासन व चौघांस निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा फर्माविण्यांत आल्या. एकाची मुक्तता झाली. तो लगेच प्रेक्षकांत जाऊन बसला व आपल्या माजी सहकाऱ्यांचा धिःकार करण्यास त्यानें सुरवात केली.

अशाप्रकारें दहशतीचें साम्राज्य सुरू झालें. असे खटले अनेक ठिकाणीं चालू झाले आरोपांच्या खरेखोटेपणाचा विचार न करतां जबर शिक्षा ठोठावण्यांत येऊं लागल्या. प्रतिगामी जमीन मालकांच्या मुलींशीं लग्न करणें हा सुद्धां अपराध समजला जाऊं लागला. परकीय लोकांवर भाव मारण्यासाठीं भारी कपडे वापरून उधळपट्टी केल्याचा एका अधिकाऱ्यावर आरोप ठेवण्यांत आला. आपल्या मैत्रिणीला एका नृत्याच्या कार्यक्रमाहून घरीं पोंहोंचविण्यासाठीं गाडीचा दुरुपयोग केला असा एका अधिकाऱ्यावर ठपका ठेवण्यांत आला.

यामुळें साऱ्या चीनच्या राज्यव्यवस्थेस हादरे बसले. कचेऱ्यांतून कोणी कामेंच करीना. कोणताही सरकारी अधिकारी निर्णय घेईना. त्यामुळें प्रकरणें तुंबूं लागलीं. सगळीकडे गोंधळ माजूं लागला.

या पद्धतीचे परिणाम दूरगामी ठरले. कम्युनिस्टांनीं आपल्या हातीं सत्ता घेतली व चीनमध्यें त्या पक्षाच्या हुकुमशाहीस सुरुवात झाली. वर्तमानपत्रें, रेडियो, सिनेमा, खटले, मिरवणुका, सभा, घोषणा वगैरेंना ऊत आला. प्रत्येकानें दुसऱ्यावर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवावें असा प्रकार सुरू झाला. व्यापाऱ्यांनींही या शुद्धीकरणाच्या चळवळींत भाग घेतला. वू फॅन चळवळीच्या दृष्टीनें खालील पांच पापें अत्यंत भयानक होतीं. ( १ ) लांचलुचपत. ( २ ) सरकारी मालमत्ता चोरणें. ( ३ ) सरकारला फसविणें. ( ४ ) स्वार्थासाठीं सरकारच्या आर्थिक रहस्यांचा उपयोग करणें व ( ५ ) कर चुकविणें.

प्रत्येक कारखान्याला या पांच दिव्यांतून पार पडावें लागे. आपल्या सहकाऱ्यांची चौकशी करण्यासाठीं व्यावसायिकांनीं समित्या स्थापन केल्या. निरनिराळ्या विभागांत तपासनीस नेमण्यांत आले. दुकानांतील नोकर, मालकाची बायको ही मंडळीसुद्धां आरोपीविरुद्ध साक्ष देण्यासाठीं येऊं लागलीं.

दुर्मिळ वस्तूंच्या व्यापाऱ्याच्या बाबतींत घडलेली ही हकीगत आहे. क्रांतीच्या पूर्वी त्याच्या दुकानाचा लौकिक मोठा होता व जगभर त्याच्या शाखा होत्या. या शाखा जवळ जवळ स्वतंत्र होत्या. एक दिवस या दुकानच्या म्हाताऱ्या मालकावर एक नोटीस बजावण्यांत आली. त्याच्या सर्व शाखांचे हिशोब सादर करण्याचा व त्यावरील चुकविलेला कर भरण्याचा त्यास हुकूम फर्माविण्यांत आला. त्यानें याबाबतींतील आपली असमर्थतता व्यक्त केली पण त्यास तुरुंगांत टाकण्यांत आले व शहराच्या प्रमुख रस्त्यातून त्याची धिंड काढण्यांत आली. मी गुन्हेगार आहे अशी एक पाटी त्याच्या हातीं देण्यांत आली व एक महिन्याच्या आंत सर्व हिशोब न दिल्यास देहान्त शासन देण्यांत येईल असें त्यास सांगण्यांत आलें.

शांघायमधील व्यापाऱ्यानें एका कंपनीचे ८५ डॉलर्सचे शेअर घेतले होते. त्या कंपनीनें बेकायदेशीररीत्या पैसा कमावला असल्याची अफवा होती. अखेर त्या कंपनीवर जबरदस्त दंड बसविण्यांत आला. व कंपनीच्या फायद्यांत भागीदार झाल्याच्या आरोपावरून या व्यापाऱ्याकडे २८०० पौंडाची मागणी करण्यांत आली. ही रकम देण्यासाठीं त्याला होतें नव्हतें तें सर्व विकावें लागलें.

आपले दंड भरण्यासाठीं जवळ असलेले सोनें विकण्यासाठीं शांघाय येथील बँकेच्या समोर लोकांच्या रांगांच्या रांगा उभ्या असलेल्या मीं पाहिल्या आहेत. अखेर सरकारनें तें सोनें अनामत म्हणून ठेवून घेतलें. पण यामुळें सरकारच्या खजिन्यांत पुष्कळच भर पडली व जनता नागविली गेली. कित्येक व्यापाऱ्यांनीं पैसे भरणें अशक्य झाल्यामुळें अथवा मानानें जगणें अशक्य झाल्यामुळें आत्महत्या केल्या.

कँटनमध्यें अशाप्रकारें दररोज सुमारें पांच ते सहा लोक आत्महत्या करीत असें मी ऐकिलें.

प्रत्येक व्यापारी संस्थेला खालीलपैकीं एक शिफारसपत्र मिळे. ( १ ) कायदे पाळणारी ( २ ) कायदे पाळण्याचा प्रयत्न करणारी ( ३ ) बरेच कायदे पाळणारी ( ४ ) कायदे मोडणारी ( ५ ) पूर्णपणें कायद्याचा भंग करणारी. कंपनीचें वर्गीकरण जसें होईल त्या प्रमाणांत एक वर्षापासून जन्मठेप पर्यंतच्या शिक्षा देण्यांत येत.

टिएनस्टेन येथील अशा एका चौकशी समितीचा २३ एप्रिल १९५२ रोजीं प्रसिद्ध झालेला अहवाल पाहण्याजोगा आहे. त्यांतील खालील भाग पहा.

" या समितीनें एकूण चार हजार व्यापारी संस्थांची चौकशी केली. त्यापैकीं कायदे पाळणाऱ्या संस्था ४६०ः होत्या. २६७२ संस्थांनीं कायदे पाळण्याचा प्रयत्न केला. ८४ संस्था बऱ्याच अंशीं कायदे पाळणाऱ्या होत्या. कांहीं संस्थांची अजून तपासणी व्हावयाची आहे. त्यांनीं आपणहून जर कबुली जबाब दिले तर ठीक. नाहींतर त्यांनीं शिक्षा भोगावयास सिद्ध असलें पाहिजे "

वर दिलेली माहिती वानगीदाखल आहे. चीनच्या क्रांतीला प्रत्यक्ष साहाय्य करणाऱ्या, चँग कै शेकचा पाडाव करण्यास मदत करणाऱ्या अशा कितीतरी संस्था या कायद्याच्या वरवंट्याखालीं भरडल्या गेलेल्या आहेत. देशांतील एका पक्षानें आपल्या अत्याचांच्या बळावर बाकीच्या लोकांस नमविणें यातीलच हा प्रकार होय. जनतेला उठावणी देऊन जनतेचें मत अखेर प्रभावी ठरतें हें जाहीर करण्यासाठीं हे मार्ग अवलंबिण्यांत येत. वस्तुतः जनतेला यांतील कांहींच माहिती दिली जात नसे. पण जनतेच्या भावना एकदां चेतविल्या गेल्या कीं कांहींतरी करण्यांत जनतेला अत्यानंद होतो.

अर्थात अशा कबुलीजबाबांमुळें व्यक्तींचा जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलतो यांत शंका नाहीं.

स्वतःच्या गैरकृत्यांचा कबुलीजबाब दिल्यानंतर आपल्याला हलकें वाटलें आणि आपल्या मनावरील दडपण नाहींसें झालें असें एका दंतवैद्यानें मला सांगितलें. आपण आजवर मिळविलेलें सर्वज्ञान चुकीचें होतें व आपलें तत्वज्ञान खोटें होतें असें तत्त्वज्ञानाच्या एका चिनी प्राध्यापकानें कबूल केलें.

खरें पाहिलें असतां अशा कबुलीजबाबांनीं शाश्वत फायदा होत नाहीं जनतेच्या भीतीनें घडणाऱ्या या घटना क्षणिक असतात. असल्या तत्वज्ञानांत माणुसकीचा अभाव आढळून येतो.

शुद्धिकरणाची ही चळवळ पुढें पुढें, कम्युनिस्ट पक्षापुरतीच मर्यादित राहिली नाहीं. तिचा सर्वत्र फैलाव होऊं लागला. याचा चिनी अर्थव्यवस्थे-वर पुढें काय परिणाम होईल हें आतांच आजमावतां येणार नाहीं. ही चळवळ आपल्या हाताबाहेर गेली आहे हें पुढाऱ्यांना आतां कळून चुकलें आहे. म्हणून ही चळवळ मागें घेण्याचें प्रयत्न झाले. लौकरच पुन्हां युद्ध होणार आहे आणि त्यासाठीं चिनी जनतेची एकजूट व्हावी, विरोधी पक्षाचा संपूर्ण नायनाट व्हावा हा या चळवळीचा मूळ हेतु होता असें कांहींचें म्हणणें आहे.

★ ★ ★

पेकिंगला मीं दुसऱ्यांदा भेट दिली तेव्हांची गोष्ट. युद्धप्रदर्शनास आमचें शिष्टमंडळ भेट देणार होतें. विषारी जंतूंचा युद्धांत उपयोग कसा करतात याचीं प्रात्यक्षिकें या प्रदर्शनांत आम्हांस दिसतील अशी मला कल्पनाहि नव्हती. प्रदर्शनाचे एकूण तीन विभाग होते. विषारी जंतूसंबंधानें अमेरिकेंत चाललेल्या संशोधनाचे नमुने पहिल्या विभागांत होते. त्यासंबंधींचीं अमेरिकन मासिकें, पुस्तकें वगैरे तेथें ठेवण्यांत आलीं होतीं. विषारी व रोगट किडे अमेरिकेनें शहरांत सोडल्याचे पुरावेही तेथें ठेवण्यांत आले होते.

दुसऱ्या विभागांत निरनिराळ्या प्रकारच्या बॉंबचे अवशेष ठेवण्यांत आले होते. मँचुरिया, व उत्तर कोरिया येथें या बॉंबमधून विषारी किडे, डांस वगैरें टाकण्यांत आले होते. असे विषारी बॉंब ज्या घरांवर टाकण्यांत आले होते. तेथील छायाचित्रेंही या विभागांत लावण्यांत आलीं होतीं या प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या समितीचे सभासद आपलें काम करीत असल्याचें एक दृश्यहि या विभागांत आढळून येत होतें. बॉंब टाकला तो दिवस व चौकशी सुरू झाली तो दिवस यांची नोंद होती.

एका कोपऱ्यांत एक ध्वनिक्षेपक होता. दोन अमेरिकन वैमानिकांचे ध्वनिमुद्रित करण्यांत आलेले कबुलीजबाब या ध्वनिक्षेपकांतून ऐकूं येत येत होते. १९५२ च्या जानेवारींत कोरियांत त्यांचें विमान खालीं पाडण्यांत येऊन त्यांस कैद करण्यांत आलें होतें. आपल्याला मिळालेलें शिक्षण आणि विषारी बॉंबची त्यांनीं सांगितलेली माहिती येथें ऐकूं येई. " अमेरिकन लोकांना विषारी बॉंबचा उपयोग मान्य नाहीं. पण त्यांना वस्तुस्थिति माहीत नाहीं. " असें या वैमानिकांनीं आपल्या निवेदनांत सांगितलें होतें. शेजारील कांचेच्या कपाटांत त्या वैमानिकांचे लेखी कबुलीजबाब ठेवण्यांत आले होते. हस्ताक्षर त्या वैमानिकांचेंच होतें म्हणे !

तिसऱ्या खोलींत अनेक सूक्ष्मदर्शक यंत्रें होती. निरनिराळे विषारी जंतु या यंत्रांतून दिसत. कोरियामध्यें यांपैकीं पुष्कळसे जंतु पूर्वी अस्तित्वांतच नव्हते असें सांगण्यांत येई भिंतीवर या जंतूंची चित्रें व सांगाडे लावण्यांत आलेले होते. प्लेगला बळी पडलेल्या तीन रोग्यांचे फोटोही टाकण्यांत आले होते. प्लेगचे जंतु अमेरिकेनें विमानांतून बॉंबच्या द्वारां टाकण्यांत आल्याचें येथें म्हटलें होते. विषारी जंतु प्रतिबंधक साधनांचीं पत्रकें लावण्यांत आलीं होतीं.

कोरिया व उत्तर चीन येथें २८ जानेवारी १९५२ पासून ३१ मार्च १९५२ पर्यंतच्या काळांत सुमारें ७० गावांवर एकूण ८०४ विषारी जंतूंनीं भरलेले बॉंब टाकण्यांत आले अशी माहिती एका मोठ्या भित्तिपत्रका-वर देण्यांत आली होती. प्रत्येक छायाचित्र आणि भित्तिपत्रक यांजवर इंग्रजी चिनी व रशियन भाषांतून शीर्षकें देण्यांत आलीं होतीं. हिंदी शिष्टमंडळाला हे सर्व विभाग तपशीलवार दाखविण्यांत आले होते. प्रदर्शन पहाण्यास आम्हांस एकूण तीन तास लागले. प्रदर्शन पाहून झाल्यानंतर शेजारच्या खोलींत चहापानासाठीं आम्ही गेलों. चीनच्या आरोग्यमंत्री श्रीमती ली टे चुआन यांनीं आमच्या नेत्या श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना प्रदर्शनाबद्दल विचारलें. हें काम अवघड होतें. आम्ही काय बोलतों याची बिनचूक व सविस्तर नोंद घेण्यासंबंधीं आमच्या दुभाष्यांस आगाऊ सूचना होत्याच. श्रीमती पंडित यांनीं फक्त आभार मानले. त्या इतर कांहींच बोलल्या नाहींत.

दुपारीं मला टेलिफोन आला. आणि प्रदर्शनाला भेट देण्याची विनंति करण्यांत आली. हें प्रदर्शन मीं सकाळीं चार तास पाहिलें आहे असें सांगू-नही ते ऐकेनात, मीं आलेंच पाहिजे व वाटल्यास मीं तेथें प्रश्न विचारावयासही हरकत नाहीं, प्रदर्शनाच्या जागीं एक वृत्तपत्र प्रतिनिधींची बैठक भरावयाची आहे असें मला सांगण्यांत आलें. परराष्ट्रीय वृत्तप्रतिनिधींशीं संबंध ठेवणाऱ्या चीन सरकारच्या खात्याकडून तो टेलिफोन होता. प्रदर्शनासंबंधींचें आमचें मत त्यांना हवें होतें मीं ओळखलें होतेंच. आणि माझ्या मार्फतीनें ती माहिती काढून घेण्याचा त्यांचा हेतु होता. अखेर मीं संमति दिली. या बैठकीस खूपच लोक आले होते. विषारी जंतु चौकशी समितीचे सर्व सभासद हजर

होते. चिनी व रशियन वृत्तपत्रांचे प्रतिनिधीही हजर होते. आम्ही तेथें पोहोंचल्याबरोबर सर्व वृत्तपत्रप्रतिनिधींना प्रदर्शन दाखविण्यांत आलें. मीं जाण्यास नाखूष होतों पण एका अधिकाऱ्यानें मला जवळजवळ ओढूनच नेलें. परकीय वृत्तपत्रप्रतिनिधी प्रदर्शन पहात असतांना त्यांचें फोटो घेण्याची जय्यत तयारी ठेवण्यांत आली होती. त्यांच्याबरोबर माझे फोटो काढण्याची इच्छा प्रदर्शित करण्यांत आली. मला नकार देणें अशक्य झालें. फोटो काढण्यास मीं जरी होकार दिला तरी प्रदर्शन पुन्हां पाहण्याचें मात्र मीं टाळलें. मीं इकडे तिकडे हिंडूं लागलों. असल्या प्रदर्शनानें पूर्व आणि पाश्चिम यांच्यातील संबंध खासच दुरावतील असें मला वाटत होतें. हिरोशिमाच्या आठवणी आशियांतील लोकांच्या मनांत ताज्या होत्याच. आशियांतील लोकांचे जीव पाश्चात्यांना कःपदार्थ वाटतात असा यामुळें लोकाचा ग्रह होणार होता. या प्रदर्शनाचा हेतु सफल झाला नाहीं अशी माझी भावना होती. कारण हे नमुने कोणत्याहि प्रयोगशाळेंत तयार करतां आलें असते. चौकशी समितीचें काम वरवरचें व पूर्वग्रह दूषित होतें. अमेरिकन वैमानिकांच्या कबुलीजबाबा-वरून या घटनेच्या सत्यतेबद्दल थोडी खात्री पटत चालली होती हें मात्र खरें. पण अशाप्रकारच्या कृत्यांचे परिणाम काय होतील याची अमेरिका व तिचा कोरियांतील सेनापति जनरल रिजवे यांना कल्पना नसेल कां !

मी हिंडत असतांनांच चीनच्या परराष्ट्रीयांनी खात्यांतील व संशोधन विभागाची प्रमुख मॅडम कुंग पेंग आली. ही बाई कडक स्वभावाची दिसली. तिनें जरी भारत व इतर देशांत प्रवास केला होता तरी आवश्यक असेल त्याच वेळीं ती इंग्रजीतून बोले. एरवीं दुभाषा असेच ! आतां माझी परीक्षा देण्याची वेळ आली. इंग्रजींत ती म्हणाली— "मला तुम्हांला भेटाव-याचें होतें पण कामाची फार गर्दी होती. हें प्रदर्शन तुम्हांला कसं काय वाटलं ? " अशा प्रकारचे प्रकार जर खरोखरच घडले असतील तर त्यांतील सत्यें आशियांतील लोकांपुढें मांडली पाहिजेत अथवा एखाद्या निःपक्षपाती समितीकडून पूर्ण चौकशी करून त्यांचा अहवाल तयार केला पाहिजे, असें मीं म्हणालों.

अनुक्रम 2.8.99.12... वि: ...
(१२३) क्रमांक ...2-3-/...... नों: दि: ...


मॅडम कुंगला माझें हें उत्तर अपेक्षितच असावें. कारण ती लगेच म्हणाली— "अमेरिकन वैमानिकांनीं दिलेल्या माहितीवर तुमचा विश्वास नाहीं का?"

मीं म्हणालों— "हे अमेरिकन वैमानिक युद्धबंदी असल्यानें त्यांचीं वक्तव्यें खरीं व मनापासून दिलेलीं आहेत असें आपणांस मानतां येणार नाहीं."

पण युद्धबंद्यांना आम्ही चांगली वागणूक देतों. या दोन वैमानिकांनीं आपणहून हीं वक्तव्यें दिली. कारण आपण अधर्म युद्ध करीत होतों अशी त्यांची खात्री पटली होती." मॅडम कुंग म्हणाली.

तसं असेल कदाचित. पण भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांत मींहि राजबंदी होतों. त्यामुळें तुरुंग व तेथील व्यवस्था याची मला पुरेशी कल्पना आहे."

मॅडम कुंगच्या कपाळावर आठ्या आल्या. येथें भरणाऱ्या पत्रकार परिषदेंत कांहीं प्रश्न विचारण्याचा माझा हेतु आहे काय, असें तिनें विचारलें. मीं कोणते प्रश्न विचारणार आहे तें सांगण्याची तिनें मला विनंति केली. चीन मधील पत्रकार परिषदेस हजर रहाण्याची माझी ही पहिलीच वेळ असल्यानें त्यांच्या कामकाजपद्धतीची मला माहिती नव्हती. मीं म्हणालों, मीं वृत्तपत्रप्रतिनिधि असल्यामुळें मला कोणती माहिती हवी अथवा कोणती नको हा प्रश्न उद्भवत नाहीं. माझ्या वाचकांना कोणती माहिती उपयुक्त वाटेल एवढेंच मला हवें आहे. म्हणून मीं असें म्हणेन कीं, बॉंब पडलेल्या जागांची चौकशी केली म्हणजे काय केलें, या बिषारी जंतु प्रकरणाचें खुद्द चीनमध्यें कोणते पडसाद उमटले, व या प्रकरणाची एखाद्या स्वतंत्र समितिकडून चौकशी करून घेण्यास चीन तयार आहे काय एवढी माहिती मला हवी आहे."

मॅडम कुंग तेथून निघून गेली. सुमारें दोन तासांनीं परिषद सुरू झाली. खरं म्हणजे मीं दिवसभर कांहींच खाल्लं नसल्यानें मला भूक लागली होती. पण परिषदेला हजर रहाणंच भाग होतं. एक केक व एक कप चहा घेऊन मीं आमच्या दुभाषासह एका कोपऱ्यांत बसलों. या परिषदेची

छायाचित्रें घेण्यासाठीं फोटोग्राफरांचा तांडा सज्ज होताच मला अध्यक्षां-शेजारी बसण्यास सांगण्यांत आलें.

अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले. " कोरियांतील युद्धांत विषारी जंतू असलेले बॉंब अमेरिकेनें टाकले या विधानाचा अमेरिकेनें निषेध केला असला तरी आमच्याजवळ असलेला पुरावा पाहिल्यावर कोणालाही तें विधान सत्य आहे याची प्रचीति येईल. " हें छोटेसें भाषण झाल्यानंतर मला प्रश्न विचारण्यास सांगण्यांत आलें. मीं सडेतोड प्रश्न विचारल्यास गैरसमज निर्माण होतील व त्याचे परिणाम अनिष्ट होतील हें मी जाणून होतों. म्हणून सुरवातीसच मी खुलासा केला. मीं म्हणालों " मला माझे कर्तव्य शक्य तितक्या चोख-पणानें पार पाडावयाचें आहे. त्यामुळें मीं विचारलेले प्रश्न म्हणजे माझीं मतें आहेत असा कृपाकरून कोणी समज करून घेऊं नये. " यानंतर मॅडम कुंगला विचारलेले तीन प्रश्न मीं पुन्हां विचारले.

रशियांतील टास या वृत्तपत्रवितरण संस्थेचा एक प्रतिनिधि म्हणाला " या बॉंबमध्यें सांपडलेले जंतू चीनमध्यें कोठेंच आढळून येत नसतील, तर हे जंतू आले कोठून ? " व्हिएटनामच्या प्रतिनिधीनें केवळ चीनची बाजू घेऊन अमेरिकन साम्राज्यशाहीवर टीका केली. या जंतूंचा पिकें, जनावरें व भाजीपाला यांस उपसर्ग झाला किंवा काय अशी चिनी वार्ताहरांनी पृच्छा केली. हे प्रश्न लिहून घेतल्यानंतर परिषद तहकूब झाली.

सुमारें अर्ध्या तासानंतर चौकशीसमितीचे सभासद परत आले. समि-तीच्या सभासदांनीं आपलीं वक्तव्यें सुरू केली. त्यांच्या हल्याचा रोख माझ्या-वर होता. समितीच्या कार्याचा खरेपणाबद्दल मी शंका घेतली असा त्यांचा ग्रह झाला होता. प्रदर्शनांत मांडलेलें नमुने व पुराव्याचा अपुरेपणा हीं त्यांच्या मतें मीं काढलेलीं न्यूनें होतीं. असा प्रकार कम्युनिस्ट चीनमध्यें पूर्वीं कधींच घडलेला नव्हता. या भावनेच्या भरांत मीं या सर्वांचें लक्ष्य झाल्यानें सर्व भाषणांची इंग्रजींत भाषांतरें करण्यांत आलीं. रशियन भाषेंत भाषांतर कर-ण्याचें कोणाला सुचलें नाहीं.

ज्या ठिकाणांवर बॉंब पडले होते, त्या स्थानांना समक्ष भेट देऊन, तेथील लोकांशी चौकशी करून व भरपूर पुरावा गोळा करून समितीनें निष्कर्ष काढलें असें या भाषणांत जोरजोरानें व आवेशानें सांगण्यांत आलें.

" तुम्हांला प्रत्यक्ष पुरावा पाहिजे ? २ एप्रिल रोजीं प्राध्यापक वेशी व डेली वर्कर या इंग्रज पत्राचा एक प्रतिनिधि यांच्यावर हे जंतु टाकण्यांत आले. ते त्यावेळीं या प्रकरणाची चौकशी करीत होते. " हे उद्‌गार ऐकतांच मला हंसू आलें. चौकशी कोणत्या प्रकारें करण्यांत आली याच्याशीं मला कांहींच कर्तव्य नव्हतें. प्रदर्शनांत एक छायाचित्र होतें. बॉंबफेक झाल्यानंतर एक महिन्यानें ओव्हरकोट व पायांत जाड बूट घालून जणूं कांहीं जंतूंचा शोध करण्याच्या आविर्भावांत असलेल्या चौकशी समितीच्या सभासदांचें तें छायाचित्र होतें. उत्तर कोरिया व चीन यांवर या जंतूंचे काय परिणाम झाले आहेत. हेंच अमेरिकेला हवें आहे, त्यामुळें ती माहिती आम्हीं सांगणार नाहीं. जानेवारीपासून जूनपर्यंत अमेरिकन सैनिकांनीं असले बॉंब अविरत टाकले. " असें या भाषणांत सांगण्यांत आलें. पण असें होणें शक्य नाहीं असें मला वाटत होतें. कोणाच्या तरी चुकीच्या हुकूमानें कांहीं बॉंबफेक झाली असेल पण इतका काल ती चालूं शकणार नाहीं. कारण त्याचे ताबडतोब दुष्परिणाम झाले असते. लोकशाहींत असें होणें शक्य नाहीं. चीननें हा प्रकार अतिरंजित करून आपलें प्रचारकार्य साधलें असावें. यामुळें आशियामधील राष्ट्रांची या बाबत समजूत पडणें शक्य नाहीं; असे अनेक विचार माझ्या मनांत येऊन गेले.

या प्रकरणाची स्वतंत्रपणें चौकशी करूं देण्यास चीन तयार आहे काय ? असा माझा आणखी एक प्रश्न होता. चिनी शांततापरिषदेनें अशा निःपक्षपाती चौकशी समितिसंबंधीं सूचना केली होती असें या प्रकरणीं सांगण्यांत आलें. एक समिति नेमण्यांत आली असल्याचेंहि एका वक्त्यानें सांगितलें. समिति निःपक्षपातीपणें काम करील अशी चिनी जनतेची खात्री पटली तर आणखी समिति नेमण्यासही आमची हरकत नाहीं असें एकजण

म्हणाला. चिनी लोकांनीं नेमलेल्या कोणत्याही चौकशी समितिवर पक्षपातीपणाच आरोप घेण्याचा संभव आहे असें मी म्हणालों.

ही चर्चा मध्यरात्रीपर्यंत चालली होती. चौकशीसमितिनें आपलें काम चोखपणें बजाविलें आहे हेंच वारंवार सांगण्यापलीकडे चर्चेची प्रगति अशी झालीच नाहीं. मला मोटारीनें घरीं सोडण्यांत आलें हे माझ्यावर उपकारच झाले.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं चिनी शांतता परिषदेचे अध्यक्ष व चीनचे उपपंतप्रधान श्री. कुओ मो जो यांनीं मला भेटावयास बोलाविलें. यापूर्वींच मीं माझे प्रश्न त्यांजकडे पाठविले होते. पत्रकारपरिषदेंत मीं विचारलेल्या प्रश्नांमुळेंच मला भेटीचें हें आमंत्रण आलें असावें.

श्री. कुओ मो जो यांच्या रहात्या घरीं ही भेट झाली. श्री. मोजो हे गृहस्थ कलाप्रेमी दिसले. ते स्वतः एक कवि आहेत व उत्खननशास्त्राची त्यांस आवड आहे. त्यांचें वक्तृत्व वाखाणण्याजोगें आहे.

निःपक्षपाती चौकशीसमितिसंबंधीं आमचें बोलणें सुरू झालें. ते म्हणाले " एखाद्या शास्त्रज्ञानें अथवा वकिलानें भाकरी पाहिली, आणि आपण काय पाहिलें हें सांगण्याचें कबूल केलें तर आमच्या मतें तो मनुष्य निःपक्षपाती आहे. जे शास्त्रज्ञ काळ्या रंगाला काळा रंग असें म्हणावयास तयार असतील त्यांनीं या प्रकरणीं अवश्य चौकशी करावी. पण अलीकडे कांहीं लोक काळ्या रंगाला वेगळेच नांव देऊं लागले आहेत तरीसुद्धां आरशाप्रमाणें ज्यांचीं मनें निर्मळ आहेत असे पुष्कळ लोक आहेत. अशांची चौकशीसमिति बनविण्यास हरकत नाहीं. अडचण एवढीच कीं असे लोक सत्यप्रिय असले तरी निःपक्षपाती असतीलच असें नाहीं. निःपक्षपाती इसमाची निवड जगांतील लोकांनीं बहुमतानें करावयास हवी. "

अशा रीतीनें जागतिक मताचा अंदाज घेण्याची शक्यता नाहीं. फार तर दोन्ही पक्षांना मान्य असलेल्या लोकांची निवड ही निःपक्षपाती समजतां येईल असें मीं म्हणालों. पण श्री. मो जो यांनीं तिकडे लक्षच दिलें नाहीं.

उलट ते म्हणाले. असे लोकच मिळणें शक्य नाहीं. आम्हांला पसंत असलेल्या शास्त्रज्ञांच्या नांवास अमेरिकेची मान्यता मिळणार नाहीं."

मी म्हणालों " आशियांतील लोकांची व आशियांतील राष्ट्रांनीं नियुक्त केलेली समिति तुम्हांस चालेल काय ? "

श्री. मो जो म्हणाले " जागतिक शांतता परिषदेतर्फे अशा तऱ्हेची एक समिति नेमण्यांत येत आहे. या समितिच्या कामांत भारतानें भाग घेतल्यास आम्हांस आनंदच वाटेल."

आमची मुलाखत व हें प्रकरण येथेंच संपलें. बॉंबफेकीचें मीं फोटोंत पाहिलेलें स्थळ लौकरच मला अचानक रीतीनें पहाण्यास मिळालें. तें एक ओसाड शर्यतीचें मैदान होतें. तेथें झुडपें वाढलेलीं होतीं. कांहीं गुरें चरत होतीं. विषारी जंतूंच्या बॉंबची तेथें निशाणीहि नव्हती. मीं त्याबाबत आमच्या दुभाषास विचारलें. त्यामुळें एक नवीनच भानगड उपस्थित झाली. अचानकपणें आमच्या आरोग्याविषयक नोंदी रात्रीं तपासण्यांत आल्या. मजजवळ प्लेगची लस टोंचून घेतल्याचा दाखला नाहीं या सबबीवर मला पुढें जाण्यास मनाई करण्यांत आली.

रात्रभर मला झोंप आली नाहीं. नको त्या ठिकाणीं तोंड उघडल्यामुळें माझ्यावर पश्चात्तापाची पाळी आली होती. पहाटें तीन वाजतां मला उठविण्यांत आलें व प्लेगचें इंजेक्शन घेतल्यास पुढें जाण्याची परवानगी मिळेल असें सांगण्यांत आलें. सुमारें दोन तासांनीं मला प्लेगचे इंजेक्शन देण्यांत आलें. या इंजेक्शनच्या सुईमध्यें लसच नव्हती !

या प्रकाराबाबत आम्हीं निघण्याच्या दिवशीं चर्चा झाली. इंजेक्शनचा हा देखावा कां करण्यांत आला असें विचारतांच " प्लेगच्या लसीचा परिणाम दहा दिवसांनीं सुरू होतो. हाथींसिंगला कांहीं आजार होतो कीं काय हे आम्हांस पहावयाचें असल्यानें आम्हीं त्याला बरोबर घेतलें " असें आम्हांस उत्तर मिळालें.

* * *

## ५ : हुकुमशाही

पेकिंग सोडतांना मला वाईट वाटलें. आतां आम्हांला हवं तिथें हिंडायची मोकळीक मिळाली होती. चीनमधील सहा शहरांना आम्हीं भेटी दिल्या. पण पहाण्यासारखं असं कांहींच दिसलं नाहीं. आम्ही लोकांना भेटूं शकलों नाहीं, कीं बोलूं शकलों नाहीं. निळे कपडे घातलेली बायको अथवा मुलगा यांच्या शेतांत काम करणाऱ्या शेतकऱ्याखेरीज आम्हांला आगगाडीतून इतर दृश्यें दिसलींच नाहींत. एकदां आमची आगगाडी एका लहानश्या स्टेशनवर थांबली. क्षितिजावर मला कांहीं लोक दिसले. इतक्यांत चंद्र उगवला. तें एक शेतकऱ्याचें कुटुंब होतें. नी ती मंडळी रस्त्यावर विश्रांति घेत होती. शेजारीच नांगराला जुंपलेले एक गाढव होतें. शेतकऱ्याला आपल्या जमिनीबद्दल किती प्रेम वाटतें हें मला येथें दिसून आलें.

पेकिंगहून आम्हीं टाटुंगला गेलों. कैकेय नांवाचा एक भारतीय साधू पांचव्या शतकांत येथें आला होता. त्यानें त्यावेळीं येथें कांहीं उत्खननही केलें होतें.

भारतीयांनीं अफगाणिस्थान व मध्यआशिया येथून पूर्वीं चीनमध्यें प्रवेश केला होता. त्यांनीं आपल्या बरोबर ग्रीस व इराण येथील कलांचे नमुने आणले होते. आजही भारतांतील अजिंठ्यापासून अफगाणिस्तान मार्गें चीनच्या रस्त्यावर या भारतीय बौद्ध भिक्षुच्या वाटचालीची स्मारकें दृष्टीस पडतात.

टाटुंग गांवांपासून दहा मैलावर या प्राचीन गुहा आहेत. बुद्धाच्या पन्नास फूट उंचीच्या मूर्तीं मला येथें दिसल्या. त्या मूर्तींच्या चेहऱ्यावर दिव्य तेज विलसत होतें. पण बुद्धाची शांततेची, सहिष्णुतेची व प्रेमाची शिकवण आतां द्वेष, असूया, भीति, असहिष्णुता या रूपानें दृग्गोचर होत होती. गेलीं दोन हजार वर्षें भारतीय व चिनी लोक गुण्यागोविंदानें रहात होते. आतां त्या घटना मागें कां पडाव्या ? आयुष्य हें तुरुंगासारखं कां व्हावं ?

लाखोंचें बलिदान होऊन थोड्यांच्या हातीं सत्ता कां जावी ? सहनशीलते बद्दल ख्यात असलेला चीन आज त्यांच्या विरुद्ध गुणाबद्दल प्रसिद्ध असावा हें दुर्दैव आहे.

जुन्या मूर्ति नाहींश्या झाल्या. कांहीं जपाननें पळवल्या. त्यांची जागा आज नवी दैवतें भरून काढीत आहेत. टाटुंग हें गांव पूर्वी कोळशाच्या खाणींसाठीं प्रसिद्ध होतें. हजारों टन कोळसा येथें सांपडत होता. आज कांहीं खेचरांच्या पाठीवरून वाहात असलेला कोळसा आम्हांला पहावयास मिळाला. सायंकाळीं आम्हांला नगरपालिकेतर्फे मेजवानी देण्यांत आली. नव-चीनचा गौरव आम्हीं ऐकला. अमेरिका विरोधी घोषणाहि ऐकल्या. नवचीनचें हें धोरण साधारण नागरिकांपर्यंत पोंहोंचलें असेल असं मला वाटत नाहीं.

टाटुंगहून आम्हीं चीनची अभेद्य भिंत पहावयास गेलों. हजारों लोकांच्या परिश्रमांनीं तयार झालेलें संरक्षणाचें हें साधन, जगांतील एक महान आश्चर्य म्हणून निर्माण झालें. पण भिंतीचा उपयोग झाला नाहीं. शत्रु आला नी त्यानें चीनमध्यें पाय रोवले. आज तर शत्रु खुद्द चीनमध्यें घुसला आहे आणि त्याला स्वातंत्र्याची खंडणी द्यावी लागत आहे. मांचूरियाच्या बाजूला तोंड करून एक पहारेकरी उभा आहे.

नवचीनचे तें एक प्रतीक आहे. अभेद्य भिंत ओलांडून हें प्रतीक पुढें जात आहे, आशिया व जग यांची एकी साधण्यासाठीं चीननें आपली साम्राज्यशाही मोडली पण तिचे पाश आतां जगाभोंवतीं आवळण्याची तिला इच्छा आहे.

आम्हीं भिंतीच्या तटावर बसलों होतों. ही भिंत बांधण्यासाठीं केलेले सर्व श्रम वाया गेले होते. आम्हीं आमच्या स्वातंत्र्याचे पवाडे गात होतों. ज्यांच्या मनांत स्वातंत्र्याची ज्योत सतत तेवत असते आणि स्वातंत्र्य कायम टिकविण्यासाठीं जे सर्वस्वाचे बलिदान करण्यास तयार असतात तेच स्वतंत्र राहूं शकतात याची ही भिंत एक साक्ष आहे. मोठालीं सैन्यें या भिंतीचं रक्षण किती करणार ? या भिंतीच्या असहायतेमुळें अनेक शतकांचे कार्य लयाला गेले.

मुकडेनमध्यें गतकाळांतील युद्धांच्या आठवणी जाग्या झाल्या. हा देश सुपीक. पण जपानी, रशियन व चँग के शेकच्या फौजांनीं या मुलुखाला लुटलें. पूर्वींच्या काळीं पेकिंग जिंकण्यासाठीं येथून सैन्यें गेलीं. आज दुसरे लोक पेकिंगमध्यें येऊन वित्तहरण करीत आहेत. सर्वत्र रशियाचा प्रभाव दृष्टीस पडतो. हॉटेलें, रस्ते, दुकानें यांचीं नांवें रशियन भाषेंत लिहिलेलीं दिसतात. स्टॅलिन, माओ त्से तुंग यांचीं छायाचित्रें शेजारी शेजारीं पाहिलीं कीं रशियाशिवाय चीनचा तरणोपाय नाहीं हें पटतें. मुकडेन हे एक जपानी धर्तीचें शहर आहे. रस्ते रुंद नि इमारती उंच आहेत. खेचरांच्या गाड्यांची वर्दळ येथें कायम चालू असते. मधूनमधून एखादी लॉरी मजुरांना घेऊन फर्रकन निघून जाते. पाहुण्यांसाठीं नव्या अमेरिकन गाड्या ठेवण्यांत आलेल्या आहेत. चोरून आयात केलेल्या !

तेथून आम्हीं टिएन्स्टेनला गेलों. पूर्वीं येथें परकीयांची वस्ती होती. दुकानें सुंदर; पण आतां वस्तु विकत घ्यायला कोणी नाहीं. येथें राहिलेले परकीय स्वदेशीं परत जाण्यासाठीं परवानगीची वाट पहात आहेत.

नॅनकिंग हें शहर अद्यावत वाटलें, तरी जुनाटच. चँग कै शेक येथें बराच काळ रहात होता. त्याचा भव्य राजवाडा भकास वाटतो.

चीनमध्यें १९११ मध्यें सन यत सेननें क्रांतीचा प्रयत्न केला. चँग कै शेकनें क्रांतीचा प्रयत्न करूनही त्यास तें जमलें नाहीं. त्यानें चीनमधील छोट्या सत्ताधीशांशीं मिळतें घेतलें आणि पाश्चात्य सम्राज्यशाहीचा बीमोड करण्याऐवजी तिच्यावर तो अवलंबून राहिला. चँगला पळून जावें लागलें. तो आतां परत येण्याची शक्यता नाहीं. सन यत सेनच्या समाधीवर त्याचें निशाण फडकत असे. तें आतां तेथें पुन्हां दिसणार नाहीं. त्याच्या जागीं आतां चीनचें लाल निशाण आलें आहे. नॅनकिंगमधील सुंदर उपवनें आतां मोकळीं पडलीं आहेत. तें एक मृत शहर आहे.

नॅनकिंगमध्यें सन यत सेनची एक मोठी समाधि आहे. येथें उभें राहिलें असतां आजूबाजूचा देखावा सुंदर दिसतो. एका टेकडीवर ही समाधि उभारली आहे. समाधि सुस्थितींत आहे. सन यत सेनचें तत्त्वज्ञान नाहींसें झालें आहे.

ऑक्टोबर १९५१ मध्यें आम्हीं या समाधीस प्रथम भेट दिली. आमच्यापैकीं एक जण सन यत सेनच्या कार्यानें इतका भारावून गेला कीं प्रत्येक ठिकाणीं तो त्याचा मोठेपणा बोलून दाखवी. अखेर त्याला सन यत सेन बद्दल न बोलण्याची विनंति करण्यांत आली. " आम्हींही सनयेतसेनला मानतों. पण त्याचा जनतेंत अतिशय उदोउदो केलेला आम्हांस आवडत नाहीं. " असें त्यास सांगण्यांत आलें.

नॅनकिंग येथून आम्हीं शांघायला गेलों. हें शहर हळूं हळूं मृतप्राय होत आहे. एकाकाळीं येथें जणूं कांहीं एक स्वतंत्र अधिराज्यच होतें. लक्षाधीश आणि भिक्षाधीश दरवडेखोर येथें रहात. पण आतां तें वैभव नाहींसें झालें आहे. जुन्या वैभवाची साक्ष दाखविणारी मोठीं दुकानें येथें आहेत. पण गिऱ्हाईक नाहीं. येथील व्यापार आतां बसला आहे. रहदारी नाहींशीं झाली आहे. शांघायला आतां भविष्यकाळ नाहीं. येथील उद्योगधंदे दुसरीकडे गेले आहेत. अनेकांचा व्यापार गेला आहे. हजारों परकीय स्वदेशी जाण्यासाठीं अनुज्ञेची वाट पहात आहेत. पेकिंग पेक्षां येथील स्त्रिया अधिक नटव्या वाटल्या. पण त्यांच्या डोळ्यांत कसली तरी भीति तरळत होती.

शांघाय म्हणजे एक भला मोठा तुरुंग होता. मला येथें रहाणें नकोसें झालें. सारा शेतकरी वर्ग कम्युनिस्ट होता. परंतु शहरांत राहून आपलें भागणार नाहीं हें ओळखून ते खेड्यांत गेले होते. शहरांतील प्रतिगामी विरोधक आपल्यावर सत्ता गाजवितील अशी त्यांस भीति वाटत असे. सॅन फॅन चळवळीनेंही शहरांतील लांचलुचपत थांबेल असा रंग दिसत नाहीं. त्यामुळें हीं मोठीं शहरें नेस्तनाबूद होण्याचा संभव आहे.

आमचा या मोठ्या शहरांतील प्रवास म्हणजे रिकाम्या रस्त्यांवरची सहल. घरांघरांतून लोक असत. पण त्यांच्या जीवनांतील आनंद आणि दुःख आम्हांस पहाण्यास सांपडलें नाही. पेकिंगच्या पावलावर पाऊल टाकून त्यांचें जीवन चाललें होतें. ' इंग्लिश डेली ' या नांवाच्या शांघाय येथील वृत्तपत्रांत पेकिंगमधील ' पीपल्स् डेली ' या वृत्तपत्रांतील अग्रलेख जसेच्या तसे छापून येत. लोक आपणहून आमच्याशीं कधींही बोलावयास येत नसत. आमच्यासाठीं घडवून

आणलेल्या समारंभांत केवळ औपचारिकपणा असे. शांतता, आशियांतील राष्ट्रांची संघटना, अमेरिकेची साम्राज्यशाही, चीन व भारत यांमधील हजारों वर्षांची संस्कृतींची देवघेव हेच विचार वारंवार आमच्या स्वागताच्या भाषणांत येत. पुढें पुढें तर असलीं भाषणें आम्हांस पाठ झालीं होती.

खेड्यांत हा प्रकार असे. वास्तविक खेड्यांतूनच क्रांतीचा फैलाव झाला होता. जमीनसुधार कायद्यामुळें लोकांत नवा उत्साह जागृत झाला होता. त्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारली होती शेतकऱ्यांच्या हातीं सत्ता आली होती. त्यांचे संघ स्थापन झाले होते. स्त्रिया स्वतंत्र झाल्या होत्या. खेड्यांतून स्वातंत्र्याचें वारें खेळत होतें. आपली जमीन राखावी, थोडा पैसा बाळगावा असें शेतकऱ्यांस वाटत होतें. पण या गोष्टी कम्युनिस्ट तत्त्वप्रणालींत बसत नव्हत्या. प्रचार, व बंधनें यांनीं शेतकऱ्यांना एकाच माळेंत गोंवलें जात होतें. यामुळें कांहीं ठिकाणी संघर्ष सुरू झाले होते.

कनफ्यूशिअस हा प्राचीन काळचा मोठा तत्त्वज्ञानी. कूफो येथें त्याची समाधि आहे. ती पहाण्यासाठीं आम्हीं गेलों होतों. पण या खेड्याची आम्हांस दुरावस्था दिसली. शेतें पिकांनीं समृद्ध दिसलीं. पण गांवांतील धूळ अथवा दारिद्र्य कांहीं कमी झालें नाहीं. घरें मोडकळीस आलीं होतीं आणि ओझ्याखालीं वांकलेले शेतकरी शेताकडे निघाले होते. पाहुण्यांना दाखविण्या जोगें हें खेडें नव्हतें खास.

माओ पूर्वी येथें येऊन गेला होता. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी कनफ्यूशिअसनें येथें आपलें तत्त्वज्ञान लोकांस सांगितलें होतें. त्याच्यामागें त्याच्या मतांचा प्रभाव शिल्लक राहिला होता. दया, पूर्वजांबद्दल आदर, गुणांची कदर, बुद्धीचा मोठेपणा, सभ्याचार ही त्याची शिकवण लोक शिरोधार्य मानीत होते. सामाजिक कर्तव्यें पार पाडल्यानंतर राहिलेला वेळ आत्मोद्योगांत व आत्मचिंतनांत घालवावा अशी येथील लोकांची धारणा होती. ९ व्या शतकांतील कवि पो चू म्हणतो, "गेल्यावर्षी मीं जेव्हां आजारी पडलों, तेव्हां दारूच्या एका थेंबालाही स्पर्श न करण्याची मीं प्रतिज्ञा केली. पण पुढील वर्षी काय होणार

हें गेलें वर्ष कसें सांगू शकेल ? आजच पहा. मीं दारू पिऊन झिंगून पडलों आहे. ''

चीनमधील जुनी सरंजामशाही गेली. तिच्या जागीं जनतेच्या नांवानें राज्य करणारा एक हुकुमशहा आला आहे. नवचीनमध्यें आज लोकशाही-च्या गप्पा मारल्या जातात. परंतु कम्युनिझममध्यें व्यक्तीला स्वातंत्र्य नाहीं. आचार, विचार, प्रचार, सभा, समित्या, पत्रव्यवहार, व्यक्तित्व, वसति, धार्मिक भावना, व जाहीर प्रगटनें यांबद्दल घटनेनें चिनी लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. पण त्याचा वापर केवळ हुकूमशहा करूं शकतो. व्यक्तिस्वातंत्र्याच्या ऐवजीं कर्तव्यें दिसूं लागली आहेत. चिनी जनतेवर आज कम्युनिस्टांची सत्ता आहे.

लोकसत्तेला अथवा नवचीन सरकारला विघातक असा मजकूर छाप-ण्याची वृत्तपत्रास मनाई असल्यानें स्वातंत्र्य असें फारसें उरत नाहींच. कम्युनिस्ट पक्षाला विरोध, हा राजद्रोह समजला जातो. सरकार देईल तेवढीच माहिती छापावयाची व सांगेल तींच मतें जाहीर करावयाचीं हें वृत्तपत्रांचें कार्य आहे. सरकारनें प्रसिद्ध केल्याशिवाय कोणतीही परकीय बातमी त्यांना छापतां येत नाहीं.

मीं नॅनकिंगमध्यें असतांनाच आम्हांस बातमी ( पाकिस्तानचा पंतप्रधान लियाकत अली याचा खून झाल्याची ) समजली. पण चिनी वृत्तपत्रांत ती आढळून आली नाहीं. आम्हांस भारतीय आकाशवाणीच्या सहाय्यानें ती पडताळून घ्यावयाची इच्छा होती पण आम्हांस परवानगी नाकारण्यांत आली.

वाङ्मय, कला, सिनेमा, नाटकें यांची राजकारणापुढें महति नाहीं. सर्वांनी क्रांतीची ज्योत पाजळली पाहिजे. परकीय वार्ताहरांचा कम्युनिस्ट पक्षातर्फे एकदां स्वागत समारंभ करण्यांत आला. हा समारंभ आम जनतेस खुला होता. पण आज कांहीं पहाणें अथवा कोणास भेटणेंही अशक्य झालें आहे. माओची सत्ता त्याच्या जनतासंबंधामुळें त्यास मिळाली. पण तोहि आज जनतेंत मिसळत नाहीं. मीं अनेक देशांत हिंडलों आहे. भाषेच्या अडचणी

मीं सर्वत्र अनुभवल्या आहेत. पण चीनमध्यें मला जो एकलकोंडेपणा वाटला तसा इतरत्र कोठेंहि भासला नाहीं.

चीनमध्यें मोकळेपणानें कोठेंही जातां येत नाहीं कीं कोठें रहातां येत नाहीं. एका जिल्ह्यांतून दुसऱ्या जिल्ह्यांत स्थलांतर करावयाचें तर पोलिसांची परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी मिळवतांना कोण त्रास ! फार वेळ तिष्ठत बसावें लागतें. काय ते खुलासे नी त्या तपासण्या. चीन सोडून जाणें ही गोष्ट कठिण आहे. त्यासाठीं पुन्हा परवाना. आणि महिनेच्या महिने थांबावें लागतें. ज्याला पासपोर्ट मिळतो त्याचें कौतुक करण्यांत येतें. एखाद्या गांवीं एका दिवसापेक्षां अधिक काळ थांबावयाचें असेल तर पोलिसांना कळवावें लागतें.

माओनें पोलिसदल समर्थ केलें. दहशत दाखवून लोकांची संघटना करावी असे त्याचें मत होतें. क्रांतीच्या यशस्वितेचा तो एकमेव मार्ग होता. जनतेच्या विचारांचें नियंत्रण, आत्मशोधन आणि त्यांची सिद्धि, शिक्षण-प्रचार यांच्या द्वारें चीनमध्यें करण्यांत येतें, गुप्त सभांमध्यें बायका आपल्या नवऱ्याच्या विरुद्ध तक्रारी करतात आणि मुलें आपल्या वडिलांवर हेरागिरी करतात. एकमेकांवर.बारीक लक्ष ठेवण्यांत येते आणि देशनिष्ठा कसोशीनें पारखली जाते.

मधून मधून शुद्धीकरणाचे प्रकार अमलांत आणले जातात. कारण यांतच हुकुमशाहीची बीजें आहे. बंदिस्थानें आणि आत्महत्या हीं या विचारप्रणालीचीं प्रतीकें आहेत. यामुळेंच जनता ताब्यांत रहाते. क्रांती-साठीं बलिदान झालेंच पाहिजे अशी लोकांची समजूत आहे. परकीयांना वाटतें कीं चिनी लोक गुलामगिरी व भूक यांच्या पाशांतून मुक्त झाली आहे. आणि चिनी स्त्रिया स्वतंत्र झाल्या आहेत.

चिनी माणसाला आज खायला भरपूर मिळत आहे हें खरें आहे. चिनी स्त्रीला आपले विचार बोलून दाखवितां येतात हेंहि खरें आहे. पण हुकुमशाहीला राबविण्यासाठीं जनतेला जर कायम गुलामगिरींत रहावें लागलें तर तें किती काळ टिकेल ?

अनुक्रम ............ दि: ..........
( १४५ )
क्रमांक .................... नों: दि: ..........

चीनमध्यें आज लोकशाही स्थापन झाली आहे असें कम्युनिस्ट ह्मणतात. कामकरी, शेतकरी, मध्यमवर्ग हे या लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं त्यास पूर्ण लोकशाही मिळाली आहे असा प्रचार करण्यांत येतो.

न्यू डेमोक्रसी या कांहीं वर्षांपूर्वी लिहिलेल्या आपल्या ग्रंथांत माओ म्हणतो, " चीनमधील लोकशाहीचें स्वरूप निराळें आहे. इतरत्र लोकशाहीमध्यें एखाद्या हुकुमशहाचा अंतर्भाव होतो. चीनमधील लोकशाहींत मात्र एका वर्गाची अथवा एका पक्षाची हुकूमशाही नाहीं आणि असतां कामा नये."

चँग कै शेकच्या विरुद्ध असलेल्या सर्व पक्षांचें आज सरकार बनलें आहे. असें वरील विधानाचा दाखला म्हणून सांगण्यांत येतें. तसेंच या पक्षाच्या संघटनेस कम्युनिस्ट पक्षाची मान्यता आहे असेंही म्हटलें जातें.

चीनमधील एका युवकास कम्युनिस्ट पक्षाचा सभासद व्हावयाचें होतें. परंतु त्यास दुसऱ्या एका पक्षाचा सभासद होण्यास सांगण्यांत आलें. यासंबंधांत त्यानें वृत्तपत्रांत लेख लिहिले. चीनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांची संख्या आज पन्नास लक्ष आहे. पण त्यांत शेतकऱ्यांचा अधिक भरणा आहे. त्यामुळें तरुणांना दुसऱ्या पक्षाचे सभासद होण्यास सांगितलें जातें. इतर पक्षांची संघटना अधिक मजबूत व कार्यक्षम व्हावी म्हणून तरुणांस असा सल्ला देण्यांत येतो, असें या बाबतींत बोलतांना एका कार्यकर्त्यानें सांगितलें.

माओ म्हणतो—" चिनी जनतेची सेवा करणें हें आमचें पहिलें कर्तव्य आहे. जनतेपासून आम्हीं कधींहि दूर जातां कामा नये. पण कम्यु-निस्टांनीं आजवर कधींहि जनमनाचा कानोसा घेतलेला नाहीं. चीनची घटना, सरकार, नवी लोकशाही हीं सर्व कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं निर्माण झाली आहेत. लोकांनीं त्यास मान्यता दिली पाहिजे व इतर पक्षांनीं कम्युनिस्ट पक्षाचें नेतृत्व स्वीकारलें पाहिजे.

पूर्वी कम्युनिस्टांनीं भाषणस्वातंत्र्य दडपशाहीचा नाश वगैरेंसाठीं घोषणा केल्या. आजही तशा घोषणा केल्या जातात पण आज त्यांचें ध्येय साकार झाल्यानें हें स्वातंत्र्य आपणांस अनुकूल अशा जनतेस देण्यांत येतें. विरोधकांस

देण्यांत येत नाहीं. कम्युनिस्ट कार्यक्रमास विरोध करणारे ते विरोधक अशी विरोधकांची व्याख्या केली जाते.

सुरवातीच्या काळांत क्रांति हेंच सर्वांचें ध्येय होतें. त्यामुळें वेगवेगळ्या पक्षांचे, राजकीय मतप्रणालीचे, सामाजिक थरांचे लोक एकत्र काम करूं शकत होते. कम्युनिस्टांनीं याबाबतींत पुढाकार घेतल्यामुळें ते चँगला हुसकावून देऊं शकले. आतां क्रांतीची ही आग विझली आहे आणि कम्युनिस्ट लोक जनतेवर नवीं बंधनें लादूं लागले आहेत.

जनता आणि कम्युनिस्ट यांच्यांत आज तडा पडूं लागला आहे. कम्युनिस्टांचें आजवरचें कार्य लेख्यांतील होतें. आज परिस्थिति पालटली आहे. रशियाचें वर्चस्व आणि इतरांचा द्वेष यांमुळें हा देश एकाकी होऊं लागला आहे.

मंत्रिमंडळ सर्व पक्षांचें असलें तरी सत्ता कम्युनिस्ट पक्षाच्या हातीं आहे. इतर लोक नाममात्र आहेत आंतरराष्ट्रीय राजकारणांत होणाऱ्या फेरबदलांवर त्यांचें मंडळांतील स्थान अवलंबून आहे. " जे आमच्याबरोबर आहेत ते आमच्याबरोबर राहातील " असें माओ म्हणतो. पण डॉ. सन यत सेन यांची पत्नी म्हणूनच मॅडम सन यत सेन यांचें नांव ऐकूं येतें.

चीनमध्यें एकूण सहा राजकीय विभाग आहेत. त्यांपैकीं चार विभागांत लष्करी राजवट चालूं आहे. सैन्यांतील लोकांस कम्युनिस्ट पंथाची दीक्षा देण्यांत येत आहे. कोरियांतील युद्धामुळें आधुनिक शस्त्रास्त्रांची भर पडण्यास मदत झाली आहे.

कम्युनिस्ट पक्ष व लष्कर यांत संघर्ष होईल असें कित्येकांस वाटतें. पण आज सर्व सैन्य माओच्या ताब्यांत आहे. जेथें एखाद्या सेनापतीचें वजन असेल तेथें त्याला पाठविण्यांत येत नाहीं. सेनाधिकाऱ्यांनीं वरचढ होऊं नये यासाठीं ही व्यवस्था करण्यांत आली आहे.

चीनमधील आजची लोकशाही ही केवळ नांवाचीच आहे. संमिश्र मंत्रिमंडळाची तीच गत आहे. देशाचें भवितव्य ठरविणें जनतेच्या हातीं नाहीं. पुढारी सांगतील तें ऐकावयाचें, एवढेंच जनतेचें कर्तव्य आहे. पुढारी हा

आदर्श समजला जातो. वस्तुतः चीनमध्यें आज हुकुमशाही नांदत असून या हुकुमशाहीची सर्व सूत्रें कम्युनिस्टांच्या हातीं आहेत.

चीनचें भवितव्य आज कम्युनिस्टांच्या हातीं आहे. चीनमध्यें आज शांतता आहे. कायदा व शिस्त यांचें तेथें पालन होत आहे. जनतेला आज-तरी हेंच हवें आहे. जमिनीची मशागत करावी व भाकरी मिळवावी हेंच जन-तेचें ध्येय आहे. पण चीनमधील लोकसंख्या वाढती आहे. जमीनसुधार कायद्याप्रमाणें मिळणारी जमीनही या वाढत्या लोकसंख्येस अपुरी पडणार आहे. कम्युनिस्टांचें परराष्ट्रीय धोरण आक्रमक आहे. त्यांना जनतेच्या शरीरावर व मनावर हुकुमत गाजविण्याची इच्छा आहे. अशा रीतीनें एक नवीन गुलामगिरी निर्माण होत आहे. ही नवी लोकें शाही आत्मनाशाचें थडगें खोदीत आहे.

चीनचा भविष्यकाळ भीषण वाटतो. माओ हा यशाचा द्रष्टा होता. अपयशाचाहि तो द्रष्टा होणार काय ?

## ६ : चीनची घटना (कॉमन प्रोग्राम)

तारीख १ ऑक्टोबर १९४९ रोजीं पेकिंग येथील टिअेन आन मान चौकांत माओ त्से तुंग यानें चीनमधील प्रजासत्ताक लोकराज्याची स्थापना झाल्याचें जाहीर केलें. " चीनमधील साडेसत्तेचाळीस कोटी चिनी लोक आज जागे झाले आहेत आणि आमचें भवितव्य उज्वल आहे. " असें यावेळच्या घोषणेंत म्हटलें होतें.

या लोकराज्याच्या घटनेला कॉमन प्रोग्राम असें म्हणतात. या घटनेंत साठ कलमें आहेत. तारीख २० सप्टेंबर १९४९ पासून ३० सप्टेंबर १९४९ पर्यंत भरलेल्या घटनापरिषदेंत ही घटना मंजूर करण्यांत आली. देशांतील राजकीय पक्ष, कामगार व शेतकरी संघटना यांचे ६६२ प्रतिनिधि या घटना परिषदेस उपस्थित होते. या परिषदेंत अप्रत्यक्षरीत्या कम्युनिस्टांचें वर्चस्व होतें.

अनुक्रम ........ वि: ..........



क्रमांक ...................... नों: दि: ...............

चीनचा सध्यांचा अध्यक्ष माओ त्से तुंग हा आहे. त्याच्या हाताखालीं सहा उपाध्यक्ष आहेत. चीनचा पंतप्रधान चाउ एन लाय हा असून चार उपाध्यक्ष व सोळा मंत्री यांचें मंत्रिमंडळ आहे. परराष्ट्र खातें पंतप्रधानाकडेच आहे. याखेरीज मंत्रिमंडळास मदत करण्यासाठीं पांच समित्या आहे.

राज्यकारभारच्या सोयीसाठीं चीनचे सहा विभाग पाडण्यांत आले आहेत. त्यांपैकीं चार विभागांत सध्यां लष्करी सत्ता चालू आहे.

या घटनेच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं, "कामगार, शेतकरी व मध्यमवर्ग यांचें हें राज्य आहे. या राज्यव्यवस्थेंत कोणालाही खास अधिकार मिळणार नाहींत. भांडवलदारांची मालमत्ता जप्त करण्यांत येईल व जमीन-सुधार करण्यांत येईल. आजच्या शेतीप्रधान राष्ट्राचें उद्योगप्रधान राष्ट्रांत रूपांतर करण्याचें सरकारचें उद्दिष्ट राहील."

या घटनेंतील कांहीं महत्त्वाचीं कलमें खालीलप्रमाणें आहेत.

**कलम ६:**—चीनच्या जनतेला आचार, विचार, उच्चार वगैरेंचें स्वातंत्र्य मिळेल.

**कलम ८:**—राष्ट्राचें रक्षण करणें, कायदे पाळणें, सार्वजनिक मालमत्तेचें रक्षण करणें, सार्वजनिक व लष्करी कर्तव्यें पार पाडणें, व कर भरणें हीं चिनी जनतेचीं कर्तव्यें आहेत.

**कलम ११:**— जगांतील सर्व शांतताप्रिय आणि स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांशीं चीन सलोख्यानें वागेल. यांत रशियाला प्राधान्य देण्यांत येईल.

**कलम २६:**— कामगार व मालक, खाजगी व सार्वजनिक हितसंबंध यांचा विचार करून वस्तूंचें उत्पादन वाढविणें हें या सरकारचें ध्येय राहील.

एका कलमान्वयें चीनमध्यें रहात असलेल्या परकीयांच्या संस्कृतीचें व भाषेचें रक्षण करण्यांत येईल असें आश्वासन देण्यांत आलें आहे.

जे कोणी जनतेच्या कल्याणासाठीं झटत असतील, शांतता व लोकशाही यासाठीं लढत असतील, आणि त्यांच्या सरकारांकडून त्यांचेवर जुलुम जबरदस्ती होत असेल, असे नागरिक आश्रयासाठीं आम्यास त्यास आश्रय देण्यांत येईल असें या घटनेच्या शेवटच्या कलमांत म्हटलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय स मा ग ठाणे.

अनुक्रम २.४.२२.० ....... वि: ..२१..५..८१.२..